

कृषार्जु

सन २०२३-२४

।। अनमोल क्षण ।।



BCA विभागाने घेतलेल्या TECH-FEST चा उद्घाटन प्रसंगी
मा.श्री.पकंज सारडा व मा. मदनदादा भोसले



'कृत्रिम बुद्धिमत्ता' या विषयावरील व्याख्यान प्रसंगी
डॉ.भूषण केळकर व मधुरा केळकर समवेत मा.श्री. मदनदादा भोसले



सिनेकलाकार मा.श्री.समृद्धी बाबा जाधव वार्षिक पारितोषिक
समारंभ प्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना



शिवछत्रपती पुरस्कार विजेते
श्री.मयुर रोकडे व कु.स्नेहल मांढरे



'प्रा.मे.पु.रेगे यांचे तत्वचिंतन आणि समाजचिंतन' याविषयावरील
कार्यशाळेतील पुस्तक प्रदर्शन पहाणी करताना मान्यवर



युवा महोत्सव नृत्य प्रकार प्रथम क्रमांक मिळवणाऱ्या
महाविद्यालयाच्या विद्यार्थीनी



महिला सक्षमीकरण कक्ष व अतंर्गत तक्रार निवारण कमिटी कार्यक्रमाच्या
प्रसंगी मा.डॉ. सुरभीताई भोसले व मा.प्रा.डॉ.गुरूनाथ फगरे



मा.डॉ.अवनिश पाटील Recent Trends in Research
या मेगा इव्हेंट मध्ये मार्गदर्शन करताना




कृष्णार्ड

सन २०२३-२४

जनता शिक्षण संस्थेचे

किसन वीर महाविद्यालय, वाई

पाणी व्यवस्थापनाची
धरुनी कास,
शेतकऱ्यांनी
साधला विकास...!



कृष्णाई

सन २०२३-२४





संपादन समिती

प्रमुख संपादक
- **प्राचार्य डॉ. गुरुनाथ फगरे**

कार्यकारी संपादक
- **डॉ.सौ.मंजुषा इंगवले**

सहसंपादक
- **डॉ.डॉ.शिवाजी कांबळे** कलादालन विभाग
- **डॉ.राहुल वळीव** विज्ञान विभाग
- **प्रा.दिपाली चव्हाण** वाणिज्य विभाग
- **डॉ.अमोल कवडे** मराठी विभाग
- **डॉ.अरूण सोनकांबळे** हिंदी विभाग
- **प्रा.जयवंत खोत** इंग्रजी विभाग
- **प्रा.दिक्षा मोरे** संस्कृत विभाग

मुखपृष्ठ संकल्पना व मांडणी
- **प्राचार्य डॉ. गुरुनाथ फगरे**
- **डॉ. सौ. मंजुषा इंगवले**
- **कु. शिवाजंली वरखडे**
- **कु. यशस्विनी चोरगे**

मलपृष्ठ संकल्पना
- **प्राचार्य डॉ. गुरुनाथ फगरे**
- **डॉ. सौ. मंजुषा इंगवले**
- **श्री. ऋषिकेश शिंदे**

कार्यालयीन सहाय्यक
- **श्री. बाळासाहेब टेमकर**
- **श्री. अशोक जमदाडे**
- **श्री. नितीन केसकर**
- **श्री. जितेंद्र चव्हाण**

मुद्रक व मांडणी
- **कलाविष्कार ग्राफिक्स्,सातारा**
  श्री.कृष्णा चिंचकर, मोबा.९५०३७८०६२८

प्राचार्य मनोगत



प्राचार्य मनोगत...

'शिवछत्रपतींच्या पदस्पर्शाने', कार्य-कर्तुत्वाने, शौर्य आणि पराक्रमाने पुनीत झालेल्या सातारा जिल्ह्यातील वाई या ऐतिहासिक शहरात स्थापन झालेल्या किसन वीर महाविद्यालयाने, आपल्या विविधांगी कलागुणांनी कीर्तिमान स्थापन केला आहे. नवोदित लेखकांनी लिहिलेला वाचकांना वाचनीय असा समृद्ध ठेवा असलेला किसन वीर महाविद्यालयाचा सन २०२३ - २४ चा वार्षिक अंक 'कृष्णाई' आपणास सादर करतांना अतिशय आनंद होत आहे.

२०२३-२४ हे वर्ष G-20 परिषद, विश्वचषक क्रिकेट स्पर्धा, १८ व्या लोकसभेचा महासंग्राम यासारख्या अनेक घडामोडीने वैशिष्ट्य पूर्ण ठरले. विद्यार्थ्यांची सृजनात्मक शक्ती, आकाशाला गवसणी घालत साहित्याच्या विविध प्रकारांमध्ये भाषिक अभिव्यक्ती करत असताना मराठी, हिंदी, इंग्रजी आणि संस्कृत भाषांमध्ये केलेली विचारांची मांडणी विशेष उल्लेखनीय व सांस्कृतिक आहे. शिक्षणाच्या उद्देशानुसार विद्यार्थ्यांनी अंतर्गत आणि बाह्य प्रगतीबरोबरच कला, क्रीडा व सांस्कृतिक क्षेत्रातही राज्य तसेच राष्ट्रीय स्पर्धांमध्ये सहभाग नोंदवून महाविद्यालयाची यशाची घोडदौड निरंतर ठेवत महाविद्यालायचा लौकिक वाढविला आहे.

विशेषतः कला व सांस्कृतिक क्षेत्रांमध्ये विद्यार्थ्यांच्या कला - गुणांना वाव देण्यासाठी शिवाजी विद्यापीठाच्या जिल्हा तसेच मध्यवर्ती युवा महोत्सवात आमच्या महाविद्यालयातील गुणवंत कलाकारांनी लोकनृत्य या कलाप्रकारामध्ये प्रथम क्रमांक प्राप्त करुन सरदार बाबासाहेब माने लोकनृत्य फिरता चषक मिळवून महाविद्यालयाचे नाव यशोशिखरावर नेले. तसेच सांस्कृतिक विभागातील विद्यार्थीनी कु. अमरीन अजीम इनामदार या विद्यार्थिनीची शिवाजी विद्यापीठ सांस्कृतिक संघात इंद्रधनुष्य या स्पर्धेसाठी निवड होऊन पंजाब येथील लव्हली प्रोफेशनल युनिव्हर्सिटी, फगवाडा येथे राष्ट्रीय स्पर्धेत सहभाग नोंदविला. अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा योग्य उपयोग करून उत्तम श्रोता, उत्तम वक्ता कसा होऊ शकतो, या हेतूने वक्तृत्व कलेला वृद्धिंगत करण्यासाठी आमच्या महाविद्यालयाच्या वतीने थोर स्वातंत्र्य सेनानी, किसन वीर आबांच्या स्मृती प्रीत्यर्थ 'देशभक्त आबासाहेब वीर राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा' आयोजित केली जाते. यावर्षी स्पर्धेत

महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून अनेक स्पर्धकांनी सहभाग नोंदविला. तसेच आमच्या महा-विद्यालयाचा विद्यार्थी अथर्व खरे याने वेगवेगळ्या ठिकाणी झालेल्या वक्तृत्व स्पर्धेत महाविद्यालयाचे प्रतिनिधित्व करत अनेक पारितोषिके प्राप्त केली याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे.

महाविद्यालयाच्या वतीने वाङ्मय मंडळ, अंतर्गत दर्जा हमी कक्ष, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी प्रतिष्ठान, वाई आणि प्रागतिक इतिहास संस्था, महाराष्ट्र यांच्या संयुक्त विद्यमाने प्रा.मेघश्याम पुंडलीक रेगे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त 'प्रा.मे.पुं.रेगे यांचे तत्वचिंतन आणि समाजचिंतन' या विषयावर राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन २३ जानेवारी २०२४ रोजी करण्यात आले. तसेच महाविद्यालयाच्यावतीने विविध कार्यशाळा व व्याख्यानाचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले. अध्ययन-अध्यापनाबरोबर प्राध्यापकांनी राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय मासिक-त्रेमासिकांमध्ये आपले शोधनिबंध प्रकाशित करून संशोधन क्षेत्रात महत्वपूर्ण कामगिरी केली आहे. तसेच वेगवेगळ्या चर्चासत्रात / व्याख्यानात साधन व्यक्ती म्हणून सहभाग नोंदविला. उच्च शिक्षण हे मुख्य समाज परिवर्तनाचे साधन म्हणून पहिले जाते. त्याला अनुसरून वाई शहरातील लोकांसाठी मानसशास्त्र विभागाच्या वतीने प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी मानसिक आरोग्यावर आधारित व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले.

राष्ट्रीय सेवा योजना महाविद्यालय समाजा-बरोबर जोडण्याचा दुवा आहे. युवकांमध्ये सामाजिक जाणीव जागृती करून वैज्ञानिक दृष्टीकोन जागृत करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून विविध उपक्रम राबवण्यात आले. या योजनेच्या माध्यमातून ग्राम-प्रशासनाच्या सहकार्याने विविध स्वयंसेवी संस्थांच्या सहकार्याने वाई तालुक्यातील शेंदूरजणे या गावात विशेष श्रमसंस्कार शिबिराचे आयोजन करून गावातील स्वच्छता करत मानसिक आरोग्य जपण्यासाठी वेगवेगळ्या प्रबोधनात्मक व्याख्यांनाचे, सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करून समाजामध्ये वैज्ञानिक दृष्टीकोन निर्माण करण्याचा यशस्वी प्रयोग केला. या युनिटच्या वतीने दरवर्षी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या नायगाव या जन्मगावातून क्रांतीची मशाल स्वयंसेवक - स्वयंसेविका पायी चालत महाविद्यालयात आणून संपूर्ण महाविद्यालय परिसरामध्ये ही ज्योत फिरवली जाते. त्यातून अनेक विद्यार्थ्यांनी प्रेरणा घेतली.

राष्ट्रीय छात्र सेना हा आणखी एक महत्वाचा विभाग, ज्यायोगे महाविद्यालय आणि विविध सामाजिक संस्थांच्या सहकार्याने अनेक कार्यक्रमाचे आयोजन करत समाज जागृती आणि समाज प्रबोधनाचे कार्य केले जाते. या विभागाच्या वतीने सामाजिक जबाबदारी पार पाडत १९ जानेवारी २०२४ रोजी किसन वीर आबांच्या स्मृतीप्रीत्यर्थ रक्तदान शिबाराचे आयोजन करण्यात आले, त्यामध्ये या विभागाच्या आजी - माजी विद्यार्थ्यांनी रक्तदान करून ८८ रक्तबॅग अक्षय ब्लड बँकेला दिल्या. तसेच महाविद्यालयाच्या प्राध्यापक व प्रशासकीय कर्मचारी यांच्यासाठी आंतरराष्ट्रीय योग दिवस २१ जून २०२३ मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. असे अनेक समाजोपयोगी उपक्रम या विभागाच्या माध्यमातून राबविले जातात.

आमच्या महाविद्यालयाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे, जनता शिक्षण संस्थेचे कार्यकुशल, अध्यक्ष सन्माननीय मदनदादा भोसले यांच्या भविष्यवेधी विचाराने कला, विज्ञान व वाणिज्य

शाखेच्या पदवीबरोबर कौशल्याधारित, रोजगाराभिमुख विविध सर्टिफिकेट कोर्सची निर्मिती करण्यासाठी पी एजूकूल युनिव्हर्सिटी प्रा. लि. यांचे वतीने प्राध्यापक व विद्यार्थ्यांसाठी उद्‌बोधनपर कार्यशाळेचे आयोजन करून आगामी वर्षामध्ये विविध कोर्सेस सुरु करण्याबाबत विशेष नियोजन केले आहे.

महाराष्ट्रातील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या मुलांना मोफत शिक्षण देण्यासाठी जनता शिक्षण संस्थेचे विश्वस्त, माजी खासदार दिवंगत मा. प्रतापराव (भाऊ) भोसले यांच्या संकल्प आणि प्रेरणेतून मोफत 'जय किसान मुलांचे वसतिगृह' ची निर्मिती करण्यात आली. या उपक्रमातून सदर विद्यार्थ्यांना आपल्या कुटुंबाची पुनर्उभारणी करण्यासाठी विशेष प्रयत्न केला जात आहे. या उपक्रमाचा विशेषतः विदर्भ व मराठवाडा या परिसरातील अनेक विद्यार्थ्यांनी लाभ घेऊन आपले भविष्य उज्वल करून संस्थेचा लौकिक वाढविला आहे. यावर्षी या विद्यार्थ्यांची ६ वी बॅच यशस्वीरीत्या उच्च शिक्षणाची पदवी घेऊन बाहेर पडली.

यावर्षी महाविद्यालय NAAC च्या चौथ्या टप्प्यातील पुनर्मुल्यांकनासाठी अंतर्गत दर्जा हमी कक्ष पूर्ण तयारीनिशी सज्ज झाला आहे. यासाठी महाविद्यालयातील सर्व घटक उत्तमरित्या कार्य करीत आहेत. महाविद्यालयाची यशस्वी घौडदौड विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी, येणाऱ्या काळामध्ये विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या स्पर्धात्मक युगामध्ये टिकण्यासाठी विद्यार्थ्याला शैक्षणिक विकासाबरोबर कौशल्याधिष्टीत शिक्षण देऊन या सर्व बाबींचे दर्शन घडविणारा राष्ट्राचा सुजाण नागरिक बनविण्यासाठी आम्ही सर्वजण कटीबद्ध आहोत. विविधांगानी समृद्ध व वाचनीय 'कृष्णाई' अंक आपल्यासमोर ठेवत असताना मला मनस्वी आनंद होत आहे.

धन्यवाद !

संपादकीय

कृष्णातीरावरून...



सस्नेह नमस्कार,

संथ वाहणाऱ्या कृष्णामाईच्या तीरावर वसलेल्या, सांस्कृतिक दक्षिण काशी म्हणून ओळख असलेल्या व ऐतिहासिक वारसा लाभलेल्या, वाई शहरातील एक महत्त्वपूर्ण शैक्षणिक संस्था म्हणजे जनता शिक्षण संस्था, वाई होय. आदरणीय स्वर्गीय प्रतापराव भोसले (भाऊ) यांच्या पवित्र स्मृतींना अभिवादन करून सन २०२३-२०२४ या शैक्षणिक वर्षाचे 'कृष्णाई' हे किसन वीर महाविद्यालय, वाई वार्षिक नियतकालिक प्रस्तुत करत आहे.

महाविद्यालयातील प्रतिभा संपन्न विद्यार्थी - विद्यार्थिनींना आपले प्रतिभाशील विचार साकार करण्याचे हक्काचे व्यासपीठ म्हणजेच 'कृष्णाई'. ही संधी म्हणजे भविष्य रुपी आकाशात यशस्वी भरारी घेण्यासाठी तयार केलेली धावपट्टी !

शिवाजी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात किसनवीर महाविद्यालयाने आपल्या वैशिष्ट्यपूर्ण शैक्षणिक, सांस्कृतिक, क्रीडा, NSS, NCC व सामाजिक उपक्रमांनी एक मानाचे आढळ स्थान निर्माण केले आहे. त्यामध्ये कृष्णाईचे मोठे योगदान आहे. या अंकासाठी लेखन करणाऱ्या सर्व प्रतिभावंत नवलेखकांचे व संपादक मंडळाचे प्रथमतः मी अभिनंदन करते. शैक्षणिक वर्षातील महाविद्यालयाची वाटचाल, विद्यार्थी केंद्रित नित्य नवीन उपक्रम, विद्यार्थ्यांचे कौतुकास्पद कार्य इत्यादी सर्व महाविद्यालयीन कामगिरीचे प्रतिबिंब 'कृष्णाई' अंकातून दिसत आहे.

विद्यार्थ्यांची कल्पनाशक्ती, प्रतिभाशक्ती आणि सौंदर्यत्मकतेचा अविष्कार या वर्षामधील अंकामध्ये पाहण्यास मिळतो. मराठी, हिंदी, इंग्रजी, संस्कृत आणि कला विभागामध्ये विविधता आणि नाविन्यते बरोबरच स्थानिक ते जागतिक घटना, घडामोडीचा आलेख मांडला गेला आहे. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या सभोवताली घडणाऱ्या घटनांचा कळत नकळत परिणाम त्यांच्या मनावर होत असतो. सामाजिक, राजकीय, शैक्षणिक परिस्थितीचे मंथन विद्यार्थी करू लागले आहेत. त्यांच्या या शब्द साहित्यातून विचारांना चालना मिळते. विविध भाषेतील साहित्य विद्यार्थ्यांच्या लेखन कौशल्याची साथ देतात. त्याचाच अविष्कार 'कृष्णाई' अंकात पहायला मिळतो.

लय अवघड हाय र गड्या उमगाया बाप र, कालीदास हिरवे चा जीवन संघर्ष तर माणसांच्या गर्दी हरवलेला माणूस हे लेख विचार करावयास

भाग पाडतात. 'Hope Never Dies' ही इंग्रजी कथा जीवनात आशा सोडू नये हे शिकवते तर 'Life Falls Apart' नावाच्या एकांकिकेतून वास्तववादी चित्रण स्पष्ट करते. भारतीय भाषेमधून 'संस्कृत भाषेचे' योगदान यामधून संस्कृत भाषाही सर्व भाषेची जननी आहे हे सिद्ध करण्यात आलेले आहे. प्रवास वर्णनातून प्रत्यक्ष प्रवासाला गेलेल्याचा सुखद अनुभव मिळतो. मनमोहक दृश्य 'अयोध्या:राम मंदिरम्, महालक्ष्मी मंदिरातील किरणोत्सव' या मधून डोळ्यासमोर उभे राहते.

यंदाच्या वर्षातील ठळक घटना चंद्रयान ३, भारताची महत्त्वकांक्षी चंद्रमोहीम, G-२० जागतिक शिखर परिषद, वयाच्या १७ व्या वर्षी बुद्धिबळ स्पर्धा जिंकून इतिहास रचणारा ग्रँडमास्टर डी. गुकेश तर खेलो इंडिया २०२४ मध्ये भारतीयांनी १५८ पदकांची केलेली कमाई ही संकल्पना मुखपृष्ठातून कु.शिवांजली वरखडे व कु.यशस्विनी चोरगे यांनी मा. प्राचार्य डॉ. गुरुनाथ फगरे व माझ्या मार्गदर्शनाखाली रेखाटली आहे. तर मलपृष्ठ महाविद्यालयाची वैभवशाली समृद्धी दर्शविते.

विविध वैशिष्ट्यांनी परिपूर्ण अशा या 'कृष्णाई'ला पूर्णत्व प्राप्त करून देण्याची संधी मा. प्राचार्य डॉ. गुरुनाथ फगरे सर यांनी माझ्यावर दिली व सहकार्य केले याचा मला खूप आनंद वाटतो. याबद्दल मी त्यांची खूप आभारी आहे. जनता शिक्षण संस्थेचे माजी अध्यक्ष प्रतापराव भोसले (भाऊ) तसेच विद्यमान अध्यक्ष मा. श्री मदन दादा भोसले, उपाध्यक्ष मा. श्री. शंकरराव गाढवे, संस्थेचे सर्व संचालक, सचिव डॉ. जयवंत चौधरी, खजिनदार प्रा. नारायणराव चौधरी यांची अनमोल साथ व मार्गदर्शन आम्हांला नेहमीच लाभते. या सर्वांचा प्रति मी कृतज्ञता व्यक्त करते.

नियतकालिकाची जबाबदारी ही फार महत्वाची बाब आहे. या अंकाची उभारणी करताना मला सहकार्य करणारे डॉ. अमोल कवडे, डॉ. अरुण सोनकांबळे, प्रा. जयवंत खोत, प्रा.कु. दीक्षा मोरे, डॉ. राहुल वळीव, डॉ. शिवाजी कांबळे व कु.दिपाली चव्हाण यांनी मला उत्तम सहकार्य केले. अतिशय परिश्रमपूर्वक व दिलेल्या वेळेत सर्व नियोजित पार पाडले याबद्दल संपादक मंडळाचे मी विशेष आभार मानते. हा अंक आकारला येत असताना सर्व विभाग प्रमुख, विविध समिती समन्वयक, माझे सर्व सहकारी प्राध्यापक तसेच कार्यालयीन विभागातील श्री. बाळासाहेब टेमकर, श्री. अशोक जमदाडे, श्री. नितिन केसकर, श्री. जितेंद्र चव्हाण यांनी विविध प्रकारे सहकार्य केले त्यांचे ही आभार !

मला सहकार्य करणारे सर्व शिक्षकेतर कर्मचारी यांना ही धन्यवाद देते. या अंकाला खऱ्या अर्थाने मूर्त रूप देण्यासाठी कल्पकतेने केलेली मांडणी व आकर्षक छपाई यासाठी कलाविष्कार ग्राफिक्स साताराचे प्रमुख श्री. कृष्णा चिंचकर व त्यांचे सहकारी यांचे ही मनःपूर्वक आभार. विविध वैशिष्ट्यांनी परिपूर्ण हा अंक सर्वांच्या पसंतीला उतरेल अशी प्रांजळ अपेक्षा व्यक्त करते तसेच महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना पुढील वर्षाच्या लेखनासाठी शुभेच्छा देते. धन्यवाद !

डॉ.मंजुषा इंगवले
(कार्यकारी संपादक)

मुखपृष्ठाविषयी...



मुखपृष्ठा विषयी किसन वीर महाविद्या-लयातील विद्यार्थ्यांची कल्पनाशक्ती, प्रतिभा शक्ती आणि सौंदर्यात्मकतेचा अविष्कार मुखपृष्ठावर पाहायला मिळतो. इस्त्रोने चंद्रयान तीन चे प्रक्षेपण १४ जुलै २०२३ रोजी दुपारी दोन वाजून ३५ मिनिटांनी केले. भारताची महत्त्वकांक्षी चंद्र मोहीम यशस्वीपणे पार पडली. चांद्रयान तीन हे चंद्राच्या दक्षिण ध्रुवा जवळ २३ ऑगस्ट २०२३ रोजी सायंकाळी तीन वाजून चार मिनिटांनी सुरक्षितपणे लँड झाले. चंद्राच्या या भागात सॉफ्ट लँडिंग करणारा भारत हा पहिलाच देश ठरला.

जी २० म्हणजे ग्रुप ऑफ ट्वेंटी हा जगातला प्रमुख विकसित आणि विकसनशील देशाचा राष्ट्रगट आहे. जागतिक आर्थिक संकटाचा सामना करण्यासाठी प्रमुख देशांनी एकत्र येऊन प्रयत्न करावेत हा त्यामागचा हेतू आहे. अठरावी जी २० शिखर परिषद नऊ ते दहा सप्टेंबर २०२३ दरम्यान नवी दिल्लीतील भारत मंडपम येथे पार पडली. या परिषदेने भारताला आर्थिक व्यवस्थेत आपली भूमिका मजबूत करण्याची आणि जागतिक सॉफ्ट पॉवर बनवण्याची संधी दिली.

खेलो इंडिया २०२४ मध्ये महाराष्ट्राने तब्बल १५८ पदकांची कमाई करून सर्वसाधारण विजेतेपद पटकावले आहे. महाराष्ट्राने विविध क्रीडा प्रकारात ५७ सुवर्णपदकावर आपलं नाव कोरलं आहे. तर ४८ रौप्य व ५३ कास्य पदके देखील पटकावली आहेत.

भारताचा १७ वर्षीय ग्रँड मास्टर डी. गुकेश याने टोरंटो येथील कॅडिडेटस् बुद्धिबळ स्पर्धा जिंकून इतिहास रचला व जागतिक विजेते पदासाठी आव्हान देणारा तो सर्वात तरुण खेळाडू ठरलेला आहे. देशाचे उज्वल भविष्य वैज्ञानिक, नीतिमान, गतिमान, प्रयोगशील, जिज्ञासू, स्वतंत्र बुद्धी असणाऱ्या परिवर्तनशील विद्यार्थ्यांकडून घडू शकते. कृतिशील होऊन शिक्षण क्षेत्रात योगदान दिले तरच आपलं भविष्य उज्वल आहे हाच मुखपृष्ठ चा संदेश आहे.

मलपृष्ठाविषयी...

थोर स्वातंत्र्य सेनानी देशभक्त किसन उर्फ आबासाहेब वीर, तर्कतीर्थ लक्ष्मण शास्त्री जोशी, श्री. प्रतापराव भोसले उर्फ भाऊ आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी उभ्या केलेल्या किसन वीर महाविद्यालयाची परंपरा माननीय श्री. मदन दादा भोसले यांच्या अध्यक्षतेखाली वैभवशाली व समृद्ध होत आहे.

नवीन शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने बदलत्या परिस्थितीला सकारात्मक दृष्ट्या सामोरे जाण्याचा दृष्टिकोन ठेवून वेगवेगळ्या उपाययोजना महाविद्यालयात राबवल्या जात आहेत. महाविद्यालयाचा नवीन चेहरा श्री.ऋषिकेश शिंदे यांच्या छायाचित्रामधून सर्वांना दिसून येत आहे.

डॉ.मंजुषा इंगवले
(कार्यकारी संपादक)

देशभक्त किसन महादेव तथा आबासाहेब वीर

संस्थापक अध्यक्ष व विश्वस्त
जनता शिक्षण संस्था, वाई



पद्मविभूषण तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी

संस्थापक विश्वस्त

जनता शिक्षण संस्था, वाई

भावपूर्ण श्रद्धांजली!



स्व.श्री.प्रतापराव बाबुराव भोसले

विश्वस्त व संस्थापक सदस्य

जनता शिक्षण संस्था, वाई



श्री. मदन प्रतापराव भोसले

अध्यक्ष

जनता शिक्षण संस्था, वाई

मा. शंकरराव दाजीबा गाढवे

उपाध्यक्ष

जनता शिक्षण संस्था, वाई

जनता शिक्षण संस्था, वाई

।। विश्वस्त कार्यकारी मंडळ ।।



मा. श्री. मदन भोसले
अध्यक्ष



मा. श्री. शंकरराव गाढवे
उपाध्यक्ष



मा. श्री. केशवराव जाधव (पाडळे)
सदस्य



मा. श्री. सुरेश यादव
सदस्य



मा. श्री. मिलिंद जाधव (पाटील)
सदस्य



मा. डॉ. जयवंत चौधरी
सचिव



मा. प्रा. नारायण चौधरी
खजिनदार



मा. प्राचार्य डॉ. गुरुनाथ फगरे
पदसिद्ध सदस्य



प्राचार्य डॉ.गुरुनाथ जोतिबा फगरे



कृष्णाई २०२३-२४ संपादक मंडळ



हार्दिक अभिनंदन

डॉ.समिर पवार
सावित्रिबाई फुले विद्यापीठाची
पीएच्.डी. प्राप्त



डॉ.भानुदास आगेडकर
हिंदी विषयात
प्रोफेसर पदी पदोन्नती

महाविद्यालय विकास समिती



मा. श्री. मदनदादा भोसले
पदसिद्ध अध्यक्ष



मा. डॉ. जयवंत चौधरी
संस्था सचिव



प्रा. (डॉ.) सुनील सावंत
प्राचार्य नामनिर्देशित विभागप्रमुख



डॉ. बाळकृष्ण मागाडे
अध्यापक



डॉ. आनंद घोरपडे
अध्यापक



डॉ. मंजुषा इंगवले
अध्यापक (महिला)



श्री. अनिल सावंत
अध्यापकेतर कर्मचारी



श्री. उदय गुजर
नामनिर्देशित सदस्य (शिक्षण)



श्री. मयुर होरा
नामनिर्देशित सदस्य (उद्योग)



प्रा. गणेश हिंगमिरे
नामनिर्देशित सदस्य (संशोधन)



प्रा. नारायण चौधरी
नामनिर्देशित सदस्य (समाजसेवा)



डॉ. शिवाजी कांबळे
समन्वयक,अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष



प्राचार्य डॉ. गुरुनाथ फगरे
सदस्य-सचिव

मराठी विभाग

तुझे असून तुजपाशी
तुज जागा चुकलाशी

कल्पतरू तो असता दारी
वणवण फिरशी का बाजारी
स्वर्ग तुझा तो तव संसारी
सुख त्याचे अविनाशी

कस्तुरीमृग तू, तुला न कळले
सुगंध शोधीत जीवन सरले
घे चाहूल सुख कोठे दडले ?
ते तुझिया कर-पाशी

चुकलो त्याची खंत नको पण
चुकता चुकता घडते जीवन
अनुतापाने येते उजळून
मळले जे भवपाशी

– मधुसूदन कालेलकर



मधुसूदन कालेलकर
जन्मशताब्दी वर्ष

विभागीय संपादक मराठी विभाग
डॉ. अमोल कवडे

फेणाई २०२३ २०२४

अनुक्रमणिका

गद्य विभाग

व्यक्तिचित्रण	भाऊ....	सोमनाथ सानप	एम.एस्सी. भाग २	११
ललित	बाप	सोनाली वाघमारे	बी.कॉम. भाग ३	१३
व्यक्तिचित्रणात्मक	यशस्वी जीवनसंघर्ष - कालिदास हिरवे	दीपक कोंडके	बी.कॉम. भाग १	१५
आत्मकथनपर	किल्लारी ते वाई	अभिजित पवार	बी.ए. भाग ३	१७
कथा	ती भयानक रात्र....	संचिता मोरे	बी.एस्सी. भाग २	१९
एकांकिका(विनोदी)	कार्यकर्ते	वैभव त्रिगुणे	बी.कॉम. भाग	२१
प्रवास वर्णन	आमचा डोंगरातील प्रवास	विजय सोनवणे	बी.कॉम. भाग ३	२३
समीक्षात्मक	रावण राजा राक्षसांचा - समीक्षा	सायली नवले	बी.ए. भाग ३	२६
वैचारिक	माणसांच्या गर्दीत हरवलेला माणूस	भारत भिसे	बी.ए. भाग ३	२८
मुलाखत	मुलाखत एका समाजसेवकाची	स्नेहांजली वरखडे	बी.एस्सी. भाग ३	३०
संशोधनात्मक	स्वतःचा शोध... तंत्रज्ञानाद्वारे...	सानिका पार्टे	बी.एस्सी. भाग ३	३२
माहितीपर	नाद शर्यतीचा ...शर्यत नातं मातीचं...	केतकी मांढरे	बी.कॉम. भाग ३	३४
माहितीपर	बीजमाता	अदिती काळोखे	बी.एस्सी. भाग २	३६
माहितीपर (विज्ञान)	तंत्रज्ञान शाप की वरदान	किरण पांगारे	बी.सी.ए. भाग ३	३९

पद्य विभाग

रायगड	ईश्वरी चौधरी	बी.कॉम भाग	१४
आयुष्य शेतकऱ्याचं	केतकी मांढरे	बी.कॉम भाग ३	३३
एक मन	तृप्ती शिवणकर	बी.सी.ए भाग १	३८
आई	अर्चिता महांगडे	बी.कॉम. भाग १	४०
गृहलक्ष्मी	प्रीती मांढरे	बी.ए. भाग १	४१
माझा काय गुन्हा ....?	प्रीतिका जाधव	बी.सी.ए. भाग	४२
मैत्री	वैष्णवी कापसे	बी.सी.ए. भाग १	४२
मी कोण ?	दीपक कोंडके	बी.कॉम. भाग १	४३
भान...	संध्या मांढरे	बी.ए भाग १	४३
जीवन आपले	निकिता सूर्यवंशी	बी.ए. भाग १	४४

भाऊ..

सोमनाथ सानप
एम.एस्सी - भाग २

२०१८ मध्ये मी बी.एस्सीला प्रवेश घेतला आणि किसन वीर परिवारात सामील झालो आणि इथूनच माझ्या आयुष्याचा एक नवीन प्रवास चालू झाला. तो दिवस मला अजूनही आठवतो, जेव्हा आदरणीय भाऊ (प्रतापराव भोसले) यांच्याशी माझी पहिली भेट झाली. ऐन २५ तील तरूणालाही लाजवेल असे प्रचंड तेज त्यांच्या चेहऱ्यावर होते. हे तेज कदाचित नि:स्वार्थपणे समाजासाठी केलेल्या कार्याचं असावं. सध्याच भ्रष्ट राजकारण बघता अखेरचा श्वास पत्र्याच्या घरात घेणाऱ्या स्वाभिमानीपणाचं तेज त्यांच्या चेहऱ्यावर अखेर पर्यंत चकाकत राहिले.



इतर मुलांप्रमाने मी जेमतेम शेती असलेल्या मध्यमवर्गीय कुटुंबातला आणि दुष्काळग्रस्त मराठवाड्यातील मुलगा, गुणपत्रक ही म्हणावं तसं समाधानकारक नाही, पण खऱ्या अर्थाने माझ्या जीवनाला सुरुवात झाली ती किसन वीर महाविद्यालयामध्ये असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही. कारण इथे माझ्या गुणपत्रकात तर बदल झालाच, पण भाऊ आणि जनता शिक्षण संस्थेतून जो सामाजिक धडा मला मिळाला, तो कदाचित मला कुठेही मिळाला नसता. भाऊ नेहमी म्हणायचे तुमचं सामाजिक ज्ञान हे शैक्षणिक ज्ञानापेक्षा जास्त असायला पाहिजे, कारण जिथे शैक्षणिक ज्ञान कमी पडतं तिथं सामाजिक ज्ञान आपल्याला सांभाळून घेतं.

काळया मातीत कृष्णेच्या पाण्यावर बहरलेलं हे 'प्रताप' नेतृत्व आजीवन समाजासाठी, शेतकऱ्यांसाठी, खेड्या-पाड्यातील विद्यार्थ्यांसाठी कुठल्याही लाभाची अपेक्षा न करता झगडत राहिले. मराठवाड्यातला दुष्काळ असो अथवा कोल्हापूर- कराडातला महापूर असो भाऊ त्यांच्या सामाजिक कार्यापासून कधीही मागे हटले नाहीत. भाऊ लढले, जिंकले,थकले पुन्हा उभा राहिले पण कधीच थांबले नाहीत, त्यांच्या कार्याशी सदैव प्रामाणिक राहिले. कदाचित भाऊंना आराम हा शब्द माहीतच नसावा, कारण सतत काहीतरी नवीन करण्याची त्यांची धडपड कधी संपलीच नाही, भाऊंच्या कल्पना कधी थांबल्याचं नाहीत

आणि हीच गोष्ट भाऊ हे सामान्य व्यक्तिमत्व नाहीत याची जाणीव आपल्याला करून देते.

भाऊंच्या सामाजिक कार्यातील एक महत्वाचा उपक्रम म्हणजे आत्महत्याग्रस्त विद्यार्थ्यांसाठी किसन वीर महाविद्यालयात उभारण्यात आलेले 'जय किसान मुलांचे वसतिगृह' जिथे माझ्या सारख्या अनेक विद्यार्थ्यांना आपली स्वप्नं पुन्हा बघण्याची, भविष्य रेखाटण्याची आणि यशस्वी भरारी घेण्याची संधी भाऊंनी उपलब्ध करून दिली. हे वसतिगृह म्हणजे फक्त एक इमारत नाही तर उद्याच्या असंख्य गरजू विद्यार्थ्यांचं भविष्य आहे. त्यांचं उद्याच आयुष्य उज्वल असावं हा हेतू समोर ठेवून उभारलेली ही इमारत एक मंदिरच आहे...

युगपुरुष आदरणीय भाऊ (प्रतापरावजी भोसले) कधी काळी भारताच्या राजकारणात सक्रिय असणारे भाऊ, किसन वीर आबा, यशवंतराव चव्हाण अशा दिग्गज व्यक्तीमत्वासमवेत त्यांच्या विचारांशी एकनिष्ठ असणारे भाऊ, सह्याद्रीच्या सानिध्यात कृष्णेच्या छायेखाली सामाजिक बांधिलकी जपणारे भाऊ. किसन वीर महाविद्यालय, खंडाळा महाविद्यालय आणि शिक्षण प्रसारासाठी जनता शिक्षण संस्थेअंतर्गत अनेक छोटे मोठे हायस्कूल चालवणारे भाऊ, इतरांना भाऊ कसे वाटले किंवा कसे वाटतात हे मला माहीत नाही, आणि ते जाणून घेण्याची माझी इच्छा देखील नाही. कारण मी जाणलेले, मी ओळखलेले, मी पाहिलेले भाऊ माझ्यासाठी देवमाणसा-पेक्षा कमी नाहीत.

भाऊ बद्दल जेवढं बोललं जाईल तेवढं कमीच आहे. कारण सामाजिक कार्याने भारावून गेलेली व्यक्तिमत्वे ही नेहमीच आपल्या समजण्याच्या पलीकडे गेलेली असतात. त्यांचं कार्य त्यांच्यासाठी सर्वस्व होऊन जात भाऊ त्यातीलच एक आहेत शेवटी एवढच बोलेन...

घरट्यातल्या पिलांना घार जसी
तसे भाऊ होते आम्हांसाठी ।
कर्तृत्वाने अजरामर झाले
लौकिक ठेऊन कृष्णाकाठी ।।

कड्या कपाऱ्यातून वाहते
जसी निर्मळ ती कृष्णामाई ।
तसाच हा युगपुरुष राहतो
आमच्या मनातल्या ठाई ।।

नतमस्तक होतात माना सावळ्या
विठ्ठलाच्या मंदिरी ।
स्वाभिमानी होतो कणा
भाऊंच्या या निष्ठेच्या राउळी ।।

गर्दीत घेतो लोटांगण पंढरीत विठ्ठलाच्या पायी ।
साक्षात पाहिला पांडुरंग जो आज आपल्यात न्हाई ।।

नियतीचा खेळ आजवर कोणाला समजलाय? कधी काळ डाव साधून जाईल सांगता येत नाही, आणि अखेर काळानं डाव साधला आणि १९ मे २०२४ च्या सूर्योदयाला अखंडपणे तेजस्वी असणारे प्रतापपर्व संपले... भाऊंनी शेवटचा श्वास घेतला. तुम्हा आम्हांला पोरकं करून भाऊंनी अखेरचा निरोप घेतला. पण या जीवन प्रवासात भाऊंनी त्यांचं कार्य पूर्णत्वाला नेलं, आता भाऊंच्या कार्याला जिवंत ठेवण आपलं काम आहे. 'प्रतापपर्व' जरी संपलं असलं तरी आपल्या 'प्रताप' पर्वाने त्यांच्यापेक्षा जास्त सामाजिक पर्वाला महत्व दिलं आणि हेच सामाजिक पर्व आपल्याला आदरणीय दादांच्या (मदनदादा भोसले) नेतृत्वाखाली अखंड चालू ठेवायचं आहे यापेक्षा चांगली श्रद्धांजली आदरणीय भाऊंसाठी असू शकत नाही....

★ ★ ★

बाप

सोनाली वाघमारे
बी.कॉम. भाग ३

काय लिहू मी कळत नाही
वडील या एका व्यक्तीसाठी
असे काही म्हणू शकते कोणी
कोणीही नसते कोणासाठी
जीवन खर्चले वडिलांनी सारे
आपल्या कुटुंबातल्या माणसांसाठी
बघितले नाही पप्पा तुम्हाला
कधी जगताना स्वतःसाठी

बापावर काय लिहायचं? लहानपणी शाळेत असताना सर कोणत्याही विषयावर निबंध लिहून आणायला सांगायचे, तेंव्हा वर्गातील ९०% मुलं आईवर निबंध लिहून आणायची, आईवर लिहिण्यासाठी खूप काही असतं... कारण आई काय आहे हे आपल्याला लवकर समजतं. आई समजण सोपं आहे पण बाप समजण तेवढंच अवघड, संस्कार करणारी, चविष्ठ जेवण खाऊ घालणारी, लाड करणारी आई आपल्याला लगेच समजते. रात्रीच्या जेवणाची चिंता करणारी आई असते, पण आयुष्यभराच्या जेवणाची चिंता करणारा बाप, शाळेत पहिला आला किंवा चांगल्या मार्कांनी पास झाला की, छातीशी कवटाळणारी आई असली तरी, दुकानात जाऊन पेढ्याचा बॉक्स आणणारा बाप असतो...

वडील म्हणजे कोणाचे तरी बाबा, कोणाचे पप्पा, आबा ... किती विश्व सामावले आहे बाप या नावात. बाप असतोच संपूर्ण कुटुंबाचा पाया, वडासारखा मातीत घट्ट रोऊन कुटुंबाला ऊन, वारा, पाऊस यापासून संरक्षण देणारा, कुटुंबाचे छत्र होणारा बाप स्वतः दुःख मनात ठेऊन दुसऱ्याला सुखी करणारा हा देवमाणूस प्रत्येकाच्या मनात लपलेला असतो. आपण लहान असताना आई आपल्याला कडेवर घेते पण वडील खांद्यावर घेतात कारण, त्यांनाच फक्त असं वाटतं की, आपण जे पाहतोय त्यापेक्षाही सुंदर आणि मोठ काहीतरी माझ्या मुलाने पाहावं...

'कुत्र्याला गती आणि भावकीला प्रगती' कधीच बघवत नाही या म्हणी प्रमाणे दुसऱ्याची प्रगती न बघवणाऱ्या आजच्या जगात फक्त एकंच व्यक्ती आहे जिला असं वाटत की, माझ्या मुलाने माझ्या पेक्षाही मोठं व्हावं, मी जे केलं त्यापेक्षाही त्यानं मोठ काहीतरी करावं म्हणूनच .....

वडील म्हणजे खंबीर नेतृत्व
आयुष्यभराची साथ
वागायला कठोर तर
डोक्यावर आशीर्वादाचा हात

चालता चालता ठेच लागली तर, आई गं असं आपण म्हणतो पण रस्त्यावर झालेला एखादा अपघात पाहून बापरे ! असं... छोट्या छोट्या गोष्टींसाठी, अडचणीसाठी बापच लागतो. 'आयुष्याचा खरा आधारस्तंभ म्हणजे बाप' 'आई घराचे



मांगल्य असते, तर बाप घराचे अस्तित्व' पण या अस्तित्वाला आपण कधी समजून घेतलंय का? बापाचे अस्तित्व तेंव्हा समजतं जेंव्हा बापाची पूर्ण जबाबदारी आपल्यावर येते. बापाचा हात डोक्यावरून निसटतो तेंव्हा बाप आठवतो, तेंव्हाची प्रत्येक सकाळ ही जबाबदारीची आठवण करून उठवणारी असते.

आईकडे अश्रूंचा घाट असतो
तर बापाकडे संयमाचे पाट

माता जिजाऊनी शिवराय घडविले असं आपण म्हणतो पण, त्याच वेळी शहाजीराजांची ओढाताण सुद्धा लक्षात घ्यावी, देवकी- यशोदेचं कौतुक अवश्य करावं पण पुरातून मुलाला डोक्यावर घेऊन जाणारा वासुदेव देखील डोळ्यासमोर ठेवावा, राम कौशल्येचा पुत्र जरूर आहे पण, पुत्रवियोगाने मरण पावणारा पिता दशरथ होता. म्हणूनच आयुष्यातला खरा हिरो हा बाप असतो.

आजकाल बरेच days साजरे केले जातात तसा father day पण साजरा केला जातो.. पण कसा? तर वडिलांचा फोटो dp किंवा status ला ठेऊन पण, मला असं वाटत की, आपण काय बापासाठी स्टेटस ठेवणार? आपलं status चं बापामुळे आहे आणि फक्त एक दिवस बापासाठी नसतो तर, तर सगळे दिवस हे बापामुळे असतात.

म्हणूनच म्हणते ....

लय अवघड हाय रं गड्या,
उमगाया बाप रं उमगाया बाप रं....

★ ★ ★

रायगड

आज रायगड स्वप्नात आला अन कळवळून माझ्याशी बोलला
सुख - दुख पहिले मी, वय झाले आता थकलो की
काय रुबाब होता माझा, आता घाणीने व्यापलो मी
काही भाग ठिसूळ झाला, काही तुम्ही रंगवून टाकला
राजांची ती राजधानी तुम्ही विसरत चालला रे
वय झाले आता तरी लक्ष द्या रे
फिरायला येऊन फोटो काढण्याअगोदर माझी स्थिती तरी बघा रे
स्वतःची घरे सजवली पण ज्यांच्यामुळे घरे राहिली
त्या राजांच्या घराकडे थोडं तरी बघा रे
लोक विचारतात मला सांग रायगडा कसा होता आमचा राजा
हे सांगण्यासाठी मला जिवंत तरी ठेवा रे

कु.ईश्वरी चौधरी
बी.कॉम. भाग १




एक यशस्वी जीवनसंघर्ष - कालिदास

दीपक कोंडके
बी.कॉम.भाग १

संघर्षाचा वारसा असलेल्या सह्याद्रीच्या डोंगररांगा, शिवरायांच्या आणि महान क्रांतिकारकांच्या पराक्रमांचा शिवाय कित्येक मावळ्यांच्या बलिदानास साक्षीदार असलेला हा प्रदेश म्हणजे वाई. येथून साधारणपणे २० किमी अंतरावर 'काळूबाई देवी' साठी प्रसिद्ध असणारे मांढरदेव आणि त्याच्याच बाजूला स्वातंत्र्याच्या इतक्या वर्षानंतरही अनेक सुविधांपासून वंचित असणारी ४० ते ५० उंबरा असणारी गेडगेवाडी.. जिथं चालतो लोकांचा जीवनसंघर्ष स्वतःशी, निसर्गाशी आणि परिस्थितीशी, आणि याच गावात अठराविश्वे दारिद्र्य असणाऱ्या हिरवे दाम्पत्याच्या पोटी २४ सप्टेंबर १९९१ या दिवशी 'कालिदास' नावाचं रत्न जन्माला आलं, येणाऱ्या काही वर्षात हेच रत्न आपल्या गावाचे नाव देशपातळीवर उज्वल करेल हे कोणाला स्वप्नातही वाटले नव्हते.

'बाळाचे पाय पाळण्यात दिसतात' या म्हणीप्रमाणे त्याच्या अशिक्षित आई-वडिलांना हा पुढे जाऊन काहीतरी वेगळे करणार याची जाणीव त्याच्या हालचालीतूनच झाली असावी, म्हणूनच त्यांनी पुढील काळात कालिदास जे काही करत आहे त्याला प्रोत्साहन देण्यास सुरवात केली. डोंगर- दऱ्याचा प्रदेश, लहानपणापसून अनवाणी फिरण्याची सवय यामुळे लहानपणीच त्याच्या तळव्यांना संघर्षाची जाणीव झाली असावी, जवळच असणाऱ्या भिवजेवाडी मध्ये त्याच्या शिक्षणाचा श्रीगणेशा झाला. उड्या मारणे, झाडावर चढणे आणि वेगवेगळे खेळ खेळणे आणि वाटला तर अभ्यास करणे यामुळे इथेचं त्याच्या शरीराची घडण होण्यास सुरवात झाली. पुढील टप्पा हा कालीदासच्या आयुष्याला कलाटणी देणारा ठरला. माध्यमिक शिक्षण घेण्यासाठी त्याने मांढरदेव येथील 'न्यू इंग्लिश स्कूल' मध्ये प्रवेश घेतला. लहानपणापासून धावण्याबरोबर खो-खो ची आवड होती, वाऱ्याच्या विरुद्ध दिशेने चीत्त्याच्या वेगाने धावणारा कालिदास प्रशिक्षक राजगुरू कोचळे यांच्या नजरेतून सुटणे शक्यचं नव्हते. कालिदासच्या अगोदर त्याच्या भविष्याची स्वप्ने कोणी पहिली असतील तर ती 'राजगुरू कोचळे' यांनी. आता गरज होती ती योग्य मार्गदर्शन करण्याची, त्यांनी कालिदासला मार्गदर्शन करण्यास सुरवात केली. दुसऱ्या बाजूला घरात दोन वेळ चूल पेटण्याची समस्या असलेला कालिदास एका बाजूला राष्ट्रीय स्तरावर खेळण्याची स्वप्ने पाहत होता, आई - वडिलांच्या विश्वासास पात्र ठरलेल्या कालिदासला आहे त्या परिस्थितीमध्ये पोटाला चिमटा काढून, आई - वडिलांनी सहकार्य केले. आठवणी सांगताना कालिदास म्हणतो की, वडिलांच्या खिशात २०० रु. असले तरी ते मला १५० रु. देत असतं, त्यामुळे मला त्यांच्या कष्टाची जाणीव सतत राहत असायची हे सांगताना आजही कालिदासचे डोळे पाणावलेले दिसले. याच धावण्याने पुढील काळात त्याची सर्व प्रकारची फी माफ होत गेली, आणि त्याला प्रेरणा भेटत गेली.



८ वी मध्ये असतानाच राष्ट्रीय स्तरावरील मैदानी स्पर्धेत सहभागी व्हायचे हे मनोमन ठरविले होते. त्यावेळी त्याला त्याचे प्रशिक्षक म्हणायचे, १०वी च्या बोर्ड परीक्षेत क्रमांक मिळविणे एकवेळ सोपे आहे पण मैदानी स्पर्धेत यश मिळविणे तितके सोपे नाही, त्यासाठी खूप संघर्ष आणि मेहनत करावी लागते. ज्याला सतत पुढे जायचे असते तो मागे वळून पाहत नाही, निश्चय केल्याप्रमाणे एकाच वर्षात राष्ट्रीय स्पर्धेत सहभाग घेतला, आणि पुढील दोन वर्षात त्याने राष्ट्रीय स्तरावर क्रमांक मिळवला. यानंतर त्याने कधीच मागे वळून पहिले नाही, धावणे हा त्याच्या जीवनाचा अविभाज्य घटकचं बनला होता. पुढील शिक्षणासाठी किसन वीर महाविद्यालय आणि कॅप्टन समीर पवार वाटचं पाहत होते. महाविद्यालयीन स्तरावर खेळत असताना समीर पवार यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यापीठाच्या अश्वमेध स्पर्धेत सहभागी होऊन विद्यापीठाचा २०१०- ११ चा बेस्ट ॲथलिटीक पुरस्कार प्राप्त केला. आजही जेंव्हा जेंव्हा कॅप्टन समीर पवार आम्हाला खेळाविषयी मार्गदर्शन करतात तेंव्हा कालिदासचे उदाहरण आवर्जुन देतात. जसजसे दिवस जात होते तसा कालिदासचा संघर्ष सार्थकी लागत होता, आता राष्ट्रीय स्तरावरील उत्कृष्ट धावपटू म्हणून त्याची ओळख निर्माण झाली होती. आता त्याला खुणावत होती ती '४२ कि.मी. ची पुणे मॅरॉथॉन स्पर्धा, आता त्याने पूर्ण लक्ष त्या स्पर्धेवर केंद्रित केले. या स्पर्धेत देशभरातील अनुभवी खेळाडू सहभागी होतात हे त्याला माहित होतं. काट्याकुट्यात, डोंगरदऱ्यात दिवसाच्या तिन्हीप्रहरी अनवाणी सराव केलेल्या कालिदासने हे आव्हान स्वीकारण्याचे ठरविले. सकाळ, दुपार आणि संध्याकाळ अशा वेगवेगळ्या वेळी दररोज सहा तास सराव आणि राजगुरू कोचळे सरांचे योग्य मार्गदर्शन यामुळे तो पुन्हा स्वतःला सिध्द करण्यास तयार झाला. अनेक स्पर्धांचा अनुभव पाठीशी होता, २०१८ मधील हाफ मॅरॉथॉनचा राष्ट्रीय विक्रम त्याच्याच नावावर होता. त्यावेळी त्याने २१ किमी अंतर १ तास ३ मिनिटे आणि ४६ सेकंदात पार केले होते. मात्र पुणे मॅरॉथॉन ही ४२ किमी ची स्पर्धा होती.

वेगवेगळ्या वेळी, वेगवेगळ्या पद्धतीने, वेगवेगळ्या ठिकाणी सराव करून पूर्ण आत्मविश्वासाने त्याने या अव्वल स्पर्धेसाठी स्वतःला सज्ञ केले. प्रशिक्षक, कुटुंब आणि हितचिंतक या सर्वांचा आशीर्वाद घेऊन तो हे आव्हान पेलण्यास सिद्ध झाला, सिग्नल मिळताच आपल्या प्रत्येक पावलावर नियंत्रण ठेऊन, आजूबाजूच्या आवाजाला रोखत, स्वतः ला सेट करून त्याने धावण्यास सुरवात केली. आज एक अटल निर्धार करूनच कालिदास मैदानात उतरला होता, उर्जेच्या स्फोटाने, सर्व शंका आणि भीती सोडून त्याने अंतिम रेषा ओलांडली आणि पुणे मॅरॉथॉनचा विजेता बनला. त्याने घेतलेला वेळ होता, २ तास २४ मिनिटे ३२ सेकंद, स्पर्धा जिंकल्यानंतर आपल्या कुटुंबाला आणि प्रशिक्षकाला मिठी मारताना त्याच्या डोळ्यातून आनंदाश्रू वाहत होते. पुढे २०२३ च्या टाटा मुंबई मॅरॉथॉन, जी आशिया खंडातील नामांकित स्पर्धा म्हणून ओळखली जाते, त्यामध्ये तिसरा क्रमांक मिळविला. आजपर्यंत कालिदासने जवळपास ८० पेक्षा जास्त राष्ट्रीय स्पर्धेत भाग घेऊन २० पेक्षा जास्त मेडल मिळविले आहेत, शिवाय एका इंटरनॅशनल स्पर्धेत सहभाग घेतला आहे. अशा प्रकारच्या खेळाडूचा गौरव होणे क्रमप्राप्तच आहे, म्हणूनच महाराष्ट्र शासनाने २०१७-१८ चा 'शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार' देऊन त्याला सन्मानित केले.

आज याच स्पर्धांच्या जोरावर कालिदास एलआयसी मध्ये क्लास टू च्या पदावर नोकरीस आहे, याचे सारे श्रेय तो त्याचे प्रशिक्षक राजगुरू कोचळे आणि आई- वडिलांना देतो. आमच्यासारख्या कित्येक तरुणांचा कालिदास आज आदर्श बनला आहे, जेंव्हा जेंव्हा तो आम्हाला भेटतो तेंव्हा तो सांगतो की, खेळाकडे एक करियर म्हणून पहा, ठरविलेल्या ध्येयापासून विचलित होऊ नका, सरावात प्रामाणिकपणा आणि सातत्य ठेवा एक दिवस नक्की तुमचा असेल..... आज आम्ही कित्येक तरुण कालिदासचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून मैदानी स्पर्धेकडे सकारात्मक दृष्टीकोनातून पाहतो, आमच्यापैकी अनेकजण यामध्ये यशस्वीदेखील झाले आहेत, याचा आम्हाला खूप अभिमान वाटतो. शेवटी एवढेच म्हणावेसे वाटते....

धन्य ते माता - पिता।
धन्य ते प्रशिक्षक।
आणि धन्य तो कालिदास

★ ★ ★

किल्लारी ते वाई.....

अभिजित पवार
बी.ए- भाग ३

३० सप्टेंबर १९९३ च्या महाप्रलयंकारी भूकंपाने संपूर्ण महाराष्ट्राला परिचित असणारे किल्लारी गाव आणि इथून साधारण ५ कि.मी. च्या अंतरावर असणाऱ्या कार्ला गावात एका शेतकरी कुटुंबात माझा जन्म झाला. तसं पाहायला गेलं तर हा परिसर म्हणजे निसर्गाच्या अवकृपेचा प्रदेश, कधी अवकाळीचे संकट तर कधी भयानक दुष्काळ, त्यामुळे शेती असून नसल्यासारखी, एक तर पिकत नाही, आणि पिकलं तर हाती लागत नाही आणि हाती लागलं तर बाजारभाव सापडत नाही, अशा तिहेरी संकटातील शेती, त्यामुळे इथला शेतकरी हा नेहमीच अडचणीत सापडलेला आहे. आम्ही तिघे भाऊ, त्यापैकी सर्वात लहान मी, जमीन बऱ्यापैकी असल्याने मामाने आमच्या आईचे लग्न आमच्या वडिलांसोबत लावून दिले. पण निसर्गाने आमच्या वडिलांना कधीच साथ दिली नाही, शेतीला पर्याय म्हणून इकडून - तिकडून कर्ज काढून त्यांनी छोटेसे हॉटेल सुरु केले. पुढचे काही दिवस सगळे काही ठीक चालले होते. परंतु अचानक कोणाची तरी नजर लागावी आणि क्षणात सर्व विस्कटून जावं असंच काही घडलं. वडील दारूच्या व्यसनाच्या आहारी जाऊ लागले. खाजगी सावकारांचे आणि बँकेचे कर्ज हळूहळू वाढू लागले. सततच्या दुष्काळाने पिकांचा खर्च देखील निघत नव्हता, आणि एखाद्या वर्षी पिक चांगले आले तर अवकाळीने हातातोंडला आलेला घास हिरावून घेतला जाऊ लागला.

बेभरवशाची शेती आणि सावकाराचा सततचा तगादा त्यामुळे वैतागलेल्या वडिलानी जमीन सावकारांना लिहून दिली. हळूहळू वेगवेगळ्या कारणाने घरात वाद वाढू लागले आणि त्यातून वडिलांचे व्यसन वाढतच गेले. याचा परिणाम म्हणजे, शेवटी जे व्हायला नको होते तेच आमच्या बाबतीत घडले. त्यावेळी मी दुसरीमध्ये असेन, रविवार दि.१९/ ०६/२०११ साधारण दुपारी तीन- साडेतीन ची वेळ, वडील घरी एकटेच होते, आम्ही सुट्टी असल्याने आईसोबत शेतात गेलो होतो. कर्जबाजारी झालेल्या आमच्या वडिलांनी मागचा - पुढचा कोणताही विचार न करता गळफास घेऊन आत्महत्या केली. वैऱ्यावर येऊ नये ती वेळ आमच्यावर आली. आता पुढे काय? हा प्रश्न आई समोर उभा राहिला. एका बाजूला पोटाची खळगी भरणे आणि दुसऱ्या बाजूला आमचे शिक्षण त्यामुळे आम्हा तिघां भावंडाची जबाबदारी पेलण्यासाठी आईला मोलमजुरी करण्याशिवाय आता पर्याय नव्हता. अशा कठीण प्रसंगी मामाची खूप मोठी मदत होत होती. आजही होत आहे. आई दिवसभर कामाला जात असल्याने आम्हा भावंडाची घरी सतत भांडणे होत असतं. नाईलाजाने मला आठवीत असताना लातूर या ठिकाणी बोर्डिंगला घालण्यात आले, परंतु खर्च परवडत नसल्याने पुन्हा गावी आणण्यात आले. मोठ्या भावाला आर्थिक परिस्थिती अभावी शिक्षण सोडावे लागले. मधला भाऊ १० वी पास झाला होता, त्याच्या पुढील शिक्षणाचा प्रश्न निर्माण झाला होता.त्याचवेळी तहसीलदार मार्फत गावच्या तलाठ्याला कळविण्यात आले की, तुमच्या परिसरात काही आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांनी मुले असतील तर माहिती कळवा, सातारा जिल्ह्यातील वाई या ठिकाणी या मुलांच्या शिक्षणाची संपूर्ण जबाबदारी जनता शिक्षण संस्थेने उचलली आहे. थोड्याच दिवसात जनता शिक्षण संस्था वाई, येथील काही प्राध्यापक आमच्या घरी आले. आपल्या मुलाची पुढील शिक्षणाची सोय होणार म्हणून आमच्या आईला खूप आनंद झाला, आणि ताबडतोब मधल्या भावाला वाईला पाठविण्याचा निर्णय आई आणि मामाने घेतला. त्याने ११ वी साठी किसन वीर



महाविद्यालयात प्रवेश घेतला, इकडे मी आईसोबत २५ रु मजुरीने जाऊन शिक्षण घेऊ लागलो, त्यानंतर १० मध्ये कधी मळणी यंत्रावर तर कधी किल्लारी येथे पेट्रोल पंपावर काम करून माझ्या परीने कुटुंबाला हातभार लावून आईला मदत करू लागलो.

एका बाजूला मधल्या भावाचा शिक्षणाचा प्रश्न मिटला होता, मधल्या काळात कोरोनाचे संकट आले, सर्व व्यवस्था ठप्प झाली असताना त्याने गावाकडे न येता तिथेच एका हॉटेलमध्ये काम करण्याचा निर्णय झाला, याच काळात माझी देखील १०वी पूर्ण झाली. आता गावी काय करायचे म्हणून त्याने मला देखील वाईला येण्यास सांगितले. आणि मी सनई हॉटेल मध्ये काम करण्यास सुरवात केली. कोरोनाचा कालावधी असल्याने हॉटेलमध्ये काम करता करता माझी १२ वी पूर्ण झाली. एकाच घरातील दोघांनी एकाच वेळी मोफत शिक्षण घेण्याचा लाभ घेणे माझ्या मधल्या भावाला आवडले नाही, त्याने माझा बी.ए ला किसन वीर महाविद्यालयात प्रवेश घेतला आणि हॉटेल मध्ये कामाला असल्याने तिथेच राहण्यास सांगितले. २०२२ मध्ये मधल्या भावाचे ग्रॅज्युएशन पूर्ण झाले आणि त्याने लाँसाठी अहमदनगरला प्रवेश घेतेला. त्यानंतर जनता शिक्षण संस्थेचे सचिव, महाविद्यालयाचे प्राचार्य आणि वसतीगृहाचे समन्वयक डॉ. आनंद घोरपडे यांच्या परवानगीने जून २०२२ मध्ये मी किसन वीर महाविद्यालयाच्या 'जय किसान मुलांचे वसतिगृह' मध्ये राहण्यास आलो. यापुढे राहण्याचा, खाण्याचा, सर्वप्रकारच्या फीचा, शिवाय दवाखाना यासारख्या सर्व प्रकारच्या खर्चाचा प्रश्न मिटला होता.पुढे काही दिवस रात्रीच्या वेळी कुटुंबाला मदत म्हणून हॉटेलमध्ये काम करणे सुरूच होते. महाविद्यालयात मिळणारे सर्वांचे प्रेम, वसतिगृह अधिक्षक कवडे सर यांचे सर्व विद्यार्थ्यांसोबत असणारे जिव्हाळ्याचे संबंध आणि सहकार्य पाहून जग खूप सुंदर आहे याची जाणीव होऊ लागली. जीवनाकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलू लागला, एनसीसी मुळे जीवनात शिस्तीचे महत्व समजले. ज्यांच्या संकल्पनेतून आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या मुलांसाठी ही योजना सुरु करण्यात आली ते म्हणजे, जनता शिक्षण संस्थेचे विश्वस्त आणि आम्हा कित्येक अनाथांचे पालनकर्ते आदरणीय प्रतापराव भोसले (भाऊ) यांच्या उपकाराची फेड करणे या जन्मी तरी शक्य नाही, सहवास, सानिध्य, माणुसकी, आपुलकी अशा अनेक नव्या शब्दांनी, विचारांनी, नात्यांनी माझा प्रवास सुरु झाला होता.वसतिगृहात नवनवे अनुभव मिळत होते.जय किसान मुलांचे वसतिगृह म्हटलं की, आमच्या अगोदरच्या बॅचचा विद्यार्थी ज्ञानेश्वर चौधरी याने आदरणीय भाऊंच्या जीवनावर लिहिलेली एक सुंदर कविता फ्रेम करून वसतिगृहात लावलेली आहे.त्या कवितेतील काही ओळी मला इथे आवर्जुन सांगाव्या वाटतात...

आभाळ होता बाप आणि माय होती धरती
तेंव्हा नजर पडली भाऊंची आम्हा पाखारांवरती,
कार्य तुमचे पाहून भाऊ, देव सुद्धा जळेल
बदलेन जीवन आमचं, उद्या जगाला कळेल,
असेल जर जगात देव, तो नसेल कुठे गाभाऱ्यात
दर्शन त्याचे घडले मजला,
भाऊंसारख्या मानव रुपात

यापेक्षा या देवमाणसाचे वर्णन मी करू शकत नाही, आजही भाऊंना तब्बेतीच्या कारणाने महाविद्यालयात येता येत नाही परंतु, आम्ही जेंव्हा जेंव्हा भेटायला जातो तेंव्हा आमची आपुलकीने चौकशी करतात. त्याचबरोबर संस्थेचे विद्यमान अध्यक्ष आदरणीय दादा यांचे विशेष लक्ष आमच्यावर असते, आमची आपुलकीने वारंवार चौकशी करतात.

लहानपणापासूनच भरतीचे आकर्षण असल्याने मी पूर्णपणे पोलीस भरती आणि आर्मी याकडे लक्ष केंद्रित केले होते. परंतु दोन्हीमध्ये थोडक्यात अपयश आले, आता बी.ए च्या शेवटच्या वर्षाला असताना ६० दिवसाचे BBCS (ब्लॉक बॉरेट कॉमबॅक्ट सर्विस)चे प्रशिक्षण पूर्ण झाले असून मेडिकल, कागदपत्रे तपासणी झाली आहे. थोड्याच दिवसात ऑर्डर येईल, पुढच्या वर्षी मधल्या भावाला वकिलीची डिग्री मिळेल, बघता बघता दिवस कसे गेले ते कळलंच नाही. आम्हा भावंडाच्या खेळण्या बागडण्याच्या वयात वडिलांचे छत्र हरपल्याने निर्माण झालेली पोकळी जनता शिक्षण संस्थेच्या परिवारात भरून निघाली, प्राचार्य, वसतिगृह अधीक्षक डॉ. अमोल कवडे, सर्व प्राध्यापक, कर्मचारी यांच्याकडून भरभरून प्रेम मिळाले, भविष्यात कुठेही गेलो तरी किसन वीर महाविद्यालय आणि 'जय किसान मुलांचे वसतिगृह' यांची ओढ कायम राहील.

★ ★ ★

ती भयानक रात्र ....

कु.संचिता विकास मोरे
बी.एस्सी. भाग २

ॲमेडॉर नावचं एक छोटसं शहर होतं. तेथील बहुतांशी लोक एकमेकांना ओळखत होते. त्या शहरत जेनी नावाची एक सुंदर आणि हुशार मुलगी रहायची. ती एक हॉकी खेळाडू होती, तिने नुकतेच एका स्टोअर मध्ये काम करायला सुरवात केली होती शिवाय ती कॉलेजमध्ये शिकतदेखील होती, एक उत्तम हॉकी खेळाडू म्हणून ती महाविद्यालयात प्रसिद्ध होती. आज तिच्या नोकरीचा तिसरा दिवस होता. त्या ठिकाणी ती तिची मैत्रीण निकी आणि केबीथ असे तिघेजण काम करत होते.

एके दिवशी रात्रीचे १० वाजले होते. सर्व हिसाब - किताब करून स्टोअर बंद करणार एवढ्यात दरवाजातून दोन माणसे आत शिरली. त्यांच्या तोंडावर मास्क आणि हातात हातामध्ये १२ गेजची शॉटगन होती, जेनीला सर्वप्रथम या गोष्टीवर विश्वासचं बसला नाही. कोणीतरी आपली मस्करी करत आहे असे तिला वाटले. परंतु काही क्षणात त्यांनी धमकाविण्यास सुरवात केली आणि गल्ल्यातील सर्व पैशाची मागणी केली. तिने आजूबाजूला पहिले त्यावेळी तिच्या लक्षात आले की निकी आणि जेनीथ एका कपाटामागे लपून हा सर्व प्रकार पाहत आहेत. इतक्यात त्या दोघांमधील एकाने त्या दोघांना पकडले आणि त्यांच्यावर गण रोखली आणि एकाने जेनिकडून पैसे घेतले आणि बाहेर उभ्या असलेल्या गाडीची चावी मागितली, ती गाडी निकीची होती. त्या तिघानाही वाटले की, ते गाडी घेतील आणि निघून जातील पण तसं झालं नाही. त्यांना धमकी देऊन गाडीत बसायला लावले आणि गाडी पार्किंगमधून बाहेर काढली. काही अंतर पार केल्यावर एक जण जेनिशी बोलू लागला जस की तो तिला आधीपासूनच ओळखत होता. तिच्या खेळाबद्दल, घरच्यांबद्दल, त्यांनी जेनी, निकी आणि केमीथला गनपॉईटवर ठेवून कीडनॅप केलं होतं. अनपेक्षितपणे त्या रात्री त्यांच्या बाबतीत हा प्रकार घडला होता.

त्या दोघांपैकी एकाने तोंडाचा मास्क काढला आणि तिला आश्चर्याचा धक्काच बसला, कारण ती व्यक्ती दुसरी - तिसरी कोणी नसून तिच्याच वर्गातील रोबर्ट होता. क्लासमेट म्हटले तरी चालेल, त्याची गणना उनाड मुलांमध्ये केली जात. असे एक दिवस रस्त्याने जात असताना जेनीची छेड काढल्याने तिने त्याच्या कानाखाली लावली होती.त्याच्या अनेक वाईट कृत्यामुळे त्याला कॉलेजमधून काढूनही टाकण्यात आले होते. पण आपल्याबाबत तो असे काही करेल असे तिला स्वप्नातही वाटले नव्हते. तिने मनात विचार केला की, आता जीव वाचवायचा असेल तर काहीतरी युक्ती केली पाहिजे. तिने हिम्मत एकवटली आणि तुमचा प्लान तरी काय आहे असे धाडसाने विचारले. लवकरच कळेल... रोबर्ट मिस्कीलपणे हसत म्हणाला, आम्ही तुम्हाला पूर्ण सहकार्य करू, फक्त आम्हाला कळू द्या की तुमचा प्लान काय आहे,... जेनी विनंतीच्या स्वरात म्हणाली. त्याचा निर्णय घेणारी तू कोण? काय करायचे ते आम्ही ठरवू.. रोबर्ट जेनीवर ओरडून बोलला. इतक्यात पोलिसांच्या गाडीचा आवाज कानावर पडला, जेनी दरवाजा उघडून खाली उडी मारणार इतक्यात डोक्यावर बंदूक ठेवलेल्या निकी आणि जेनीथ यांचा विचार केला आणि निर्णय बदलला इतक्यात पोलिसांची गाडी अतिशय वेगाने पुढे निघूनही गेली. त्यांनी गाडी तिथून



हलविण्याचा निर्णय घेतला आणि त्या तिघांना पाठीमागे डिक्कीत बसविले. आतमध्ये श्वास गुदमरत होता, बाहेर काय चाललाय ते कळायला मार्ग नव्हता, पुढे काय होणार समजत नव्हते. जेनीला कॉलेजमध्ये रोबर्टला कानाखाली मारलेल्या गोष्टीचा पश्चाताप होत होता. आपल्या चुकीचे परिणाम निकी आणि केमीथला भोगावे लागत आहेत याचे तिला मनातून खूप वाईट वाटत होते, जवळपास दोन तासानंतर गाडी थांबली, बाहेर सर्वत्र अंधार होता, त्यांना बाहेर लढण्यात आले, आणि हात बांधून एका रांगेत उभे करण्यात आले. गन लोड केल्याचा आवाज आला. त्यावेळी समजले की आपल्याला मारायची तयारी सुरु आहे. इतक्यात एक गोळी झाडल्याचा आवाज आला. पण, ती कोणालाच लागली नाही. तिघांच्याही डोळ्यातून अश्रू वाहत होते. हात बांधल्याने काहीच करता येत नव्हते. आम्हाला सोडा, झालेला प्रकार आम्ही कोणालाच सांगणार नाही अशी विनंती करत होतो पण त्यांच्या पाषाण हृदयाला कसलाच पाझर फुटत नव्हता. त्यांनी क्रमाने तिघांवर तीन गोळ्या झाडल्या. केमीथ जाग्यावर कोसळला, जेनीच्या खांद्याला गोळीने स्पर्श केला तर, तिसरी निकीच्या पायावर लागली, आम्ही दोघेही जमिनीवर कोसळलो. मृत झाल्याची खात्री करण्यासाठी त्यांनी आम्हाला लाथा घालण्यास सुरवात केली. केमिथ जागीच गतप्राण झाला होता. तर जेनी श्वास रोखून शांत पडून होती, या गोंधळात निकी अंधारात कुठे गायब झाली होती, त्यामुळे दोघांपैकी एक निकीच्या शोधात होता. जेनी आणि केनिथ मृत झाल्याची खात्री झाल्याने, आता रोबर्ट देखील तिथून निघून गेला. सर्व शांत झाल्यावर जेनी कशीबशी उठली, पायातून रक्त वाहत होते, अंगात त्राण नसल्याने उभे राहत येईना. तिला कानावर आई-वडिलांचा आवाज आल्याचा भास झाला, जेनी उठ..., तुला काही झालं नाही..., आम्हाला खात्री आहे, तू जिंकणार ..., जेनीच्या अंगात नवा संचार आला आणि ती कशीबशी उठून उभी राहिली आणि केमिथ जवळ गेली, पण त्याने जगाचा निरोप घेतला होता, निकीला आवाज देणे शक्य नव्हते कारण, रोबर्ट आजूबाजूला असण्याची शक्याता होती. तिने आजूबाजूला पहिले काही अंतरावर एक दिवा दिसत होता. सर्व ताकत एकवटत आणि जीव मुठीत घेऊन ती. त्या दिशेने जाऊ लागली. वेळ किती झाला आहे काहीच कळायला मार्ग नव्हता. खूप वेळाने ती त्या दिव्याजवळ पोहोचली. तिथे एक छोटेसे घर होते. दरवाजा वाजवला आतून एक मध्यमवर्गीय वय असणारी व्यक्ती बाहेर आली. इतक्या मध्यरात्री रक्तबंबाळ अवस्थेत जेनीला पाहताच ती व्यक्ती भीतीने थरथर कापू लागली. इतक्यात त्याची पत्नी देखील डोळे चोळत बाहेर आली. मला अगोदर घरात घ्या मग मी तुम्हाला काय प्रकार आहे ते सांगते अशी विनवणी करताच त्या जोडप्याने परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन तिला घरात घेतले आणि दरवाजा बंद केला. त्यांनी तिला पिण्यासाठी पाणी दिले. जेनिने सर्व वृत्तांत त्यांना सांगितला. मग त्यांनी पोलिसांना फोन केला. जेनीचा भाऊ रिचर्ड पोलीस होता आणि आज त्याची नाईट होती. हवालदाराला झोप आवरत नसल्याने रिचर्डला घटनास्थळी जाण्यास सांगितले. रिचर्ड चार पाच तास झाले तरी जेनीचा फोन लागत नाही, आणि ती कामावरून घरीदेखील पोहोचली नाही यामुळे त्रस्त होता. नाईलाजाने तो घटनास्थळी पोहोचला, समोर अशा अवस्थेत जेनीला पाहून त्याने तिला मिठीच मारली. काही क्षणात स्वत:ला सावरत परिस्थिती काय आहे जाणून घेतली. ताबडतोब जेनीला हॉस्पिटलमध्ये पाठवून त्यांची टीम घटनास्थळी पोहोचली. पंचनामा केला, आणि केनिथची बॉडी ताब्यात घेतली, आजूबाजूला खूप शोध घेतला परंतु निकीचा मात्र शोध लागला नाही. २४ तासाच्या आत आरोपी रोबर्ट आणि त्याचा सहकारी यांना पोलिसांनी ताब्यात घेतले. आपल्या आजूबाजूला असणारी, आपल्याला ओळखणारी, वर्गमित्र असणारी व्यक्ती इतकी निर्दयी असू शकते, यावर अजून जेनीचा विश्वास बसत नव्हता.

कोर्टात केस सुरु झाली थोड्याच दिवसात प्रत्यक्ष साक्ष-पुराव्याच्या आधारे दोन्ही आरोपींना फाशीची शिक्षा सुनावण्यात आली. आजही जेनीच्या मनाच्या जखमा पूर्णपणे भरल्या नाहीत. काही दोष नसताना केनिथचा झालेला मृत्य, आणि अद्याप शोध न लागलेली जेनी, या गोष्टींचे रहस्य तिला उलगडत नव्हते, हळूहळू सर्व गोष्टी सकारात्मक घेऊन जेनीने आयुष्यात पुढे जाण्याचा निर्णय घेतला. आजही जेनी एका शहरातून दुसऱ्या शहरात निकीचा शोध घेत फिरत आहे...

★ ★ ★

कार्यकर्ते

वैभव त्रिगुणे
बी.कॉम. भाग ३

(देशात निवडणुकांची रणधुमाळी असल्याने, गावागावत, प्रत्येक चौकात, पारावर त्याचीच चर्चा सुरु असते, चार पक्षांचे चार कार्यकर्ते यंदा कोणता पक्ष बाजी मारणार, कोण सत्तेत येणारं, आमचा पक्ष इतरांपेक्षा कसा वेगळा आहे त्यामुळे यावेळी आमचीच सत्ता येणार यावर त्यांची जोरदार चर्चा सुरु असते.)

(दृश्य एक)

पहिला कार्यकर्ता : आजची हेडलाईन वाचली ना.. तुमच्या पक्षाला कसं खिंडार पडलं ते,

दुसरा कार्यकर्ता : (थोडा रागानेच) आम्हाला काय फरक पडत नाही, जे गेले ते कावळे अन् ...

पहिला कार्यकर्ता : बरं बरं... ..... उतरला नाही वाटतं अजून

दुसरा कार्यकर्ता : (छातीवर हात ठेऊन) कधीच उतरणार नाही, जोपर्यंत आमच्यासारखे निष्ठावंत आहेत, तोपर्यंत आमच्या पक्षाला काही फरक पडणार नाही.

पहिला कार्यकर्ता : बरं बरं... बघू किती आणखी दिवस निष्ठा टिकून राहते तुमची.

तिसरा कार्यकर्ता : (गालातल्या गालात हसत) मी काय म्हणतो, तुम्ही दोघे तर कालपर्यंत एकाच पक्षात होता ना, मग असं अचानक ...

दुसरा कार्यकर्ता : (चिडून) कालपर्यंत होतो पण आता नाही, त्या हरामखोर मंत्र्याने माती खाल्ली ना, गद्दार निघाला साला, गड्याचा मालक केला तरी जाणीव नाही. १० -१२ आमदार फोडून आमदारांना घेऊन स्वतंत्र पक्ष काढलाय म्हणे, आणि आता हे त्यांचे कार्यकर्ते.

तिसरा कार्यकर्ता : आमचं आपलं बरं आहे. खानदानी पक्ष, सत्ता असली काय अन नसली काय काही फरक पडत नाही... समाजसेवा करायची असेल तर सत्ता नसली तरी करता येते फक्त त्यासाठी इच्छाशक्ती पाहिजे, इच्छाशक्ती..

पहिला कार्यकर्ता : कळली तुमची इच्छाशक्ती, एकवेळ मासा पाण्याबाहेर दम धरेल पण ....., आले मोठे समाजसेवक, (जोरात हसतो)

चौथा कार्यकर्ता : (मोठ्याने हसत) खानदानी आणि निष्ठेची भाषा तुम्ही कोणीच करु नका, कारण तुमच्यात जे निष्ठेची आणि खानदानीची भाषा करत होते ना, त्यांच्यामुळेच आज आमचा पक्ष सत्तेत आहे.. आणि आज पुन्हा एका तुमच्या खानदानी मंत्र्याचा प्रवेश होतोय आमच्या पक्षात, बघा या घडीची हेडलाईन

तिसरा कार्यकर्ता : (हळू आवाजात पुटपुटत) मजबुरी आहे त्यांची, ते मनाने आमचेचं राहतील....

चौथा कार्यकर्ता : मी काय म्हणतो, कमी भ्रष्टाचार करायचा...

तिसरा कार्यकर्ता : (जाग्यावरून उठत) म्हणे भ्रष्टाचार... तुम्ही जसे काय धुतल्या तांदळासारखे...

पहिला कार्यकर्ता : (सुरात सूर मिसळत) हो तर काय, यांचा असा समज झाला आहे की, देश फक्त आम्हीच चालवू शकतो, आपण सर्व मूर्खचं आहोत...

दुसरा कार्यकर्ता : विकास होईल म्हणून जनतेने नवस केला आणि मंदी जन्माला आली, (जोरात हसतो) आता विकासाच्या नावाखाली देश लिलावात काढायचा बाकी आहे फक्त, पुन्हा गुलामी येणारं हे नक्की.



तिसरा कार्यकर्ता : ते काही असो, आता ही निवडणूक मात्र लोकांनीचं हातात घेतली आहे, यंदा परिवर्तन अटळ आहे, काही झालं तरी सत्ता आमचीच येणारं

पहिला कार्यकर्ता : (अंगावर येत) घंटा परिवर्तन... जनतेने कित्येक टर्म देऊन पहिली ना तुम्हाला सत्ता...., सगळा कर्जाचा डोंगर करून ठेवला आहे. तिजोरी तर खाली झालीच आहे. आता तिजोरीची किल्ली भंगारात विकली म्हणजे झालं... ते काही असो आज तरी देशाला आमच्याशिवाय पर्याय नाही.

दुसरा कार्यकर्ता : (तिघांकडे डोळे फिरवत) आम्ही सत्तेविना राहू पण, लाचार होणार नाही, विरोधात बसून जनतेची सेवा करू पण, कोणापुढे झुकणार नाही. बचेंगे तो और.....

चौथा कार्यकर्ता : म्हणजे आजचं पराभव मान्य केलेला दिसतोय ....(मिस्कीलपणे हसतो)

दुसरा कार्यकर्ता : सगळ्या यंत्रणा तुम्ही ताब्यात घेतल्यावर काय होणार ? अति तेथे माती, इतिहास साक्षी आहे. राजाचा रंक व्हायला वेळ लागत नाही. (निघायला उठतो)

चौथा कार्यकर्ता : (हात पकडत) तुमचं कसं आहे 'नाचता येईना अंगण वाकडे' बिनबुडाचे आरोप सगळे, उचलली जीभ अन् लावली ...

तिसरा कार्यकर्ता : मोबाईलमध्ये बघत बघत... झोंबल्या का मिरच्या..... हे बघ आमचा अजून एक नेता पक्ष सोडतोय (गद्दार सगळे)

दुसरा कार्यकर्ता : अरे खानदानी पक्ष ना तुमचा ? (जोरात हसतो)

पहिला कार्यकर्ता : (जाग्यावर उभा राहत) एवढं नक्की आहे आता जनतेला आणि या देशाला एकचं पर्याय... तो म्हणजे आम्ही होय आम्हीच, (हात वर करून) 'निवडून निवडून येणारं कोण, आमच्याशिवाय आहेच कोण'

चौथा कार्यकर्ता : घोडं मैदान लांब नाही, निकाल लागल्यावर तोंड दाखवा म्हणजे झालं ?

तिसरा कार्यकर्ता : बरं बरं, बघू बघू (रागाने उठून जातो)

(रात्रीच्या बारा वाजून गेल्याने सगळेच आपापल्या घरी निघून जातात, थोड्याच दिवसात निवडणूक होऊन, निकालाचा दिवस उजाडतो, कोणत्याच पक्षाला स्पष्ट बहुमत मिळत नाही, सत्तेचा तिढा काही केला सुटत नाही, शेवटी चारही पक्षांचे पक्षश्रेष्ठी मिळून मार्ग काढतात आणि सगळेच सत्तेत सहभागी होण्याचा निर्णय घेतात, समंजसपणे आणि शांततेत खातेवाटप होते. काही दिवसानंतर हे कार्यकर्ते पुन्हा भेटतात.)

(दृश्य दोन)

पहिला कार्यकर्ता : (सर्वाना उद्देशून) साले, सगळे मिलीभगत, आपणच नालायक...

दुसरा कार्यकर्ता : (गंभीरपणे) कसली निष्ठा अन कसलं काय... यांच्या नादाला लागण्यापेक्षा काहीतरी धंदा केलेला बरा, पक्षवाढीसाठी आम्ही कित्येकांसोबत दुष्मनी घेतली, कित्येक मारामाऱ्या केल्या.

तिसरा कार्यकर्ता : (कपाळावर आठ्या आणून) राजकारणात खानदानी वैगैरे काही नसतं हे आज कळलं,

'सरड्याला पण आज लाज वाटत असेल,' यांच्यामुळे आमच्यात तीन पिढ्यापासून वैर आहे.

चौथा कार्यकर्ता : (डोकं खाजवत) मला वाटतं सगळं आधीच ठरलेलं असावं, आपण खुळ्यात निघालो, तुमचं काहीच नाही मित्रानो... यां राजकारण्यांच्या नादाला लागून दंगलीत सहभागी झालो, अंगावर गुन्हा पडला आणि माझं पोलीस होण्याचं स्वप्न भंग पावले. या पुढाऱ्यांच्या नादी लागणे म्हणजे उंटाचा मुका घेण्यासारखे आहे.

(चौघेही एकमेकांच्या हातात हात मिळवतात, जीवनात येऊन कुटुंबासाठी आणि आपल्या भविष्यासाठी काही तरी करूया असा निश्चय करतात. आजपासून राजकारण हा विषय आपल्यासाठी कायमचा बंद म्हणून चहा पिण्यासाठी जातात)

★ ★ ★

डोंगरातील भटकंती

विजय गोकुळ सोनवणे
बी.कॉम. भाग ३

वाई सोडताच पाचगणीचा घाट सुरु होतो. घाट सुरु होण्याच्या थोडं अलीकडे, घाटाच्या पायथ्याला म्हणले तरी चालेल, निसर्गाच्या सानिध्यात असणारे महाविद्यालय म्हणजे आमचे किसन वीर महाविद्यालय, एका बाजूला सोनजाईचा डोंगर, एका बाजूला पाचगणीचा डोंगर आणि उत्तरेला काळूबाईचा डोंगर... अशा या निसर्गरम्य परिसरातील आमचे महाविद्यालय आणि सोनजाई डोंगराच्या पायथ्याला असणारे आमचे 'जय किसान मुलांचे वसतिगृह, अशा या परिसरामुळे या तीन वर्षात आम्हाला इतरत्र पर्यटन करण्याची कधी गरजचं भासली नाही. शनिवार आणि रविवार म्हणजे आम्हा वसतिगृहातील मुलांसाठी एका बाजूने जबाबदारीचे आणि दुसऱ्या बाजूने आनंदाचे दिवस, आनंद यासाठी की, आमचे वसतिगृहप्रमुख हे दर शनिवार आणि रविवार पुण्याला जायचे, त्यामुळे त्या काळात आम्हाला पूर्ण स्वातंत्र्य असायचे, जबाबदारी या अर्थाने की, त्या दोन दिवसात वसतिगृहाची शिस्त राखायची जबाबदारी आम्हा वसतिगृहातील सर्व विद्यार्थ्यांची असायची, सरांची सर्वाना सक्त ताकीद असायची की, तुमच्यापैकी एकाने जरी मी इथे नसताना गैरवर्तन केले तर, मी वसतिगृह प्रमुख पद सोडणार, सरांनी वसतिगृहप्रमुख पद सोडणे आमच्यासाठी परवडणारे नव्हते. कारण खूप दिवसानंतर आम्हाला समजून घेणारे, आमच्याशी मित्रांप्रमाणे वागणारे, वसतिगृहाला कुटुंबाप्रमाणे मानणारे, वसतिगृहाच्या भानगडी वसतिगृहातच मिटवणारे आणि आवश्यक तिथे कडक शिस्त राखणारे वसतिगृहप्रमुख आम्हाला लाभले होते.

नेहमीप्रमाणे सर सर्वाना जबाबदारीची जाणीव करून पुण्याच्या दिशेने मार्गस्त झाले. शक्यतो सर जेंव्हा नसतील तेंव्हा आम्ही बाहेर जाणे कटाक्षाने टाळत असू, त्याला कारणही तसेच होते. आमच्यापैकी काहींनी सर नसताना बाहेर जाण्याचा प्रयत्न काही वेळा केला परंतु, सरांची फिल्डिंग एवढी जोरात असायची की, सरांना फोन करून वसतिगृहाची मुले वाईमध्ये फिरत आहेत हे कोणीतरी सांगत असे, आणि सोबत पुरावा म्हणून फोटोही पाठवत असतं, त्यामुळे लबाड बोलायला जागाच शिल्लक नसायची. त्यामुळे आम्हाला जे काय करायचे ते गेटच्या आतमध्येच... डोंगराच्या पायथ्याला असणारे महाविद्यालयाचे वरचे टोक, म्हणजे आमचे वसतिगृह, खिडकीतून बाहेर डोकावताच बाहेर भला मोठा डोंगर, अर्धा डोंगर चढून गेले की गणपती मंदिर आणि पूर्ण सपाटीवर गेले की, काही अंतरावर सोनजाई देवी आणि खालच्या बाजूला असणारे धरण...

सर वसतिगृहप्रमुख झाल्यापासून वसतिगृहाची कामे आम्हालाच करावी लागत असतं, झाडांना पाणी घालणे, प्रत्येकाने एक दिवस याप्रमाणे झाडू मारणे आणि १५ दिवसातून एकदा सामुदायिक स्वच्छता करणे,



ठरल्याप्रमाणे रविवारी झाडांना पाणी घालून झाल्यानंतर वसतिगृह स्वच्छ करण्याची मोहीम आम्ही हाती घेतली. नंतर जेवण केले, जेवण झाल्यानंतर वेळ जात नसल्याने आम्ही काही जण एकत्र येऊन गप्पा मारत बसलो होतो. गप्पा मारता मारता कोणाच्यातरी डोक्यातून डोंगरावर जाण्याची संकल्पना आली. दुसरे एक नवीन सर वसतिगृहात राहण्यासाठी आले होते त्यांनीदेखील मी तुमच्यासोबत आहे म्हणून सहमती दर्शविली. पण थोड्याच वेळात त्या सरांनी निर्णय बदलला आणि तुमचं तुम्ही जावा मला काम आहे असे सांगून निघून गेले. नको, हो य म्हणता, म्हणता आमच्यात एकमत झाले. तसं पाहता ही आमची डोंगरात जाण्याची पहिलीच वेळ नव्हती, पण आम्ही परवानगी घेऊन जात होतो. आज मागचा पुढचा विचार न करता आम्ही डोंगराच्या दिशेने रवाना झालो. डोंगर खूप पसरट असल्याने वर जाण्यासठी अनेक पाऊलवाटा होत्या. त्या एकमेकांना पुढे मागे कुठेतरी जोडलेल्या असतं. आज नेहमीपेक्षा जास्त उत्साह असल्याने जवळपास अर्ध्या तासातच आम्ही गणपती मंदिराजवळ पोहचलो. कधी कधी मनाला प्रश्न पडायचा की, काय हेतू असेल या ठिकाणी मंदिर उभारण्याचा, मंदिर यासाठी की, आतमध्ये गणपतीची मूर्ती आहे म्हणून, त्याचे बांधकाम वैगरे काही नाही, साधारण ५ बाय ५ च्या जागेत तिन्ही बाजूनी आडोसा केल्यागत भिंती आणि वरून दोन पत्रे आणि उजेडासाठी एक सौर दिवा. पण दर चतुर्थीला इथे आवर्जून अनेक गणेशभक्त येतात. शिवाय भरतीची तयारी करणारी मुले अधूनमधून एका दमात इथपर्यंत डोंगर चढून येतात. साधारण अर्धा डोंगर चढून गेले की, हे छोटे गणेश मंदिर आहे, त्यानंतर पूर्ण डोंगर चढला की, सोनजाई देवी, गणपती मंदिराजवळ थोडी विश्रांती घेतल्यानंतर कुलदीपला (आमचा गोल्या) सोनजाई देवीची आठवण झाली, त्यामुळे आमचा मोर्चा सोनजाईच्या दिशेने निघाला. आज घड्याळाकडे कोणाचेच लक्ष नव्हते. आमच्यासोबत कधीच नसणारे वसतिगृहातील सर्वात हुशार विद्यार्थी वैभव, संकेत हेदेखील आज आमच्यासोबत असल्याने आम्ही आज जरा बिनधास्त होतो. सोनजाई देवीचे दर्शन घेतले. डोंगराच्या वरून आजूबाजूचा परिसर पाहण्यात वेगळीच मजा येते. तिथून निघणार इतक्यात अभिजित म्हणाला इथून थोड्या अंतरावर एका मोठा तलाव असून फोटो काढण्यासाठी खूप चांगला पॉइंट आहे, मग काय आम्ही सगळे मेंढरासारखे त्याच्या मागे तलावाच्या दिशेने निघालो.

दिवस मावळतीला गेल्याने अतिशय लक्षवेधक दृश्य निर्माण झाले होते, सर्वजण सेल्फी, ग्रुप फोटो घेण्यात दंग, अंधार पडू लागला आहे हे कोणाच्या लक्षातच आले नाही. आणि परत जाण्याचे नाव कोणाच्याच तोंडातून निघेना, बादशहाला ठेच लागताच आम्ही भानावर आलो आणि आता परत गेले पाहिजे याची सर्वाना जाणीव झाली. माझ्याप्रमाणे अभ्यासात कमी आणि अंगापिंडाने मजबूत असणारा अभिजित सर्वाना उद्देशून म्हणाला, काही काळजी करू नका, खाली उतरण्याचा एक जवळचा मार्ग आहे त्या मार्गाने आपण लवकर खाली पोहचू, आमचा उत्साह कधीच संपला होता. पायात आता त्राण राहिले नव्हते, बादशहा (खरं नाव सुमित) आणि संकेत उर्फ छोट्या हे आमच्यापैकी सर्वात लहान, आणि तिसरा कुलदीप यांना आधार देत, हाताला धरून मंद गतीने आमचा परतीचा प्रवास सुरु होता. थोडे अंतर चालून गेल्यावर अभिजित ज्या वाटेने घेऊन जात होता त्या वाटेला अजून दोन वाटा फुटत असल्याने आम्ही गोंधळून गेलो. वसतिगृहाची दिशा कोणाच्याचं लक्षात येत नव्हती. सर्वजण अभिजित सोबत वाद घालायला लागले. चमचमणाऱ्या लाईट पाहून कोण म्हणायचे या दिशेला कॉलेज आहे, मध्येच दिसणारा एखादा दिवा पाहून तो मैदानावरील लाईट आहे असे वाटत असे. आमच्यात काही एकमत होईना आणि आता विश्वास कोणावर ठेवायचा आणि खाली कसे जायचे हा मोठा प्रश्न आमच्यासमोर निर्माण झाला होता. ज्या मार्गाने पुढे जायचो त्या मार्गाला थोडे अंतर चालून गेले की, आणखी दोन तीन वाट फुटायच्या, आणि पुन्हा त्याच ठिकाणी आल्याचा भास व्हायचा, आमच्या ऐकण्यात होते की, काही दिवसापूर्वी इथे असाच एक ग्रुप फिरायला आला होता. रात्रीच्या अंधारात वाट सापडत नव्हती अंधारात काही लक्षात न आल्याने एक मुलगा कड्यावरून खाली कोसळला, सोबत असणाऱ्या मित्रांच्या लक्षात आले नाही. शेवटी नाही म्हणाले तरी आम्ही मनातून खूप घाबरलो होतो. अधूनमधून सर्वजण असल्याची खात्री करत होतो. फोन करून कोणाला सांगायचे तर आपण डोंगरात आलेलो कवडे सर, प्राचार्य यांना समजेल त्यामुळे फोन करायचा नाही यावर सर्वांचे एकमत झाले होते. गोल्याला चालता येत नसल्याने एका हातात चप्पल घेऊन, चवड्यावर बसून तो हळूहळू पुढे सरकत होता. सर्वांनी मोबाईलच्या बॅटऱ्या लावल्या होत्या. जवळपास रात्रीचे साडे सात वाजले तरी, रस्ता सापडत नव्हता, आज वेगळंच काहीतरी घडणार याची जाणीव हळूहळू सर्वाना झाली होती. एखाद्या झाडावर पांढरा कागद पाहून मनात वेगवेगळे विचार यायचे, गोल्या तर आता रडायलाचं लागला, तुमच्या नादी लागून फसलो असं म्हणत वैभव पश्चाताप व्यक्त करू लागला. काही वेळानंतर

डोंगरावर चमकणाऱ्या आमच्या मोबाईलच्या सात, आठ बॅटऱ्या गावकऱ्याना दिसल्या आणि त्यांनी ताबडतोब वन्यप्रेमी असणारे पप्पूदादा डोंगरे, आणि खरात सर यांना ही बातमी सांगितली. त्यांचा असा समज झाला की, वन्यप्राण्यांची शिकार करण्यासाठी शिकारी आले आहेत, आणि बघता - बघता ही बातमी पोलीस, वनविभाग यांच्यापर्यंत पोहोचली. थोड्याच वेळात पप्पू दादा आणि खरात सर आणि काही सहकारी बॅटऱ्या घेऊन डोंगराच्या दिशेने आले. आता त्यांच्यात आणि आमच्यात थोडेच अंतर उरले होते. त्यांच्या दृष्टीने आम्ही शिकारी आणि आमच्या दृष्टीने ते चोर, ते आम्हाला घाबरायचे आणि आम्ही त्यांना, हळूहळू आमच्यातील अंतर आता खूप कमी झाले होते परंतु, अंधारात चेहरे मात्र दिसत नव्हते. कोण आहे रे तुम्ही, आणि इकडे काय करत आहात ? हा आवाज ऐकल्यानंतर आमची काय अवस्था झाली असेल हे आम्हालाच माहित. परंतु आमच्यापैकी अभिजितला हा आवाज ओळखीचा वाटला आणि पप्पूदादा आम्ही होस्टेलची मुले असून रस्ता चुकलो आहोत असे म्हणताचं त्यांचा आणि आमचा जीव भांड्यात पडला. मग आम्ही त्यांच्या मदतीने, साडे आठ - नऊच्या दरम्यान वसतिगृहात पोहचलो. गुपचूप सर्वांनी जेवण केले. खूप दमल्याने आज पोट भरल्यासारखे वाटलेच नाही. आपापल्या रुममध्ये जाऊन शांत पडलो. ज्या सरांची आम्ही परवानगी घेतली ते निवांत त्यांच्या रुममध्ये बसले होते. कदाचित त्यांना हा प्रकार माहितचं नसावा. आणि रातोरात ही बातमी महाविद्यालयाचे प्राचार्य, समन्वयक घोरपडे सर आणि कवडे सर यांच्यापर्यंत पोहोचली. आजचा वसतिगृहातील आपला शेवटचा मुक्काम अशी आमच्या सर्वांची मनोमन भावना झाली. दुसऱ्या दिवशी आता पुढील निर्णय काय असेल तो प्राचार्य घेतील असं म्हणत आम्हा सर्वाना प्राचार्यांच्या केबिनकडे घेऊन जाण्यात आले. नुकताच महाविद्यालयाचा चार्ज घेतलेले प्राचार्य, त्यांचा स्वभाव याविषयी आम्हाला काहीच कल्पना नव्हती. रात्रीचा प्रसंग अगोदरच त्यांच्यापर्यंत जास्त रंगवून पोहचविण्यात आला होता. आम्ही आरोपीप्रमाणे खाली मान घालून त्यांच्यासमोर उभे होतो. रात्रीच्या घटनेचे गांभीर्य किती होते यावर त्यांनी जवळपास अर्धा तास लेक्चर दिले. आम्ही शांतपणे ऐकत होतो. आता आम्हाला सुटल्यासारखे वाटले पण खरी मजा तर पुढे होती. प्राचार्य म्हणाले की, झालेल्या गोष्टीची शिक्षा तर तुम्हाला भोगावीच लागणार आहे. आम्ही मनामध्ये एकच प्रार्थना करत होतो ती म्हणजे, फक्त वसतिगृहातून हाकलून देऊ नये, दुसरी कोणतीही शिक्षा भोगण्यास आम्ही तयार होतो. शेवटी प्राचार्य म्हणाले की, पुढील आठ दिवस दररोज २ तास याप्रमाणे तुम्ही महाविद्यालयाचा परिसर स्वच्छ करायचा, गवत काढणे, कचरा गोळा करणे इ. आणि दररोज कोणता परिसर साफ केला आहे याचा रिपोर्ट कवडे सर मला रोज करतील. कामात टाळाटाळ केल्यास शिक्षेचे स्वरूप वाढविण्यात येईल असा इशारा दिला आणि बाहेर जाण्याची परवानगी दिली. वसतिगृहातून काढून टाकले नाही यामुळे आम्ही मनातून खूप सुखावलो आणि दिलेली शिक्षा मनापासून स्वीकारली. कारण महाविद्यालय हे आमचेच होते. उद्याऐवजी आम्ही आजच कामाला सुरवात केली. ओळखीचा प्रत्येकजण विचारात असे, अरे हा काय प्रकार आहे? त्यावर आम्ही एकमेकांकडे पाहायचो आणि डोंगरातील पराक्रम एवढेच म्हणायचो... पुढील आठ दिवस न चुकता दररोज दोन तास याप्रमाणे महाविद्यालयाचा परिसर स्वच्छ करत होतो. आमचा हा पराक्रम हळूहळू सर्व महाविद्यालयाला माहित झाला होता. आजही जेंव्हा जेंव्हा आमचा डोंगरात जाण्याचा विषय निघतो तेंव्हा तेंव्हा आम्ही त्या दिवशीचे प्रसंग आठवून मनसोक्त हसतो...

★ ★ ★

रावण राजा राक्षसांचा


सायली किरण नवले
बी.ए. भाग ३

महाभारत आणि रामायण या महाकाव्यांवर आजपर्यंत अनेक विद्वान आणि लेखक यांनी मोठ्या प्रमाणात लेखन केलेलं आहे. यामधील एकेक पात्र हा कित्येक लेखकांच्या लेखनाचा विषय बनला आहे. रामायण या महाकाव्याचा विचार करता बहुतांशी सर्वांनी राम या पात्राला नायकत्व बहाल केलेले दिसते आणि त्यात गैर काहीच नाही. परंतु रावण या पात्राला आजपर्यंत योग्य तो न्याय मिळालेला दिसत नाही. बहुतांशी लेखकांनी रावणाला सर्वानुमते खलनायक ठरवून त्याला बंदिस्त केलेले दिसून येते, आजवर अनेकांच्या नजरेत खलनायक ठरलेला रावण 'रावण राजा राक्षसांचा' या कादंबरीतून एका वेगळ्या भूमिकेत प्रस्तुत कादंबरीचे लेखक शरद तांदळे यांनी साकारलेला दिसतो.

शरद तांदळे लिखित 'रावण राजा राक्षसांचा' ही कादंबरी वाचत असताना सर्वात प्रथम एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते, ती म्हणजे प्रथम रावण समजून घेतला पाहिजे. आजवर समाजाने आणि व्यवस्थेने खलनायक ठरवलेल्या रावणाला न्याय द्यायचा असेल तर तो ढोबळमानाने देता येणारं नाही. तांदळे यांनी ती जबाबदारी समर्थपणे पार पाडलेली दिशून येते. यापाठीमागे रावणाचे उदात्तीकरण करण्याचा हेतू आहे असे वाटण्याची शक्यता देखील नाकारता येत नाही, परंतु लेखकाने रावण समजावून सांगताना रामायणातील इतर पात्रांना कुठेही दोष दिलेले दिसून येते नाहीत, त्यामुळे केवळ एक उत्तम कलाकृती म्हणून या कादंबरीकडे पहावयास हवे. कादंबरी वाचल्यानंतर लक्षात येते की, आजपर्यंत केवळ खलनायक म्हणून ओळख असलेल्या एका महान शिवभक्ताला न्याय देण्याचा प्रामाणिक प्रयत्न या ठिकाणी लेखकाने केलेला आहे.

वालीसोबत कोणतीही दुष्मनी नसताना त्याला मारणारा राम, वैयक्तिक स्वार्थासाठी, भावाच्या विरोधात जाणारा बिभीषण, सख्या भावाच्या बायकोशी विवाह करणारा सुग्रीव यांच्यातील दोष दुर्लक्षित करून आपण त्यांना आदर्श मानत आलो आहे, परंतु आपल्या सावत्र बहिणीच्या आणि आईवर झालेल्या बलात्काराचा बदला घेणारा रावण याच्यातील केवळ दोषचं आपण पाहत आलेलो आहे. त्याच्या चांगुलपणाचा आजवर फारसा विचार झालेला दिसून येत नाही. कदाचित या कादंबरी लेखनामागील लेखकाचा हेतू रावणाची चांगली बाजू वाचकांसमोर मांडण्याचा असावा.

'रावण राजा राक्षसांचा' ही रामायणातील पराक्रमी, विद्वान, वेद्पंडीत लंकेच्या राजाची कथा असली, तरी आजपर्यंतच्या साहित्यातून दुर्गुणी, अवगुणी, आणि हिंसक रावणचं वाचकांसमोर उभा केलेला आहे. रावणसंहिता, कुमारतंत्र, सामवेदातील ऋचा, शिवतांडवस्तोत्र, वीणा,



बुद्धिबळ यांची निर्मिती करणारा रावण कित्येकांना कदाचित माहितच नाही. सर्व देवांना पराभूत करणारा, दैत्य, दानव, असूर आणि कित्येक भटक्या जमातींना एकत्र करून स्थैर्य आणि समृद्धी देणारा कुशल संघटक रावण आजवर आपल्याला विस्तृतपणे कोणी सांगितलाच नाही, याची जाणीव मात्र कादंबरी वाचत असताना वाचकांना झाल्याशिवाय राहत नाही.

अस्थिरतेच्या झुल्यावर तरंगणाऱ्या आजच्या तरुण पिढीला, प्रचंड महत्वाकांक्षा, प्रबळ इच्छाशक्ती, दृढ आत्मविश्वास, धैर्य, सामर्थ्य, न्याय - नितीमत्ता या गुणांचा समुच्चय असणारा आणि स्वतःच्या बुद्धीच्या बळावर स्व-अस्तित्व सिद्ध करणारा रावण, कादंबरी वाचल्यानंतर आदर्श वाटला तर त्यात आश्चर्य वाटण्यासारखे काही नाही. शेवटी कोणताही माणूस हा सर्वगुणसंपन्न नसतो, आवश्यकता असते ती व्यक्तीमधील दोष बाजूला सारून स्वीकारण्याची, आणि हाच धागा पकडून लेखकाने खलनायक ठरविण्यात आलेला नायक अभ्यासपूर्ण पद्धतीने वाचकांसमोर मांडला आहे. हजारो वर्षापासून दहन होत असलेला रावण आजपर्यंत केवळ खलनायकाच्या स्वरुपात आपल्यासमोर मांडण्यात आला असला तरी, त्याच्या पलीकडे जाऊन वाचकांना विचारप्रवृत्त करण्यास लेखक शरद तांदळे या कादंबरीमध्ये यशस्वी होताना दिसतात.

सीतेला पळवून नेणारा रावण हीच त्याची प्रतिमा आपल्यासमोर होती, परंतु तिला पळवून नेल्यानंतर तिच्या सुरक्षेची काळजी घेणारा आणि तिची कोणत्याही प्रकारची विटंबना न करणाऱ्या रावणाची विविध रूपे या कादंबरीच्या माध्यमातून आपल्या समोर उभी राहतात. रावणाची अभ्यासूवृत्ती, पाठांतर, नाविण्याचा शोध घेण्याची वृत्ती यासारख्या अनेक पैलूंचा उलगडा या कादंबरीतून लेखकाने केलेला आहे.

भावनांचा आणि ज्ञानाचा योग्य वापर करून लिहिलेली कादंबरी राक्षस संस्कृतीचे नियम किती सुंदर आहेत, हे आपल्यासमोर मांडते. जिच्यामुळे हे रामायण घडले त्या सीतेची लक्ष्मणाबद्दल असलेली भावनाही विचार करायला लावणारी आहे. शेवटी सगळ्या गोष्टी या कुळ, राजधर्म आणि साम्राज्य वाढीसाठीच आहेत याचे प्रत्यंतर या कादंबरीतून येते. सोन्याची लंका असलेल्या रावणाला देखील त्याचा मृत झालेला पुत्र परत आणता आला नाही, यावरून संपत्ती हे केवळ जीवन जगण्याचे मध्यम आहे, ते अंतिम सत्य नाही हेच सिद्ध होताना दिसते. रामायणातील राम आणि रावण या ठिकाणी मात्र खूप वेगळे आहेत, या व्यक्तिरेखांना न्याय देत असताना, लेखकाचे कौशल्य किती पणाला लागले असतील हा देखील चिंतनाचा विषय आहे.

हजारो वर्षापासून माझ्या दहनाचा सोहळा आनंदाने साजरा केला जातो, विध्वंस हा कधीच चांगला नसतो हे माहित असूनही रक्तांच्या नात्यासाठी रक्तचंदन कपाळी घ्यावं लागत, संघर्ष करावा लागतो आणि वेळ पडली तर तत्वांसाठी मरावं आणि मारावंही लागतं. माझ्या आयुष्यात घडलेल्या घटना, अनपेक्षित वादळं... त्यानंतरही विचारांच्या झालेल्या चिंध्या जपत स्वतःच्या हिमतीवर लंकाधिपती झालो, इतर राजांसारखी मी एकट्याने सुखे उपभोगली नाहीत, माझी जनताही सोन्याच्या घरात राहत होती, हजारो वर्षापासून अनुत्तरीत असलेल्या माझ्या वैयक्तिक आयुष्याचा, माझ्या अंगभूत व्यक्तिमत्वाचा धांडोळा घेतला का कधी ? स्वतःच्या बळावर सर्व देवांना मी पराभूत केलं, मला न जाणता माझी प्रतिमा जाळणाऱ्या लोकांच्या अज्ञानाची मला कीव येते, सीतेचे अपहरण केल्याचा मला दोष देता, पण मी तिची विटंबना केली नाही, हे का विसरता ? ही मलपृष्ठावरील रावणाच्या तोंडी आलेली वाक्ये वाचल्यानंतर कादंबरी वाचण्याचा मोह आवरणे वाचकांना कठीणचं आहे असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही.

कादंबरीतील व्यक्तिरेखांचा विचार करत असताना, प्रत्येक पात्रांना योग्य तो न्याय देण्यात आलेला दिसून येतो, उत्कृष्ट संवाद शैली, विविध घटनाप्रसंग, कथानक पुढे जातं असताना वाचकांची वाढणारी उत्कंठा, युद्धवर्णने, युद्धसंहार, आजूबाजूचा परिसर, झोपड्यांचे, वर्णन, यामुळे तत्कालीन समाजस्थिती समजून येते. एकंदरीत रावणाच्या जीवनावर प्रकाश टाकणारी आणि आजवर न समजलेला रावण समजून घेण्यासाठी ही कलाकृती आजवरच्या कादंबऱ्यापेक्षा सर्वश्रेष्ठ म्हटले तरी वावगे ठरणार नाही.

पुस्तकाचे नाव - रावण राजा राक्षसांचा
लेखक - शरद तांदळे
प्रकाशन - न्यू ईरा पब्लिशिंग हाउस,
पुणे किंमत - ३८०/-
पृष्ठ संख्या - ४३२/-

★ ★ ★

माणसांच्या गर्दीत हरवलेला माणूस....

भारत भिसे
बी.ए. भाग २

असं म्हणतात माणूस हा पृथ्वीतलावरील सर्वात बुद्धिमान प्राणी आहे, पण गेल्या कित्येक वर्षापासून मला ते जाणवलेच नाही. मान्य आहे माणसाने औद्योगिक क्रांती केली, पण त्या क्रांतीचा इतर सजीव सृष्टीवर काय परिणाम झाला याचा त्याने कधी विचारचं केला नाही. माणसाचे रूप तुमच्यासमोर मांडायचे झाले तर काही मोजकी उदाहरणे पाहता येतील.... ७ ऑक्टोंबर २०१७ रोजी विद्येचे माहेरघर असलेल्या पुणे शहरात १५-२० लोकांच्या जमावाने चार कुत्र्यांना रॉकेल टाकून जिवंतपणे जाळले आणि १६ कुत्र्यांना अन्नात विष घालून मारले. काय त्यांची चूक होती, ते मुके जीव स्वतःची भूक भागविण्यासाठी धडपडत होते आणि हीच धडपड आपल्याला त्रासदायक वाटते. दुसरे उदाहरण द्यायचे झाले तर, जून २०१९ मध्ये नांदेड या ठिकाणी एकाच आईच्या पोटी जन्म घेतलेल्या एका सख्या भावाने आपल्या लहान बहिणीच्या पोटात चाकू खुपसून जीव घेतला, ठीक आहे नंतरच्या काळात त्याला शिक्षा झालीच, पण ही घटना घडत असताना कित्येक लोक व्हिडीओ काढण्यात मग्न होते त्यांचे काय? एकाने जरी त्या माथेफिरूचा हात पकडण्याचे धाडस केले असते तर त्या निरागस बहिणीचा जीव वाचला असता, मग म्हणता आले असते की, होय अजूनही माणुसकी जिवंत आहे. घटना क्रमांक तीन, रस्त्याच्या बाजूला दाट झाडीत दोघांवर खुनी हल्ला झाला, एकाचा जागीच मृत्यू झाला तर सोबत असणारी त्याची मैत्रीण जीवांच्या आकांताने, अर्धमेल्या अवस्थेत कशीबशी सरकत सरकत रस्त्याच्या कडेला येऊन मदतीची याचना करू लागली, तिथेही गर्दी जमा झाली आणि तिला कॅमेऱ्यात कैद करू लागली..., कुत्र्याला मारताना, लहान बहिणीला मारताना आणि अर्धमेल्या अवस्थेत मदतीची याचना करणाऱ्या त्या मुलीच्या समोरील गर्दीत मदतीचा हात देऊन माणुसकीची जात निभावणारा एकही माय का लाल तिथे उपस्थित नव्हता, मी तर म्हणतो तिथे माणूसच गैरहजर होता.

किडे, मुंग्या, पशु-पक्षी, रान-वने आणि झाडा-झुडपांच्या या पसाऱ्यात जगणाऱ्यां पेक्षा थोडासा तार्किक मेंदू आणि दोन हात, दोन पाय लाभलेली जमात म्हणजे माणूस. ज्याच्या हृदयात श्रद्धाळूयुक्त प्रेमाचे अखंड झरे वाहतात तो माणूस, आहार, भय, निद्रा, मैथुन या चार गोष्टी पशु- पक्षी देखील करतात पण पाचवी विचार करण्याची शक्ती ज्याच्याकडे आहे तो खरा माणूस. जीवशास्त्राच्या भाषेत सांगायचे झाले तर ज्याच्या हाताचा अंगठा त्याच्या उरलेल्या चार बोटांपासून वेगळा झाला आणि त्याच्याच जीवावर त्याने हा कर्तुत्वाचा डोलारा उभा केला, अशी निसर्गाची सर्वोत्तम निर्मिती म्हणजे माणूस, माकडाची शेपटी गेली, तो दोन पायावर उभा राहू लागला, हळूहळू चालू लागला, त्याच्या बुद्धीची धाव इतकी होती की, तो मंगळावर जाऊन पोहचला, समुद्र काबीज केला, नद्या अडवल्या, जंगले ताब्यात घेतली, पाखरांचे संसार उध्वस्त केले आणि इथेच खरा घोळ झाला. जशी त्याने जंगले ताब्यात घेतली तशी त्याच्या मनातील हिरवळ संपली. नद्या अडवल्या आणि मनातील प्रेमाचे झरे संपले,



समुद्रावर ताबा मिळविला आणि त्याच्या मनात तयार झाले संकुचित वृत्तीचे डबके, एका बाजूला त्याने ग्रहताऱ्यांना प्रदक्षिणा घातल्या आणि दुसऱ्या बाजूला त्याच्या संवेदनांना ग्रहण लागले. अगदीच सोप्या भाषेत सांगायचे झाले तर माणूस स्वतःच्या अस्मितेपासून दूर गेला, माणूस माणसापासून दूर गेला. संध्याकाळच्या जेवणाच्यावेळी घासातला घास बाजूला काढून वाटीभर भाजी शेजाऱ्याला नेऊन देणारी पिढी आता थकली आहे. कित्येक जीव आजही उपाशीपोटी झोपत असताना दुसऱ्या बाजूला रोज सकाळी शिळा भात आणि चपाती कचरा कुंडीत जाताना पाहायला मिळतो, म्हणूनचं वाटतं आमच्यातला माणूस हरवत चाललायं, यावर मंगेश पाडगावकर म्हणतात...

या झोपड्यात आली
वाहून ही गटारे
चिखलात हृदयाच्या
माणूस शोधतो मी,
कोलाहलात साऱ्या
माणूस शोधतो मी
साऱ्या गर्दीत माणसांच्या
माणूस शोधतो मी,

आज कोणतेही वर्तमानपत्र काढा, कोणताही चॅनेल लावा, मिडिया मधील कोणतेही Aap उघडा प्रचंड गर्दी दिसेल, पण तीच गर्दी थंड असते एखाद्या बहिणीची अब्रू लुटली लाट असताना, ती गर्दी थंड असते अपघातातील लोकांच्या यातना पाहताना, भूकंप, महापूर, झाल्यावर ही गर्दी दंग असते मृतांच्या अंगावरील दागिने ओरबाडण्यात, आपल्या आजूबाजूला कित्येक लोक उपाशी पोटी झोपतात, कित्येक लेकरं शाळा सोडून बालमजुरी करतात, हॉस्पिटलमध्ये उमलाण्याआधी कळ्या खुडल्या जातात, शेजारच्या फ्लॅटमध्ये औषधाविना तडफडणारे आजोबा या सगळ्या गोष्टी बघायला या गर्दीला वेळ नाही. मातीच्या भिंतीला सिमेंटचा गिलावा आला मात्र माणुसकीचा ओलावा मात्र पापुंद्रे उडावे तसा उडून गेला. फ्लॅटसिस्टीम मध्ये माणसे अंतराने जवळ आली आणि मनाने दुरावली, आणि या सगळ्यांचा परिणाम म्हणजे इथल्या माणसांची मने मृत झाली. या भूतलावरील सर्वात स्वार्थी सजीव म्हणजे माणूस, पण स्वार्थी किती प्रमाणात असावं यालाही काही मर्यादा असतात. आपले भागल्यानंतर इतरांना देण्याची दानत माणूस सोडून सर्वच प्राण्यात दिसून येते, जंगलाचा राजा सिंह देखील आपले पोट भरल्यावर उरलेली शिकार इतरांसाठी सोडून जातो. मुळात माणूस हरवण्याचं सर्वात मोठं कारण म्हणजे त्याच्यामध्ये असणारा हव्यासाचा डोंगर, याच माणसाचे वर्णन करताना बहिणाबाई एके ठिकाणी म्हणतात...

''माणसा माणसा कधी होशील तू माणूस लोभापाई झाला माणसाचा कानूस,'' एवढे सगळे होत असले तरी या माणसांच्या गर्दीत हरवलेल्या माणसाला आपल्याला शोधावेचं लागेल आणि त्याची सुरवात स्वतः पासून करावी लागेल. धर्माच्या गर्दीत जो फक्त मी भारतीय आहे अशी ओळख देईल तिथे सापडेल आपल्याला माणुसकी, एखादा मुलगा चौकात भिक मागत असताना त्याच्या हातात जो कोणी पाटी- पेन्सिल देईल तिथे सापडेल आपल्याला माणुसकी, जेंव्हा प्रत्येक घर स्त्री जन्माच्या स्वागतासाठी सज्ज असेल तिथे सापडेल...माणूसकी, एखादे झाड विनाकारण तोडताना त्या झाडाला जो कवटाळेल तिथे सापडेल आपल्याला माणुसकी, जेंव्हा या देशात एकही माणूस उपाशी झोपणार नाही तिथे सापडेल आपल्याला माणुसकी, जेंव्हा एकही शेतकरी आत्महत्या करणारा नाही तिथे सापडेल आपल्याला माणुसकी आणि सर्वात शेवटी, जेंव्हा माणुसकी या विषयावर लेखन करण्याची वेळच येणारं नाही, तेंव्हा खऱ्या अर्थाने म्हणता येईल की जिवंत आहे माणुसकी.....

★ ★ ★

मुलाखत एका समाजसेवकाची

स्नेहांजली वरखडे
बी.एस्सी. भाग ३

आजच्या धावपळीच्या आणि स्पर्धेच्या वातावरणात प्रत्येकजण आपापल्या विश्वात रमलेला आहे. दिवसेंदिवस सामाजिक परिस्थिती अत्यंत बिकट होताना दिसत आहे, माणुसकीला कलंक लावणाऱ्या कित्येक घटना सतत समोर येत आहेत. माणसाची वृत्ती स्वार्थी आणि संकुचित झालेली दिसून येते. असे असले तरी समाजात आजही अशा काही व्यक्ती आहेत की, त्यांच्या कार्यातून माणुसकी जिवंत असल्याचे दर्शन होते. असेच एक व्यक्तिमत्व म्हणजे रवी बोडके, यशोधन संस्थेच्या माध्यमातून अनाथ, निराधार, बेघर लोकांची सेवा करणारे हे व्यक्तिमत्व आजच्या तरुण पिढीला आणि समाजाला नक्कीच आदर्शवत आहे. सामाजिक बांधिलकी म्हणून ते करत असलेले सामाजिक कार्य आणि त्यांची सामाजिक भूमिका याविषयी त्यांना जाणून घेण्याचा प्रयत्न या छोट्याशा मुलाखतीच्या माध्यमातून केलेला आहे.

नमस्कार सर,

आपण जे कार्य करत आहात ते निश्चितच आमच्यासाठी गौरवास्पद आहे. मला सर्वप्रथम आपणास विचारावे वाटते की,

प्रश्न आपण या कार्याकडे वळलात त्या पाठीमागे कोणाच्या प्रेरणा आहेत ?

उत्तर यशोधन ट्रस्ट आणि अनाथ आश्रम हा खरंतर खूप मोठा प्रवास आहे, तब्बल १७ वर्षाचा हा प्रवास, मी कॉलेजमध्ये असताना आपण समाजाप्रती काही देणं लागतो या उद्देशाने सुरवात केलेली होती आणि आज तो प्रवास इथपर्यंत येऊन पोहचला आहे. आपल्या महाराष्ट्राला न उमगलेलं आणि न समजलेलं एक नेतृत्व गेलं ते म्हणजे नरेंद्र दाभोळकर. दिवंगत नरेंद्र दाभोळकर यांच्या चळवळीत काम करत असताना त्यांची समाजप्रती असणारी भावना पाहून समाजासाठी काम करण्याचा विचार माझ्या मनात रुजला. आणि त्यांच्याच प्रेरणेतून समाजसेवेला सुरवात केली.

प्रश्न हे सामाजिक कार्य करण्यापाठीमागे विशेष असा घटनाप्रसंग आहे का ? आणि असेल तर कोणता ?

उत्तर - खरं तर प्रत्येकाला जगण्याचा अधिकार आहे हा विचार करूनच आम्ही यशोधन ट्रस्ट आणि अनाथ आश्रम यांची सुरवात केली, काम करत असताना अनेक प्रसंग आले परंतु मला या ठिकाणी एका प्रसंगाचा आवर्जून उल्लेख करावा वाटतो. शिरवळ येथे एक मुलगी आमच्या निदर्शनास आली. जेंव्हा आम्ही तिला आश्रमात घेऊन आलो तेंव्हा तिने सांगितले की, मी PSI असून प्रशासनात काम करते. हे ऐकल्यानंतर मात्र आमची संपूर्ण यंत्रणा हादरून गेली. प्रशासनात काम करणारी व्यक्ती अशा निराधार अवस्थेत सापडणे हे आमच्यासाठी खूप धक्कादायक होतं. ताबडतोब आम्ही तिच्यावर उपचार केले आणि तिच्या कुटुंबाचा शोध घेतला आणि त्यांच्या स्वाधीन केले. त्यावेळी जर तिला मदत केली नसती तर तिचे आयुष्य वेगळ्या दिशेला गेले असते. म्हणून अशा सगळ्या घटकांना आपण मदत करणे ही आपल्या सर्वांची सामाजिक जबबदारी आहे.

प्रश्न आपल्या आश्रमात कोणकोणत्या प्रकारचे लोक आश्रयाला आहेत ?

उत्तर समाजात ज्यांचे कोणीही नाही, ज्याला कोणीही सांभाळत नाही अशा अनाथ, बेघर, निराधार लोकांना आपण मदत करतो. आश्रमात आणून त्यांच्यावर उपचार केले जातात आणि त्यानंतर त्यांच्या नातेवाईकांकडे परत नेऊन सोडले जाते. वृद्ध, प्रौढ आणि १८ वर्षापुढील सर्व बेघर लोक आमच्या आश्रमात आश्रयाला आहेत.



प्रश्न हे कार्य करत असताना सुरुवातीच्या काळात काही विशेष अनुभव आले का ?

उत्तर खरं तर यशोधनचा प्रवास हा खूप खडतर आहे. सुरुवातीच्या काळात अनेक प्रश्न समोर उभे होते. या लोकांचे काय करणार ? कुठे घेऊन जाणार ? त्यांना कुठे सांभाळणार ? असे असंख्य प्रश्न प्रशासन आणि सामान्य लोक विचारायचे, त्यावेळी पोलिसांची मदत मिळत नव्हती, नंतरच्या काळात पोलीस प्रशासन सोबतीला आल्यानंतर हा भार हलका झाला आणि हळूहळू लोकांचा दृष्टीकोन बदलत गेला आणि अनेक अनाथ, बेघर लोकांपर्यंत आम्हाला पोहचता आले आणि त्यांना मदत करता आली.

प्रश्न आपण जे कार्य करत आहात त्यामध्ये तुमच्या कुटुंबाची भूमिका कशाप्रकारची आहे ?

उत्तर ज्याप्रमाणे गाडीची दोन्ही चाके समांतर असल्याशिवाय गाडी नीट चालत नाही, त्याप्रमाणे यशोधनमध्ये माझ्या कुटुंबाची भूमिका आहे. मी आणि माझी पत्नी सोनाली हे समाजकार्य आणि संस्था चालवितो. यशोधन संस्थेतील मुलींना आणि महिलांना सांभाळताना माझ्या पत्नीचा खूप मोठा हातभार लागतो. एकूणच या कार्यात माझ्या कुटुंबाची भूमिका अतिशय महत्वपूर्ण आहे.

प्रश्न आपण करत असलेल्या कार्यासाठी, संस्थेसाठी शासनाकडून काही अनुदान मिळते का ? यासाठी काही एनजीओ मदत करतात का ?

उत्तर - अलीकडच्या काळात शासनाच्या ज्या ग्रँट होत्या त्या आता बंद झाल्या आहेत. त्यामुळे शासन कोणतेही अनुदान देत नाही, त्यामुळे आपल्याला लोक सहभागातून ही संस्था चालवावी लागते. सध्या आश्रमात १०० च्या आसपास लोक आहेत. त्यांच्या संगोपनासाठी समाजातील दानशूर लोक, ज्यांना समाजासाठी काहीतरी करावे वाटते ते लोक देणगी देतात किंवा वस्तूंच्या स्वरुपात मदत करतात आणि या सर्व मदतीवरच हा आश्रम चालतो.

प्रश्न आपल्या आश्रमात आलेले रुग्ण, अनाथ, निराधार लोक आपणास कोणामार्फत मिळतात ?

उत्तर प्रत्येक रुग्ण आश्रमात दाखल करण्यापूर्वी एक प्रक्रिया असते, असंच कोणालाही आश्रमात भरती करता येत नाही. ज्या व्यक्तीला आधाराची गरज आहे त्यांबद्दल पोलिसांना माहिती द्यावी लागते, त्यानंतर पोलिसांमार्फत त्यांची तपासणी होते आणि त्याचा रिपोर्ट तयार केल्यानंतर संबंधित व्यक्तीला आश्रमात दाखल करण्यात येते.

प्रश्न आश्रमातील रुग्णांचा वयोगट साधारणपणे कोणता असतो ?

उत्तर यशोधन संस्था अनाथ, बेघर लोकांसाठी कार्य करते, १८ वर्षापासून ते १०० वर्षापर्यंतचे रुग्ण या संस्थेत आहेत. १८ वर्षाखालील व्यक्तींना संस्थेत प्रवेश दिला जात नाही.

प्रश्न आजपर्यंत आपण अनेक अनाथ, निराधार, बेघर लोकांवर उपचार केले आहेत, त्या पैकी साधारणपणे किती रुग्ण पूर्णपणे बरे होऊन आपापल्या घरी गेले आहेत ?

उत्तर आजपर्यंत आम्ही हजारो लोकांना मदत केली आहे. ऑन रेकोर्ड ६०० लोकांना आम्ही उपचार करून त्यांना त्यांच्या घरी सुखरूप पोहचविले आहे.

प्रश्न हे रुग्ण घरी गेल्यानंतर त्यांचे कुटुंब त्यांचा पुन्हा स्वीकार करते का ?

उत्तर हो, निश्चितपणे त्यांचे कुटुंब त्यांचा स्वीकार करते

प्रश्न आश्रमातील लोकांसाठी तुम्ही काही उपक्रम राबविता का ?

उत्तर आश्रम फक्त म्हणण्यापुरता आहे, खरं तर हा आश्रम म्हणजे माझे कुटुंब आहे ज्यात १०० च्या आसपास लोक राहतात. त्यामुळे आश्रमात विविध प्रकारचे उपक्रम राबविले जातात. गुढीपाडवा ते मकरसंक्रांत पर्यंतचे सर्व सण साजरे केले जातात, खेळण्यासाठी विविध प्रकारची साधने आहेत, या लोकांचे मन रमावे त्यांच्या हाताला काम मिळावे म्हणून गोशाळा आहे. ज्याप्रमाणे आपण आपल्या कुटुंबात गुण्यागोविंदाने राहतो त्याचप्रमाणे हे सर्व लोक या ठिकाणी गुण्यागोविंदाने राहतात.

प्रश्न पुढील भविष्यकालीन योजना काय आहेत ?

उत्तर प्रामाणिकपणे सांगायचे झाले तर, पुढील काळात अशा प्रकारचे आश्रम काढण्याची वेळचं येऊ नये त्यासाठी जाणीवजागृती करण्याचे कार्य आम्ही करत आहोत आणि यापुढेही करणार आहोत, परंतु यशोधनच्या माध्यमातून जे कार्य चालू आहे ते यापुढेही चालू राहील...

धन्यवाद सर, आपल्या व्यस्त वेळातुन वेळ काढून आमच्या प्रश्नांना उत्तरे दिलीत. तुम्ही दिलेली माहिती नक्कीच आम्हांला प्रेरणादायी असेल.

★ ★ ★

स्वत:चा शोध घेण्याची प्रक्रिया आता तंत्रज्ञानाद्वारे उपलब्ध.....

कु.सानिका पार्टे
बी.एस्सी. भाग ३


आजच्या युगात प्राचीन काळातील कल्पना तितक्या महत्त्वाच्या नाहीत. एखाद्याचे व्यक्तिमत्व आणि कृती या दोन्ही कल्पनांच्या आधारे समजू शकत होत्या, परंतु आज काल एखाद्याचे मत इतर भागधारकाद्वारे लादले जाते, जेथे आत्म - शोधाची भूमिका नगण्य आहे. उदा, राजकारणी मतांवर आधारित राजकारण्यांची.

शिक्षण हा आत्मशोधाचा सर्वात मोठा परिणाम आहे. अनुभव हा शिक्षणातून येतो, अनुभव थेट आत्मशोधाला प्रोत्साहन देतो. परंतु सध्या शिक्षणाचे स्वरूप अस्तित्वात आहे, एक व्यवसाय म्हणून जेथे अंतर्गत अनुभवाकडे लक्ष न देता बाह्य अनुभवाचा सर्वोत्तम विचार केला जातो.

आत्मशोध समजाऊन सांगताना गांधीजीसारखी यशस्वी उदाहरणे आपल्याला पाहायला मिळतात, स्वतःचा शोध घेण्याच्या प्रक्रियेला दीर्घकालीन वेळ किंवा कोणतीही संसाधने लागत नाही. त्यासाठी आत्म-जागरूकता व स्वप्रतिबिंब व्यक्तिमत्व आवश्यक असते. जेंव्हा एखाद्या व्यक्तीचे विचार सकारात्मक असतात तेंव्हा ती व्यक्ती आत्मशोधात गुंतलेली असते. जेंव्हा एखाद्या व्यक्तीला त्याच्या लहानपणाची जाणीव होते आणि आंतरिक प्रेरणा मिळते तेंव्हा ती व्यक्ती नक्कीच उदाहरणे देते. यशस्वी जीवनात जर 'स्व प्रेम' ची संकल्पना मजबूत असेल, तर आत्म - शोधाची प्रक्रिया सुलभ होईल , जसे की योग ध्यान एखाद्याला आत्म-शोधासाठी प्रेरित करते. स्वयंशोध या प्रक्रियेत व्यक्तीच्या आरंभबिंदूचा विचार केला जातो.

''स्वतःला शोधण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे इतरांच्या सेवेत स्वतःला हरवून,'' महात्मा गांधी पण आज त्याचे बाह्य स्वरूप हे स्वतःला न बदलता जग बदलण्याचा प्रयत्न आहे. कुमकुवत आरोग्य क्षेत्र आणि कमी संसाधने या आत्मशोधानंतरही भारताला आणखी चांगले काम करण्याची प्रेरणा मिळाली. सोशल मिडिया प्लॅटफार्म स्वतःच्या सादरीकरणासाठी प्रमुख क्षेत्र बनले आहेत. स्व-मुल्यासाठी बाह्य स्त्रोतांवर विसंबून राहिल्याने सोशल मिडिया लाईक्स आणि फॉलोअर्सवर अवलंबून राहिले आहे. यामुळे खरा आत्मसन्मान आणि आत्मस्वीकृती कमी होऊ शकते. गंभीर विचार आणि विवेकासह तंत्रज्ञानाकडे गेले पाहिजे. ऑनलाईन आणि ऑफलाईन दोन्ही अनुभव एकत्र करून संतुलित दृष्टीकोन स्वीकारला पाहिजे.

आत्मनिरीक्षण, आत्मचिंतन आणि प्रत्यक्ष आत्मशोधाला चालना देण्यासाठी समोरासमोर संवाद साधण्यासाठी वेळ दिला पाहिजे. तंत्रज्ञान हा मानवी जीवनाचा अविभाज्य भाग आहे. तंत्रज्ञान आता आपल्या कल्पना आणि जीवनशैलीची मांडणी करण्यात महत्वाची भूमिका बजावते. आपल्या प्रश्नांची उत्तरे मिळविण्यासाठी आपल्याला आता इतरत्र जाण्याची आवश्यकता नाही, आपण ते इंटरनेटवर पाहू शकतो. त्यामुळे इंटरनेट आशीर्वाद आणि दोष यामधील बारीक रेषा आहे यात काही शंका नाही. जर आपण तंत्रज्ञान आणि शिकण्याच्या पारंपारिक पद्धतींचा मिलाफ केला तर तंत्रज्ञानाचा सकारात्मक प्रभाव वाढू शकतो.



आत्मशोध मुळातच आपल्याला प्रबोधन करण्याचा हेतू आहे. सॉक्रेटीसने म्हटले आहे की, ''परीक्षण न केलेले जीवन जगणे योग्य नाही.'' आणखी एक महत्वाचा घटक म्हणजे कृत्रीम बुद्धिमत्तेची(AI) प्रगती, याला भविष्याचा आत्मशोध म्हणता येईल. निश्चितपणे तंत्रज्ञानाचा वापर केल्याने आपली आत्मशोधाची प्रक्रिया सुलभ होऊ शकते. मानवी वाद आणि विकासाचा एक महत्वाचा आणि मुलभूत भाग म्हणजे स्वतःचा शोध. ऑरिस्टॉटल म्हणतो की, 'स्वतःला जाणून घेणे ही सर्वात शहाणपणाची सुरुवात आहे.'' आम्हाला अवास्तवाकडून कडून वास्तवाकडे घेऊन जा, आम्हाला अंधारातून प्रकाशाकडे घेऊन जा, आम्हाला मृत्युपासून अमरत्वाकडे घेऊन जा, हा मंत्र स्व-शोधाच्या प्रक्रियेला सूचित करतो. कुटुंब हे एकेकाळी मनोवृत्ती आणि विश्वासांना आकार देण्यासाठी सर्वात महत्वाचे वातावरण होते. माझा विश्वास आहे की, आपल्या माणसांकडे मानसिक सामर्थ्य आणि क्षमता यांचा मोठा साठा आहे. जे स्वतःच्या शोधाचा मार्ग दाखवू शकतात, ज्यांचे तंत्रज्ञान हे एक साधन असावं. स्वतःला त्यांच्या स्वतःच्या कायद्यानुसार पूर्ण करण्यासाठी, स्वतःचे स्वरूप तयार करण्यासाठी, स्वतःचे प्रतिनिधित्व करण्यासाठी हा स्वतःचा शोध आहे.

★ ★ ★



आयुष्य शेतकऱ्याचं

काळ्या मातीत जन्मतं शेतकऱ्याचं सोनं
बळीराजा मातीत नांदतो ठेउनिया मौन
घाम गाळूनिया कष्टाचा, भरितो तुमचं अमचं पोट
ना दिस ना रात, ना बोलीतो तो खोटं
घेउनिया जोडी ढवळ्या पवळ्या नंदीची
गुंफणे नांगर ही साथ प्रीतीची
ना दिले ऊन पाऊस जीवे करुनिया कष्ट
पाझरीते घरटं ना करुनिया हट्ट
करोनी रक्ताचे ही पाणी राबितो हा मातीत
राहुनी अर्धपोटी उपाशी जीव ठेवितो मुठीत
कधी कोरडा दुष्काळ कधी ओला दुष्काळ
विसरोनिया भूतकाळ मनी आस भविष्यकाळ
हेच त्याचे जीवन हीच त्याची व्यथा
शेतकरी हा भोळा गाती त्याची ही गाथा....

केतकी राजेंद्र मांढरे
बी.कॉम- भाग तीन

नाद शर्यतीचा... ! शर्यत नातं मातीचं ....

केतकी मांढरे
बी.कॉम - भाग ३

वेड हे प्रत्येकालाच असतं
काहींना प्रेमाचं तर
काहींना बैलगाडा शर्यतीच ...

भारताला कृषीप्रधान देश म्हटलं जाते. शेतीबरोबरच पशुपालन हा शेतकऱ्यांचा परंपरेने चालत आलेला व्यवसाय आहे. त्यामुळे शेतकऱ्याचं त्याच्या पशुंशी वेगळ्या प्रकारचं नातं अगदी पुरातन काळापासून आहे. शेतकऱ्यांनी बैलाचं संगोपन सुरु केलं आणि शेतीबरोबरच मनोरंजनासाठी देखील त्यांचा वापर सुरु केला आणि त्यातूनच निर्माण झालेला खेळ म्हणजे बैलगाडा शर्यत.... शेतकरी व बैलगाडा मालकांसाठी सन्मानाची व तरुणाईच्या आवडीची असणारी अशी बैलगाडा शर्यत ही सुमारे ४०० वर्षाची जुनी परंपरा आहे. देश पातळीवर पंजाबमध्ये किल्ला रायपुर येथेही प्राचीन काळापासून मिनी ऑलिम्पिक म्हणून बैलांच्या शर्यतीचे उल्लेख सापडतात. विशेषतः शेतातील हंगाम संपल्यानंतर ग्रामदैवत असलेल्या ठिकाणी जत्रा, उरुस भरवून शर्यतीचे आयोजन केलं जात असे.

काही विदेशी संस्थांनी शेतकरी आणि त्यांची जनावरे यांच्यात फुट निर्माण करण्याचा प्रयत्न केला आणि या शर्यतीवर बंदी आणण्याची मागणी केली. या मागणीची दखल घेत केंद्र सरकारच्या वन व पर्यावरण मंत्रालयाने छळ प्रतिबंधक कायदा १९६० च्या आधाराने बैलांचा समावेश राजपत्रात करून सर्वोच्च न्यालयाने मे २०१४ मध्ये बैलांचे मनोरंजनाचे खेळ आणि प्रदर्शन यावर संपूर्ण देशामध्ये बंदी आणली. अभिमानाने मिरविणाऱ्या शेतकऱ्यांचा बैल न्यायालयीन व क्लिष्ट कायदे प्रक्रियेत अडकल्याने शेतकऱ्यांच्या आयुष्यातील बैल व बैलांच्या शर्यतींना असलेले सांस्कृतिक आणि धार्मिक महत्व वादात सापडले. बैलगाडा शर्यतीवरील बंदीमुळे राज्यातील देशी जनावरांमधील सर्वात सुंदर आणि रुबाबदार म्हणून ओळखली जाणारी दुभत्या जनावरांतील खिल्लार जात काही दिवसात नामशेष होणार का? असा प्रश्नदेखील निर्माण झाला. शेतकऱ्यांच्या दावणीला दिसणारी बैलजोडी यापुढे फक्त चित्रातच राहती की काय ? अशी शंका येऊ लागली. यावर आधारित असणारे आणि शर्यत उपयोगी साहित्य तयार करणारे ग्रामीण भागातील छोटे मोठे कारागीर आणि वाहतूकदार यांचेदेखील यामुळे कंबरडे मोडले. अगोदरच ट्रॅक्टरच्या आगमनाने बैल आणि बैलगाडीचे महत्त्व कमी झाल्याचे चित्र समोर आले होते. बैलगाडा बंदीच्या विरोधात बैलगाडा चालक - मालक आणि प्रेमींनी राज्यभर आंदोलने छेडली आणि सर्वोच्च न्यायालयात त्यावर सुनावणी सुरु करण्याची विनंती करण्यात आली. १६ डिसेंबर २०२१ रोजी राज्यात बैलगाडा शर्यतीला न्यालयाकडून सशर्त परवानगी देण्यात आली. शेतकऱ्यांच्या या मागणीला यश मिळाले आणि हा खेळ मोठ्या कालवधीनंतर पुन्हा एकदा उत्साहाने आणि जल्लोषाने संपूर्ण महाराष्ट्रात सुरु झाला.

हृदयाला बैलाची आवड,
तोंडात बैलगाड्याच नाव
नाद हा परंपरेचा कसा सुटेल राव...



नाद, नाद म्हटलं की, अपोआप डोळ्यापुढ येणारं दृश्य म्हणजे बैलगाडा शर्यत... समालोचक,मिडिया, ते भव्य मैदान, ड्रायवर, बैलं, ती मैदानातील गर्दी, सुट्टीचा थरार आणि मैदानावरचा धुराळा.... नाद म्हटलं की, आठवते फक्त आणि फक्त बैलगाडा शर्यत. एक मातीतला माणूस आणि त्याचं बैलाप्रतीचं प्रेम, मुक्या प्राण्यांना पोटच्या मुलांप्रमाणे लावलेला जीव, यावरूनच समजतो तो शर्यतीचा नाद... शर्यतीचा नाद करण सोपं आहे पण, शर्यतीची बैले संभाळणे हे वाटतं तितकं सोपं नाही, त्यांना कुटुंबातील एक घटक समजून पोटच्या पोरांपेक्षा जास्त जीव लावावा लागतो तेंव्हा कुठे हा नाद पूर्णत्वास जातो.

ध्वज हा त्यागाचा,
ध्वज हा पराक्रमाचा
ध्वज हा स्वराज्याचा,
ध्वज हा गती आणि प्रगतीच्या खेळाचा
होय ध्वज हा शर्यतीचा, ध्वज हा इशाऱ्याचा
आणि ध्वजामुळेच खेळ आहे
बैलगाडा शर्यतीचा...

बैलगाडा शर्यत म्हटले की, इथे गतीच बोलते, इथे गतीच टिकते, इथे गतीच जिंकते, इथे पैज वाऱ्याशी घेतली जाते अशी ही बैलगाडा शर्यत, कधीही न थांबणारा खेळ म्हणजे शर्यत, कधीही पूर्ण न होणारा खेळ म्हणजे बैलगाडा शर्यत...

शर्यत म्हणजे जिद्द,
शर्यत म्हणजे गतीचा प्रभा
शर्यत म्हणजे रणसंग्राम,
शर्यत म्हणजे चिकाटी
शर्यत म्हणजे एक संघर्ष,
शर्यत म्हणजे जिंकण्याची ओढ
आणि शर्यतीतूनचं मिळतो
पराभव झाल्यावर खचून न जाण्याचा धडा
असा हा नाद फक्त शर्यतीचा...

बैलगाडा शर्यत ही एक स्पर्धा आहे आणि त्याच्याकडे स्पर्धा म्हणूनच बघितले पाहिजे. यात मीच जिंकले पाहिजे अशी धारणा नसावी, शर्यत आपण सर्वांनी टिकविली पाहिजे, शर्यतीच चिरंतन अस्तित्व जपता यायला हवं. बैलगाडा क्षेत्रात केवळ पैसा असून चालत नाही त्यासाठी जीवाला जीव देणारी माणसेदेखील जपावी लागतात, त्यांच्यावर जीव ओवाळून टाकावा लागतो. हे क्षेत्रच असं आहे की, तिथं हजारो नवीन लोकं भेटतात, त्यांच्याशी ओळख होते अन त्यातून मैत्री, परंतु ती मैत्री पायात पाय घालणारी नसावी, त्यामध्ये राजकारणाला जागा नसावी पराभव होत असेल तर सल्ला देणारी आणि मार्गदर्शन करणारी असावी.

धावेल जोडी पांढरी खिल्लारी
शर्यती बैलगाडा जल्लोषात रंगतील
सुगंध दरवळेल सारा
जर नसेल तिथे राजकारणाचा फवारा

आजच्या धावपळीच्या जीवनाचा विचार करता असं वाटते की, ''स्वतःचाचं स्वतः सोबत वाद असावा पण आयुष्यात रंग भरण्यासाठी असा एकतरी नाद असावा.'' पण आजची या क्षेत्रातील परिस्थिती पाहता असं वाटत की, अलीकडे बैलगाडी क्षेत्राला वाईट दिवस येताना दिसत आहेत. शर्यती करणे हे गरीब शेतकऱ्यांच काम राहिले नाही. हा खेळ शेतकऱ्यांच्या संस्कृतीचा राहिला नसून तो जुगार बनत चालला आहे. या क्षेत्राकडे केवळ पैसे कमविण्याच्या दृष्टीकोनातून पहिले जात आहे. एखाद्या गरीब शेतकऱ्याचा बैल चांगला पळत असेल तर त्याला तशाप्रकारची जोड मिळत नाही. हवा तसा जोड मिळण्यासाठी चांगल्या बैलाच्या मालकाला वायदी (बैलाचे भाडे) द्यावे लागते. त्यामुळे 'वायदी' ही या क्षेत्राला लागलेली कीड आहे असे म्हटले तरी चालेल, त्याचबरोबर सर्वसामान्य शेतकऱ्याचा बैल रीतसर पळून, निकाल घेऊनसुद्धा त्या गाडीला निकाल दिला जात नाही, त्याच्यावर अन्याय केला जातो आणि श्रीमंत आणि नामांकित बैलगाडी मालकाला निकाल दिला जातो. या गोष्टीमुळे शर्यत क्षेत्र वेगळ्या थराला जाताना दिसत आहे. काही ठिकाणी पंच कमिटी जाणूनबुजून मैदान हळू घेतात आणि फायनल अंधारात घेऊन गरिबांवर अन्याय करतात, असे प्रकार देखील काही ठिकाणी होत आहेत.

बैलगाडी शर्यत या क्षेत्रात केवळ पैसे मिळवण्याचे साधन हा हेतू डोळ्यासमोर नसला पाहिजे. शिवाय हा नाद जमिनी विकून नाही तर जमिनी राखून केला पाहिजे. त्यामुळे आजच्या तरुणाईने हा नाद करत असताना जीव गमवावा लागेल, आयुष्य उध्वस्त होणार नाही याचेही भान ठेवणे आवश्यक आहे, या क्षेत्राकडे एक छंद म्हणून पाहणे, त्याबरोबर आपल्या संस्कृतीचे जतन म्हणून पाहणे गरजेचे आहे.

बिजमाता

अदिती काळोखे
बी.एस्सी. भाग २

आधी बिज एकले, बीज अंकुरले रोप वाढले,
एका बीजापोटी, तरू कोटी कोटी जन्म घेती सुमने, फुले ।
व्यापुनी जगता तू ही अनंता बहुविध रूपे घेसी
परी अंती ब्रम्ह एकले ।।

जगतगुरु संत तुकाराम महाराज यांनी अतिशय सुंदर शब्दात एका बीजाचे वर्णन या काव्यपंक्तीमध्ये मांडले आहे. एका बीजापासून अनेक झाडे तयार होतात आणि त्याच झाडापासून कितीतरी फळे, फुले तयार होतात. या एका बीजाचे किती महत्त्व आहे हे पटवून देणाऱ्या या ओळी आहेत. याच प्रेरणेने एका बीजाचे महत्त्व संपूर्ण जगाला पटवून देणाऱ्या, त्यांचे मोल सांगणाऱ्या 'बीजमाता' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या 'राहीबाई सोमा पोपेरे' यांचे कार्य हे अतुलनीय आणि गौरवास्पद आहे.

'पदमश्री' या पुरस्काराने सन्मानित 'राहीबाई' यांनी केलेल्या कार्याबद्दल त्यांच्या विषयी सर्वांच्या मनात खूप आपुलकी आणि प्रेम वाटते. त्यांनी शेतीसंबंधी व आरोग्याच्या दृष्टीकोनातून आपल्या कार्याची सुरुवात केली. अस्सल देशी आणि जुन्या गावठी बी-बियाणांच्या वाणांचे त्यांनी जतन आणि संवर्धन केले व लोकांना पारंपारिक आणि नैसर्गिक बियाणे उपलब्ध करून दिले. देशी बियाणेचं कसे उत्तम आहेत हे त्यांनी लोकांना पटवून दिले. त्यांच्या मनातील या बियानाबद्दलचे प्रेम त्या जगाला वाटू लागल्या आणि यातूनच त्या 'बीजमाता' म्हणून प्रसिद्धीस आल्या.

राहीबाई यांचा जन्म १९६४ साली अहमदनगर जिल्ह्यातील अकोले तालुक्यात कोंभाळणे या गावी एका शेतकरी कुटुंबात झाला. गरीब कुटुंब आणि शिक्षणाची कोणतीही पार्श्वभूमी नसणाऱ्या राहीबाईंना शेतातील प्रत्येक गोष्टीची, बी-बियाणांची योग्य माहिती होती, घरातील परिस्थिती हलाखीची असल्या कारणाने त्यांना शिक्षण घेता आले नाही. मुळातच त्या शेतकरी असल्याने त्यांना त्या विषयाची आवड वाढू लागली. त्याबद्दल



असलेल्या ज्ञानानेच त्यांना पुढच्या वाटा सापडत गेल्या.

या सर्व गोष्टींची सुरवात त्यांच्या घरापासूनच झाली. आधी त्या शेतात हायब्रीड बियाणे वापरून शेती करत होत्या. त्यांचा नातू सारखा आजारी पडत असे, त्याच्या या गोष्टीचे मूळ शोधण्याचा प्रयत्न राहीबाईंनी केला. त्यातून त्यांच्या लक्षात आले की, हायब्रीड बियाणांचे अन्न खाल्यामुळे तर हे होत नाही ना ! त्यासाठी त्यांनी शेतात प्रयोग करून पहिला. त्यांनी एकाच शेतात एका बाजूला भाताचे देशी बियाणे लावले तर दुसऱ्या बाजूला हायब्रीड बियाणे लावले आणि एकाला सेंद्रिय खत तर दुसऱ्याला रासायनिक खताचा वापर केला. त्यातून त्यांच्या लक्षात आले की, ज्या बियाणांना सेंद्रिय खत दिले त्या भागातील पिक उत्तम व चांगले आले आणि ज्या भागात रासायनिक खत दिले त्या भागातील पिक तितकेसे चांगले आले नाही, शिवाय रासायनिक खते व औषधे जास्त द्यावी लागली. यातूनच त्यांनी बोध घेऊन यापुढे सेंद्रिय शेती करायची अशी खुणगाठ बांधली. देशी बियाणं आणि सेंद्रिय खताच्या वापरातून त्यांच्या नातवाच्या आरोग्याच्या तक्रारीही थांबल्या.

त्या देशी बियाणे आणि सेंद्रिय शेती करण्याचा उपदेश लोकांना देऊ लागल्या. हे पटवून देण्याचा प्रवास राहीबाईना सोपा नव्हता. म्हणतात ना, कोणत्याही गोष्टीची सुरवात ही सोपी नसते, अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. त्याचप्रमाणे राहीबाईवरही टीका झाल्या, लोक त्यांच्यावर हसतं, कारण. प्रत्येकाकडे शेती होती, सर्व प्रकारचे बियाणे होते पण ते हायब्रीड पद्धतीचे होते. परंतु राहीबाई थांबल्या नाहीत त्यांचे प्रयत्न चालूच होते. त्या प्रयत्नात त्या 'बायफ' या संस्थेला जोडल्या गेल्या, तेंव्हा त्यांनी शेवगा, कडीपत्ता, हदगा, लिंबू, पपई इ. रोपे घेतली आणि हळदी कुंकुवाच्या कार्यक्रमाला त्या वाण म्हणून लोकांना रोपे देऊ लागल्या आणि आताही त्या कार्यक्रमाला महिलांना देशी बियांची पाकिटेचं वाण म्हणून देतात.

ऊस तोडणी करून कारखाना बंद झाला की, त्या घरी येत आणि हातात काही काम नसल्याने त्या रोपे तयार करत. हे काम त्यांनी पाच वर्षे केले. बचतगटातील महिलांना एक - दोन रोपे भेट म्हणून देत, असा त्यांच्या कार्याचा 'श्रीगणेशा' झाला. बचतगटातील महिलाही यात सहभागी होऊ लागल्या. महाराष्ट्राचे तत्कालीन महसूलमंत्री श्री. चंद्रकांत पाटील यांनी त्यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांना बीज बँक उभारण्यास मदत केली. या बँकेत २५० हून अधिक देशी वाणांच्या बिया उपलब्ध आहेत. जगात कोणत्याही आंतरराष्ट्रीय कंपनीकडे उपलब्ध नाहीत अशी बियाणे राहीबाईच्या बीजबँकेत आहेत. नामशेष होत चाललेल्या जुन्या, गावठी बियाणांचे पालेभाज्या, कडधान्ये आणि वेलवर्गीय भाज्यांच्या बियाणांचे जतन केले. तीन हजार शेतकरी व महिलांचा बचतगट तयार करून गावठी व संपूर्ण सेंद्रिय पद्धतीने भाज्या पिकविल्या व मडक्यात जतन केल्या. तसेच कळसुबाई परिसरातील जैवविविधता जपण्यासाठी त्यांनी 'कळसुबाई परिसर संवर्धन समिती' स्थापन केली. या प्रेरणेने नाशिक, अहमदनगर जिल्ह्यातील सुमारे चारशे एकर जमिनीवर गावरान वाणांची शेती केली. पाणी साठविण्यासाठी स्वतःच्या पद्धती तयार केल्या. पडीक जमिनीचे सुपीक जमिनीत रुपांतर करून तेथे उत्पादन घेतले. शेतकरी व विद्यार्थ्यांना बियाणे निवडणे, सुपीक माती ठेवणे, कीटकांचे व्यवस्थापन करण्याचे प्रशिक्षण राहीबाई या स्वतः देतात. आता जिल्ह्यातील चार तालुक्यात ५०% शेतकरी गावरान बियाणे वापरून शेती करतात. हे सर्व त्यांच्याच प्रयत्नांचे यश आहे.

राहीबाई या सगळ्या बियाणाबद्दल खूप आपुलकीने माहिती देतात. त्यांच्या मते, आपण जे खातो त्याने आपले शरीर सदृढ बनते आणि शरीर सदृढ असेल तर मनही सदृढ राहील असा त्यांचा आत्मविश्वास होता. या गोष्टीतून मला काही काव्यपंक्तीचे स्मरण होते,

मिळवलस जगण्याच बळ
पिकविले सुखाचे मोती,
निसर्गच होता तुझा शिक्षक
नि माय धरती,

त्यांच्या या कामातून त्यांना जगण्याचं बळ मिळत गेलं. शेतात सुखाचे मोती पिकवून त्या सगळ्यांना वाटू लागल्या. निसर्गानेच त्यांना घडविले, काळ्या आईने त्यांच्या जीवनाला कलाटणी दिली. त्या म्हणतात, आपल्याला काळ्या आईचे आरोग्य जपले पाहिजे, जर शेतीचा पोत रासायनिक खतांनी खराब झाला असेल तर आपली पुढची पिढी चांगली जन्माला येणारं नाही, आईचे आरोग्य चांगले असेल तर बाळ चांगले जन्माला येते. जमिनीनेचं अन्न चांगले दिले तर पुढची पिढी चांगली राहील. तसेच हायब्रीड शेतीला जास्त प्रमाणात रासायनिक खाते द्यावी लागतात आणि ती खूप महाग असतात, एवढे करूनही त्यांना बाजारभाव मिळत नाही त्यामुळे शेतकरी आत्महत्या करतात हे थांबविण्यासाठी आपण देशी बियाणे व सेंद्रिय खते वापरली पाहिजेत. राहीबाईना शेतीबद्दल खूप प्रेम वाटते, त्या तितक्याच आपुलकीने काम करतात, म्हणूनच तर धरणीमायने त्यांना आपल्या कुशीत सामावून घेतले व आपलसे केले.

या स्वप्नांचे माणिक मोती
शेता शेतात चमकतील,
पाहुनी त्यांच्या नजरेत झोत
मनाच्या मनात ठुमकतील,

यांचे स्वप्न सत्यात उतरले, त्यांच्या या कार्याची ओळख प्रत्येकाच्या मनात ठासून उमटली, त्यांचे शेतीसंबंधी विषयात आवर्जून नाव घेतले जाते. थोर वैज्ञानिक रघुनाथ माशेलकर यांनी त्यांचे वर्णन 'द सिड मदर' म्हणजेच 'बीजमाता' असे केले आहे. तेंव्हापासून त्या बिजमाता या नावानेचं ओळखल्या जाऊ लागल्या. त्यांच्या या कार्याची दखल घेत केंद्र सरकारने २०२० साली त्यांना 'पदमश्री' हा पुरस्कार देऊन राष्ट्रपती रामनाथ कोविद यांच्या हस्ते गौरविण्यात आले. तसेच ८ मार्च २०१८ रोजी भारत सरकारच्या महिला आणि बालकल्याण विभागातर्फे 'नारीशक्ती' पुरस्काराने सन्मानित केले. महाराष्ट्र राज्य कृषी विभागातर्फे आत्मा प्रकल्पांतर्गत 'आदर्श शेतकरी पुरस्कार' देऊन त्यांचा सन्मान केला.

राहीबाई म्हणतात, मातीतील पाय मातीतच राहणार, माझे आणि माझ्या काळ्या आईचे नाते अतूट आहे. तिनेच माझ्या जीवनात पिकांचे मोती फुलविले इतक्या साध्या आणि गरीब शेतकरी कुटुंबातील स्त्रीने खूप महत्वाची गोष्ट सर्वांपुढे मांडली. आजच्या या तंत्रज्ञानाच्या युगात त्यांनी लोकांना भेसळयुक्त पिक आणि देशी बियाणे यातील फरक समजावून दिला, जे की मानवी शरीराला किती उपयोगी आहे. कोणतीही शैक्षणिक पार्श्वभूमी नसताना फक्त शेतातील पिक विविधतेच्या विलक्षण माहितीच्या आधारे त्यांनी मोठा प्रकल्प उभारला. ही त्यांची अतुलनीय गोष्ट जास्त शिकलेल्या माणसाना लाजवेल अशीच आहे. खूप काही शिकण्यासारख्या गोष्टी राहिबाईकडे आहेत. त्या नेहमी शेतकरी, विद्यार्थी व माणसांसाठी आदर्श महिला राहतील. शेवटी मला बा.भ. बोरकरांच्या शब्दांत सांगावेसे वाटते की,

दिव्यत्वाची जेथ प्रचीती
तेथे कर माझे जुळती

★ ★ ★



एक मन

सावरलेल्या मनाला
पुन्हा गुंतवू नको...
शब्दांचे हे खेळ
माझ्यासवे खेळू नको...
तुझ्या अपेक्षांच्या
दोरीत मला बंधू नको...
सावरलेल्या मनाला
पुन्हा गुंतवू नको...

विश्वास जप माझा
विसरुनी मज जाऊ नको...
साथ नकोय आता तुझी
आयुष्यात परत येण्याचा
प्रयत्न करू नको...
सावरलेल्या मनाला
पुन्हा गुंतवू नको...

तृप्ती शिवणकर
बी.सी.ए. भाग १

तंत्रज्ञान शाप की वरदान ?

किरण अनिल पांगारे
बी.सी.ए. भाग २

तंत्रज्ञानाच्या वेगवान प्रगतीने मानवी जीवनात अनेक प्रकारचे बदल केले आहेत. दुधारी तलवार म्हणून तंत्रज्ञानाचे अनेक फायदे आहेत जसे की, माहितीमध्ये प्रवेश सुलभ आणि जलद करणे, त्याचबरोबर अवलंबित्व, गोपनीयतेच्या समस्या, आणि डिजिटल डिव्हाईड रुंदावणे यासारख्या अनेक कमतरता देखील निर्माण झाल्या आहेत. तंत्रज्ञानाच्या दोन्ही बाजूंचा विचार केला असता त्याचे फायदे पुढीलप्रमाणे सांगता येतील.

तंत्रज्ञान एक वरदान

* **माहिती सुलभपणे उपलब्ध होते**

  तंत्रज्ञानाच्या सर्वात महत्वाच्या फायद्यापैकी एक म्हणजे, माहितीच्या विस्तृत श्रेणीमध्ये सहज प्रवेश. इंटरनेट, उदा, कोणतीही माहिती शोधण्यासाठी तयार व्यासपीठ म्हणून काम करते. एकेकाळी मानवी ज्ञानाचे एकमेव धारक असलेल्या लायब्ररीनी त्यांची पोहोच अनेक घरांपर्यंत वाढविली आहे, त्यामुळे अधिक लोकांना माहिती मिळत आहे.

* **संवाद वाढतो**

  तंत्रज्ञानाने जागा आणि वेळ संकुचित केले आहे. त्यामुळे आपल्याला भौगोलिक मर्यादा कापून जलद आणि कार्यक्षमतेने संवाद साधण्याचे विविध मार्ग प्रदान करते. ई.मेल, मजकूर संदेश आणि सोशल मिडिया, प्लॅटफार्म ही संप्रेषण साधनांची काही उदाहरणे आहेत, जी त्वरित माहितीची देवाणघेवाण करण्यास परवानगी देतात.

* **कार्यक्षमता आणि उत्पादकता वाढविते**

  ऑटोमेशन आणि डिजिटलायझेशनमुळे उत्पादनापासून सेवा वितारणापर्यंत विविध क्षेत्रात कार्यक्षमता आणि उत्पादकता वाढली आहे. अत्याधुनिक सॉफ्टवेअर, प्रोग्राम्स उल्लेखनीय गतीने आणि अचूकतेने कार्ये पूर्ण करतात, मानवी चुका आणि प्रयत्न कमी करतात.

* **आरोग्य क्षेत्रातील प्रगती**

  वैद्यकीय तंत्रज्ञानातील प्रगतीमुळे उत्तम निदान साधने, नाविन्यपूर्ण उपचार पद्धती आणि लोकांचे आयुर्मान वाढले आहे. एमआरआय मशीन्स, लेझर शस्त्रक्रिया आणि जनुक थेरपी यासारख्या तंत्रज्ञानामुळे रोगनिदान आणि उपचाराचे चांगले पर्याय उपलब्ध आहेत.

एक शाप म्हणून तंत्रज्ञान

* **अवलंबित्व निर्माण करते**

  तंत्रज्ञान कार्ये सुलभ करत असताना त्यावर अवलंबून राहणे चिंताजनक आहे. गणना किंवा तारखा लक्षात ठेवण्यासारख्या दैनदिन कामांसाठी तांत्रिक उपकरणावर वाढत चाललेल्या अवलंबनामुळे मुलभूत मानसिक क्षमता आणि कौशल्ये कमी होत आहेत.

* **गोपनीयतेची चिंता निर्माण करते**

  डिजिटल युगाच्या उदयामुळे गोपनीयतेच्या गंभीर समस्या निर्माण झाल्या आहेत. आर्थिक व्यवहार, सामाजिक परस्परसंवाद आणि वैयक्तिक माहिती



साठविण्यासाठी इंटरनेटच्या व्यापक वापरामुळे डेटाचे उल्लंघन आणि ओळख चोरी सामान्य झाली आहे.

* **पर्यावरणीय प्रभाव**

इलेक्ट्रॉनिक उपकरणांचे उत्पादन, वापर आणि विल्हेवाट यांचा पर्यावरणावर मोठा प्रभाव पडतो. ई कचरा, उर्जेचा वापर आणि हानिकारक पदार्थांचे प्रकाशन हे तंत्रज्ञानाच्या वाढीमुळे होणारे पर्यावरणीय परिणाम आहेत.

* **डिजिटल डिव्हाइड विस्तृत करते**

डिजिटल डिव्हाईड - ज्यांना तंत्रज्ञानाचा प्रवेश आहे आणि ते नसलेले यांच्यातील दरी रुंद झाली आहे. काहींना तांत्रिक प्रगतीचे फायदे मिळतात, तर काहींना मागे राहून एक असमान समाज निर्माण होतो.

निष्कर्ष

निःसंशयपणे तंत्रज्ञान हे एक शक्तिशाली साधन आहे. ज्यामध्ये मानवी जीवन बदलण्याची शक्ती आहे. हे प्रगती, आर्थिक वाढ आणि सामाजिक विकास उत्पेरीत करते. तथापि, त्याचे प्रतिकूल परिणाम जसे की गोपनीयतेची चिंता, डिजिटल विभाजन आणि चिंताजनक अवलंबित्व दुर्लक्षित केले जाऊ शकत नाही. म्हणून तंत्रज्ञानाचे फायदे वापरणे आणि त्याचे तोटे कमी करणे यामध्ये काळजीपूर्वक संतुलन राखणे आवश्यक आहे. तथापि सावधपणे वापर करून आणि त्याचे परिणाम समजून घेतल्यास तंत्रज्ञान हे शापापेक्षा वरदान ठरू शकते.

★ ★ ★

आई...



आई साठी काय लिहू
आई साठी कसे लिहू
आईसाठी पुरतील एवढे
शब्द नाहीत कोठे
आईवरती लिहिण्याइतपत
नाही माझे व्यक्तिमत्व मोठे

जीवन हे शेत तर आई म्हणजे विहीर
जीवन ही नौका तर आई म्हणजे तीर
जीवन ही शाळा तर आई म्हणजे पाटी
जीवन हे फक्त काम आणि
काम तर आई म्हणजे सुट्टी

आई तू उन्हामधली सावली
आई तू पावसातील छत्री
आई ती थंडीतील शाल
आता यावीत दुःखे खुशाल

आई म्हणजे मंदिराचा उंच कळस
आई म्हणजे अंगणातील पवित्र तुळस
आई म्हणजे भजनात गुणगुणावी अशी संतवाणी
आई म्हणजे वाळवंटात प्यावं असं थंडगार पाणी

आई म्हणजे आरतीला वाजवावी
अशी लयबद्ध टाळी
आई म्हणजे वेदनेनंतरची
सर्वात पहिली आरोळी...

कु.अर्चिता महांगडे
बी.कॉम. भाग १

गृहलक्ष्मी

गृहलक्ष्मी नाव देऊन
फक्त घरात कोंडून ठेवायचं
देवीचं नामाभिमान लावून,
तिचं अस्तित्व नाकारायचं....!

अशी कशी बरं म्हणायची
दुहेरी ती करंटी मानसिकता
त्यासाठीच तर मिळाली असेल का ?
देणगी म्हणून सोशिकता ...!

गृहलक्ष्मी म्हणजे खरेतर
घराची चैतन्यरूपी तारका
मग का बरे होतो तिचा
अपमानच पदोपदी सारखा ...!

गृहलक्ष्मी म्हणजे जणू असते
आदिशक्तीचे प्रेरक रूप,
तिचं फक्त असण सुद्धा देतं
घराला शोभा खूप...!

अजूनही तिच्याविषयी दुटप्पीपणा
समाजात छुपेपणाने वावारतोयं
थोडा का असेना पण आता
समाज तिला सावरतोय...!

खरंच अजून खुपचं
बदल व्हायला हवा
नव्या जगात नवतेचा अन
समतेचा अधिकार तिला द्यायला हवा ... !

प्रिती मांढरे
बी.ए. भाग १





मैत्री

तुझ्या माझ्या मैत्रीबद्दल काय काय बोलावं
पावसाच्या सरी येऊन गेल्यावर इंद्रधनुष्य पाहावं
इंद्रधनुष्यात असतात रंग सात...
प्रार्थना करेन देवाकडे तुझ्या मैत्रीची सदैव असू दे साथ...

मैत्री म्हणजे संकटाशी झुंजणारा वारा
मैत्री म्हणजे विश्वासाने वाहणारा झरा
तू माझ्या आनंदाचा सागर
तू आपल्या आठवणीची घागर

मैत्री म्हणजे स्वप्न नसतं विसरायला
मैत्री म्हणजे पुस्तक नसते संपायला
मैत्री म्हणजे ऋतू नसतो बदलायला
मैत्री कारण असते आयुष्य जगायला

धरलेला हात तू सोडला, दिलेली साथ तू तोडली
मैत्री नावाच्या पुस्तकात एकटीला सोडून गेली
तू परत ये, पुन्हा नव्याने सुरवात करू
मैत्री नावाच्या पुस्तकाला पुन्हा पूर्ण करू

वैष्णवी कापसे
बी.सी.ए. भाग १



माझा काय गुन्हा....?

माझी मायेची कुशी नियतीनं न्यावी,
अन माझ्या कोवळ्या झोपेला झोळीही नसावी...
माझ्या तेलमालीशीला साज धुळीचा असावा
माझ्या दुधाच्या वाटीला चमचाचं नसावा....

माझ्या मायेचा पान्हा, गरिबीनं आटावा,
याहून काय, मोठा गुन्हा माझा असावा...?

नशिबाला आली माझ्या गर्दीची अंगाई,
नशिबाला आली माझ्या गर्दीची अंगाई
अन निजायला मज ट्रेनचीचं भुई
अन निजायला मज ट्रेनचीचं भुई

प्रीतिका जाधव
बी.सी.ए. भाग १

भान

तू स्व मताने फुलात राहा, झुलत राहा पण....
तुझ्या फुलण्या झुलण्याला काटे बोचणार नाहीत याचंही भान असू दे...



तू लहरी हो, स्वच्छंदी हो, कर मुक्त विहार पण ...
सैरभैर होणार नाहीस याचंही भान असू दे...

तू जिद्दी हो, चपळाईने धाव तुझ्या क्षितिजाकडे पण...
प्रत्येक वळणावर विसावून वाट चुकणार नाही याचंही भान असू दे...

स्वतःला सिद्ध करत नवनवी क्षितिजे जिंकत राहा पण...
आपलेपणाला अहंकाराची बाधा येणार नाही याचंही भान असू दे...

दुनिया सोनेरी, चंदेरी आणि गोल आहे पण...
अस्तित्वाचा ठसा उमटवताना स्त्रीत्वाची सीमा मोडणारा नाही याचंही भान असू दे...

संध्या मांढरे

मी कोण ?



आयुष्याच्या चक्रव्युहात मी, मी कोण? याचे सार शोधत चालतो,
प्रत्येक पाऊल एक प्रवास, प्रत्येक क्षण एक संधी यासाठी खोलवर नजर टाकतो,

अनिश्चितेच्या दरीतून तत्परतेने शक्यतेची शिखरे चढतो,
चाचण्या आणि विजयाद्वारे मला आकार देणारे सत्य शोधतो

वाऱ्याच्या कुजबुजात माझे नाव ऐकू येते अन मी सावल्यासोबत नाचतो
प्रकाशाला मिठी मारत अंधारातून मार्गक्रमण करतो

यश, अपयशाचा दुरावा अन अश्रुद्वारे अस्तित्व जाणवते
मी पेरलेले बीजचं माझे अनुभव सांगते,

प्रत्येक सुर्योदयासह माझा पुनर्जन्म होतो, प्रवासात आलिंगन देत मी एक माणूस होतो
मीच माझ्या गाण्याची चाल, मीच कवी आणि मीच कथाकार होतो...

दीपक कोंडके

जीवन आपले

का हसावे, का रडावे
कुणासाठी का झुरावे ।
आयुष्य हे आपुले
आनंदाने जगावे ।।१।।

जीवनात काटे असतील
कितीही
तरी जिद्दीने तू उभे राहावे ।
तू कोण आहे तुलाच ठाऊक
कुणासाठी तू जगावे ।।२।।

तुझी जिद्द, तुझी स्वप्नं
लोकांसाठी का बदलावे ।
आहे आपुनच आपले
आपल्यासाठीच जगावे ।।३।।

येईल यश तुझ्याही पदरात
कष्टाला येईल फळ ।
होऊ नको नाउमेद
मग होईल जे तू म्हणेल ।।४।।

कु.निकिता सूर्यवंशी
बी.ए. भाग २



National Cadet Corps



THORVE OMKAR SHANTARAM
Senior Under Officer
Late RAJESH JADHAV 'BEST COMMANDER AWARD'
LIEUTENANT COLONEL KEDARNATH PANDIT
'BEST CADET' AWARD 2023-2024



DHEKANE PRANAY JANARDAN
Junior Under Officer
BEST JUNIOR UNDER OFFICER AWARD



JADHAV OMKAR BALASO
Junior Under Officer
BEST CAMP SENIOR AWARD



GAIKWAD PAYAL ANIL
Junior Under Officer
BEST CADET AWARD



JEDHE SAHIL BHANUDAS
CQMH
BEST CQMH AWARD'



RAJPUR RAVIRAJ DATTATRY
Sargent
BEST PILOT AWARD



PAWAR AMRUTA DHANAJI
Sargent
BEST PILOT AWARD

।। राष्ट्रीय छात्र सेना ।।



एड्स दिन साजरा करताना ग्रामीण रुग्णालय वाई येथील
विद्या जाधव व चंद्रकांत यादव



योग दिनानिमित्त एन.सी.सी.चे विद्यार्थी
प्रात्याक्षिक करताना



दे.आबासाहेब वीर यांच्या स्मृती प्रित्यर्थ रक्तदान शिबीर :
श्री गजानन भोसले, श्री.दिलीप प्रभुणे व इतर मान्यवर



स्वच्छता ही सेवा वाई कोर्टमध्ये स्वच्छता करताना
एन.सी.सी. कॅडेटस्



मांढरदेवी यात्रेमध्ये केलेल्या सहकार्याबद्दल
मांढरदेवी ट्रस्टच्या वतीने एन.सी.सी. युनिटचा सत्कार



एन.सी.सी. विभागांतर्गत मा.प्रसाद बनकर यांचे
शिवकालिन शस्त्र प्रदर्शनास उपस्थित मा.प्राचार्य व मान्यवर

।। राष्ट्रीय छात्र सेना ।।



पोलिस इन्स्पेक्टर श्री. बाळासाहेब भरणे
Anti-ragging वरती मार्गदर्शन करताना



कमांडिंग ऑफिसर कर्नल एम.ए.राजमनियार यांची
महाविद्यालयास सदिच्छा भेट



'मेरी मिटी मेरा देश' या उपक्रमाचे प्रस्ताविक करताना
कॅप्टन समीर पवार, मा.अध्यक्ष व प्राचार्य



एन.सी.सी. प्रवेश परिक्षा प्रक्रिया



ॲथलेटिक्स या क्रीडा प्रकारामध्ये आमच्या कालीदास हिरवे याने शिव छत्रपती पुरस्कार प्राप्त केला तसेच कु.जनाबाई हिरवे हिने भारत देशाचे प्रतिनिधीत्व आंतरराष्ट्रीय स्तरावर पदकांची कमाई करणारे अनेक खेळाडू आमच्या महाविद्यालयाने तयार केले आहेत. आणि विशेष म्हणजे असे खेळाडू हे ॲथलेटिक्स, आर्चरी, क्रिकेट, फुटबॉल, मल्लखांब, शरीर सौष्ठव, योगा अशा विविध खेळात आहेत.

संस्था आणि महाविद्यालयाने पुरविलेल्या सुविधा आणि प्रशिक्षण याच्या आधारे आमच्या खेळाडूंनी राष्ट्रीय स्तरावर पदके प्राप्त केली आहेत यामध्ये शिव छत्रपती पुरस्काराने सन्मानित आमच्या गुणवान आर्चरी खेळाडू श्री.मयुर रोकडे यांनी साउथ वेस्ट नॅशनल इंटर युनिव्हर्सिटी आर्चरी स्पर्धा गुरूकाशी विद्यापीठ, भटिंडा तसेच ऑल इंडिया इंटर युनिव्हर्सिटी आर्चरी स्पर्धा, पंजाबी विद्यापीठ पटियाला येथे पदकांची कमाई केली आहे.

कलिंगा विद्यापीठ भुवनेश्वर येथे नॅशनल ॲथलेटिक्स मिट मध्ये शिवाजी विद्यापीठ ॲथलेटिक्स संघाने प्रतिनिधीत्व केलेल्या आमच्या कु.संपदा ढमाळ हिने संत तुकडोजी महाराज विद्यापीठ, नागपूर येथे संपन्न झालेल्या ४५ व्या महाराष्ट्र राज्य क्रीडा महोत्सवात दोन पदके संपादन केली आहेत. आमच्या कु.ओमश्री ननावरे, श्री.संकेत शिर्के आणि कु.दिक्षा मांढरे या आर्चरी खेळाडूंनी साऊथ-वेस्ट-नॅशनल इंटर युनिव्हर्सिटी आर्चरी स्पर्धा, गुरूकाशी विद्यापीठ भटींडा येथे आपल्या चांगल्या कार्यमानाचा पुंराव देत ऑल इंडिया इंटर युनिव्हर्सिटी आर्चरी स्पर्धा पंजाबी विद्यापीठ, पटियाला येथे सहभाग नोंदविला तर आमचे हॅडबॉल खेळाडू श्री.आशितोष, सागर यांनी मध्य प्रदेश येथे संपन्न झालेल्या राष्ट्रीय आंतर विद्यापीठ हॅडबॉल सामन्यांमध्ये शिवाजी विद्यापिठाचे प्रतिनिधीत्व केले.

क्रीडा स्पर्धामध्ये उज्वल यश संपादन करण्या-बरोबरच आमचा क्रीडा विभाग हा आयोजनामध्येही अग्रेसर आहे. हॉकी या खेळामध्ये भारत देशाला ऑलंपिक सामन्यांचे अनेक सुवर्ण पदके ज्यांच्यामुळे प्राप्त झाली ते हॉकीचे जादुगार मेजर ध्यानचंद यांच्या जयंती निमित्त साजरा केला जाणारा राष्ट्रीय क्रीडा दिन दि. २९ ऑगस्ट हा दिवस अतिशय उत्साहात आम्ही साजरा केला. या दिवशी पुणे येथील सुप्रसिध्द योगा तज्ञ डॉ.रूपेश थोपटे यांनी विविध प्रात्येक्षिकांसह महाविद्यालयीन जीवनात व्यायाम व आहार याचे महत्त्व विशद केले तर भारतास ऑलंपिक सामन्यांत पहिलेच वैयक्तीक पदक प्राप्त करून देणारे सन्माननीय कै.खशाबा जाधव यांच्या जयंती निमित्त महाराष्ट्र शासनाने याच वर्षापासून दि. १५ जानेवारी हा महाराष्ट्र राज्य क्रिडा दिन म्हणून घोषित केला. पहिला महाराष्ट्र राज्य क्रिडा दिन सुद्धा आम्ही अतिशय उत्साहात पार पाडला या वेळी पुणे येथील नामवंत क्रिडा तज्ञ डॉ.शरद आहेर यांनी आमच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले तसेच शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर अंतर्गत सातारा विभागीय

कबड्डी (महिला) सामन्यांचे आयोजन आम्ही अतिशय यशस्वी रित्या पार पाडले. या सामन्यांचे उद्घाटन आदरणीय डॉ.सुरभीताई भोसले (चव्हाण) यांच्या शुभहस्ते झाले तर पारितोषिक वितरण आमचे प्रायोजक चंदू भोजनालय, शिवनेरी स्पोर्टस, माऊली स्विट होम यांचे मालक अनुक्रमे मा. चंद्रकांत मातारे, मा. विठ्ठलराव सणस आणि मा. सुहासराव पाटणे यांच्या शुभहस्ते संपन्न झाला.

आमच्या महाविद्यालयाच्या जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना क्रीडा स्पर्धांमध्ये सहभागी होता यावे याच हेतूने सर बिली मोरिसा इंटर क्लास ॲथलेटिक्स वाई भूषण श्री.बाळासाहेब बाबर शरीर सौष्ठव स्पर्धा किसन वीर श्री तसेच इंटर क्लास कबड्डी सामन्यांचेही यशस्वी आयोजन केले होते.

संस्था महाविद्यालय आणि शिवाजी विद्यापीठ क्रीडा विभाग यांच्या समर्थ सहकार्य व शिवाजी विद्यापीठ आर्चरी संघ (मुली, मुले) यांचे प्रशिक्षक म्हणून राष्ट्रीय स्तरावर जबाबदारी पार पाडत आहे. तसेच नुकतीच पुणे विद्यापीठ, पुणे येथुन ''जीवन कौशल्ये या संबंधीत पी.एच.डी. प्राप्त करू शकलो.

क्रीडा विभागाचे हे यश जनता शिक्षण संस्थेचे मा. अध्यक्ष, मा.उपाध्यक्ष, सचिव, सहसचिव इतर सर्व संचालक महाविद्यालयाचे मा. प्राचार्य यांचे शुभ आशिर्वाद तसेच माझे सहकारी श्री.मनोज शिंदे, श्री.गजानन जाधव, विद्यार्थी प्रतिनिधी, राष्ट्रीय कबड्डी खेळाडू आणि श्री दत्तात्रय काळे यांचे अथक परिश्रम तसेच क्रीडा समितीचे सर्व सदस्य यांच्या सहकार्याशिवाय प्राप्त करणे केवळ अशक्य झाले असते हे मी नम्रपणे मान्य करतो आणि या सर्वांच्या प्रती मन:पुर्वक कृतज्ञता व्यक्त करतो आणि भविष्यातही असेच शुभाशिर्वाद परिश्रम आणि सहकार्याची खात्री बाळगतो.

आमचे अध्यक्ष मा.मदनदादा हे राष्ट्रीय फुटबॉल खेळाडू असल्यानेच त्यांना क्रीडा विषयी उत्कृष्ट दृष्टी आहे याचा प्रत्यय येतो तो अलिकडेच महाविद्यालयाच्या ट्रॅकचे केलेले संधीकरण तसेच येऊ घातलेल्या कालावधीत इंडोर स्पोर्टस हॉलचे नुतनीकरण लवकरच विद्यार्थ्यांसाठी अनेक विविध क्रीडा सुविधा उपलब्ध होणार असल्याची खात्री मला आहे.

क्रीडा क्षेत्रीय कार्याची दखल घेत संस्थेचे विश्वस्त आदरणीय प्रतापराव भोसले (भाऊ) यांनी माझ्यावर एन.सी.सी. विभागाची जबाबदारी सोपवली. वर्ष २०१० मध्ये ऑफिसर्स ट्रेनिंग ॲकॅडमी (यु.टी.ए.) कामती, नागपूर येथे तीन महिन्यांचे प्रशिक्षण पुर्ण करून मा.राष्ट्रपती सो. यांच्या संमतीने मी ''लेफ्टनंट'' ही भारतीय सेना दलाची रँक प्राप्त करू शकलो.

एन.सी.सी. विभागातील छात्रांना सोबत घेऊन केलेल्या कार्याची दखल घेऊनच डॉ.डी.जी.कमंडेशन कार्ड हा राष्ट्रीय पुरस्कार मी प्राप्त करू शकलो तसेच पुन्हा एकदा एक महिन्याचे प्रशिक्षण करून मा.राष्ट्रपती सो. यांच्या संमतीने ''कॅप्टन'' ही भारतीय सेना दलाची रॅक प्राप्त केली आहे.

- कॅप्टन डॉ.समीर पवार
जिमखाना प्रमुख

राष्ट्रीय छात्र सेना (एन.सी.सी.)

कंधो से मिलते है कंधे
कदमों से कदम मिलते है
हम चलते हे जब ऐसे तो
दिल दुष्मन के खिलते है।

या हिंदी सिनेगीताची प्रचिती यावी असा आमच्या महाविद्यालयातील एन.सी.सी. विभाग आहे. सदर छात्रांना देशभक्तीचे बाळकडू आमच्या महाविद्यालयातील एन.सी. सी. विभागातून मिळते. ''एकता और अनुशासन'' हे ब्रीदवाक्य असलेले राष्ट्राचे हे सर्वांत मोठे Uniform youth service organization म्हणजे (NCC) National Cadet Corps. अर्थातच राष्ट्रीय छात्र सेना ज्या मध्ये शिस्त आणि शिस्तबद्ध जीवन कसं असत ते शिकवल जाते. या छात्रांचे शिस्तबद्ध चालणे, बोलणे, वागणे, वावरणे यातून देशप्रेम ओसंडून वाहत असतो.

इंडियन आर्मीचा एक अविभाज्य घटक असलेली राष्ट्रीय छात्र सेना म्हणजेच NCC चे युनिट आपल्या महाविद्यालयामध्ये गेल्या अनेक दशकांपासून समाविष्ट आहे. अशा दैदीप्यमान परंपरा असणाऱ्या या विभागाचा अहवाल सादर करताना मला मनस्वी आनंद होत आहे.

या शैक्षणिक वर्षाची सुरुवात झाली ती भरती प्रक्रियेने १२ ऑगस्ट २०२३ रोजी महाविद्यालयाच्या NCC युनिटमध्ये नवीन कॅडेट्सची भरती झाली. ज्यामध्ये १६ विद्यार्थी व १७ विद्यार्थ्यांचा समावेश आहे. आणि यांना सामावून घेऊन खडतर प्रशिक्षणाची सुरुवात झाली.

देशाच्या घडामोडीतील सर्वांत महत्त्वाचा दिवस म्हणजे स्वातंत्र्यदिन १५ ऑगस्ट २०२३ च्या स्वातंत्र्यदिनी महाविद्यालयाचे ध्वजारोहण मा. प्राचार्य डॉ.गुरूनाथ फगरे यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी NCC युनिटचा सिनियर अंडर ऑफिसर ओमकार थोरवे याने राष्ट्रीय ध्वजाला सलामी देऊन संचलन करण्याचे नेतृत्व अतिशय शिस्तबद्ध पद्धतीने केले.

* २३ ऑगस्ट २०२३ रोजी क्रिडा दिनानिमित्त डॉ.रूपेश थोपटे सर यांनी उपस्थित विद्यार्थी व कॅडेट्सना मार्गदर्शन केले.

  महाविद्यालयातील दोन खेळांडूना '' शिवछत्रपती राज्य क्रिडा पुरस्कार'' प्राप्त झाला. ४ सप्टेंबर २०२३ रोजी मा. मदनदादा भोसले व डॉ.सुरभीताई भोसले यांच्या हस्ते खेळांडूचा सत्कार करण्यात आला.

* १ ऑक्टोबर २०२३ रोजी जिल्हा व सत्र न्यायालय वाई येथे 'स्वच्छता ही सेवा' या अभियानांतर्गत NCC कॅडेट्सने स्वच्छता मोहिमेत योगदान दिले. यावेळी न्यायाधीश श्री.नंदीमठ व वाई कोर्टचे सर्व वकील उपस्थित होते.

* दरवर्षीप्रमाणे २६ नोव्हेंबर २०२३ या दिवशीसुद्धा Wai Hillside Haff Marathon मध्ये NCC कॅडेट्सने सहभागी होऊन योगदान दिले. त्यावेळी श्री.वायूव गरवारे तसेच सौ. मयूरी गरवारे आणि आमदार मकरंद आबा पाटील उपस्थित होते.

* १ डिसेबंर २०२३ रोजी एड्स दिनानिमित्त आयोजित केलेल्या व्याख्यानमालेमध्ये ग्रामीण रूग्णालय वाई येथील डॉ.विद्या जाधव व डॉ.चंद्रकांत यादव यांनी मार्गदर्शन केले.

* ११ जानेवारी २०२४ रोजी २२ MAH BN NCC सातारा चे नव्याने रूजू झालेले कमांडिंग ऑफिसर Col. M.A.Rajmanar सेना मेडल यांनी महाविद्यालयाच्या NCC युनिटला भेट दिली व कॅडेट्स ना मार्गदर्शन केले. यावेळी बावीस महाराष्ट्र बटालियनचे सुभेदार मेजर तापसे सर, महाविद्यालयाचे प्राचार्य, उपप्राचार्य तसेच प्राध्यापक उपस्थित होते.

  १६ जानेवारी २०२४ रोजी राज्यस्तरीय क्रिडा दिनाच्या निमित्ताने व्याख्यान आयोजित केले होते. त्यावेळी डॉ.शरद आहेर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व संवाद साधला.

* १९ जानेवारी २०२४ रोजी देशभक्त किसन तथा आबासाहेब वीर यांच्या स्मृती प्रित्यर्थ रक्तदान शिबीराचे आयोजन केले होते. या प्रसंगी श्री.महालक्ष्मी देवस्थान ट्रस्ट भुईंजचे अध्यक्ष मा. श्री.गजानन बापू भोसले व रोटरी क्लब सातारा इलाइटचे रोटेरियन श्री.दिलीप प्रभूणे उपस्थित होते. तसेच प्राचार्य डॉ.गुरूनाथ फगरे, उपप्राचार्य, सर्व प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी तसेच सेवक उपस्थित होते. महाविद्यालयाचे आजी-माजी विद्यार्थ्यांनी रक्तदान केले. एकूण ८८ ब्लड बॅग्स अक्षय ब्लडबँकेला देण्यात आल्या.

* दिनांक २० व २१ जानेवारी रोजी रिव्हका साहिल अक्षर इन्स्टिटयूट, वाई या मतिमंद मुलांच्या शाळेचे गॅदरिंग होते. त्यासाठी NCC कॅडेट्सने मदतीच्या स्वरूपात योगदान दिले. त्यावेळी डॉ.अशोक जोशी उपस्थित होते.

* २३ जानेवारी २०२४ श्री.प्रा.मेघश्याम पुंडलिक रेगे यांचे तत्वचितंन व समाजचितंन या विषयावर राष्ट्रीय चर्चासत्र आयोजित केले होते, त्यावेळी NCC कॅडेट्सने अतिशय शिस्तबद्ध पद्धतीने पायलटींग केले.

* २६ जानेवारी २०२४ रोजी प्रजासत्ताक दिनी महाविद्यालयाचे ध्वजारोहण मा. प्राचार्य डॉ.गुरूनाथ फगरे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी NCC युनिट चा सिनियर अंडर ऑफिसर ओमकार थोरवे याने राष्ट्रीय ध्वजाला मानवंदना देऊन संचलनाचे नेतृत्व केले.

* २०२३-२४ च्या एक भारत श्रेष्ठ भारत या Ota नागपूर येथे झालेल्या कॅम्पमध्ये Suo ओमकार थोरवे याने उत्तम कामगिरी बजावली.

* दरवर्षीप्रमाणे पुणे ग्रुप हेडक्वार्टर्स Pune Group Headquarters येथे झालेल्या Pre-Rdc म्हणजेच Pre Republicday मध्ये Juo पायल गायकवाड हिने उत्कृष्ठ कामगिरी बजावली. तसेच JUO प्रणय ढेकाणे याने संपूणे वर्षभरात NCC युनिटची जबाबदारी उत्तमरीत्या पार पाडली.

* JUO ओमकार थोरवे याने केरळ येथे झालेल्या केरला ट्रेक कॅम्पमध्ये उत्तम कामगिरी बजावली.
* तसेच cpl (Carporel). सोनावले करण याने पुणे - औंध येथे झालेल्या आर्मी अॅटॅचमेंट कॅम्पमध्ये उत्तम कामगिरी बजावली.
* तसेच अहमदनगर येथे होणाऱ्या आर्मी अॅटॅचमेंट कॅम्पमध्ये JUO दिनेश देशमुख, JUO रविराज राजपुरे व JUO रितेश पिसाळ या सर्वांनी उत्तम कामगिरी बजावली.

- कॅप्टन डॉ.समीर पवार

राष्ट्रीय सेवा योजना

* दिनांक ०६.०७.२०२३ रोजी राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने महाविद्यालय परिसरात वृक्षारोपण व स्वच्छतेचे आयोजन केले.
* दिनांक ०८.०७.२०२३ रोजी राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना व तालुका विधी सेवा समिती यांच्या संयुक्त विद्यमाने 'पोक्सो कायद्याबाबत जागृती कार्यक्रम' या विषयावर नंदीमठ यांचे विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले.
* दिनांक ०१.०८.२०२३ रोजी राष्ट्रीय सेवा योजना विभागाचा उद्घाटन समारंभ संपन्न झाला. श्री.अनिल गायकवाड यांचे 'वृक्ष संवर्धन काळाची गरज' या विषयावर विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले.
* दिनांक ०५.०८.२०२३ रोजी राष्ट्रीय सेवा योजना विभाग, राष्ट्रीय छात्र सेना व स्टाफ वेलफेअर कमिटी यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ.दीपांजली पवार यांचे मधुमेह संदर्भात विशेष व्याख्यान व तपासणी आयोजित करण्यात आली.
* दिनांक ०८.०८.२०२३ रोजी राष्ट्रीय सेवा योजना विभाग व राष्ट्रीय छात्र सेना यांच्या संयुक्त विद्यमाने आनंद खेडगे यांचे 'घरगुती गॅस सुरक्षा मार्गदर्शन व प्रात्यक्षिक' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले.
* दिनांक ०९.०८.२०२३ रोजी राष्ट्रीय सेवा योजना, मतदार साक्षरता समिती, राज्यशास्त्र विभाग व तहसिलदार कार्यालय, वाई यांच्या संयुक्त विद्यमाने 'मतदार नोंदणी अभियान' राबवण्यात आले. या प्रसंगी डॉ.सुरभी भोसले यांचे विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले. या प्रसंगी तहसिलदार सोनाली मेटकरी, आशा दुधे यांची उपस्थिती होती.
* दिनांक ०९.०८.२०२३ रोजी राष्ट्रीय सेवा योजना व राष्ट्रीय छात्र सेना यांच्या संयुक्त विद्यमाने 'माझी माती माझा देश' अंतर्गत महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना पंचप्राण शपथ देण्यात आली.
* दिनांक १८.०८.२०२३ रोजी राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने राजीव गांधी यांच्या जयंतीनिमित्त सद्भावना दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रारंभी डॉ.सुरभी भोसले यांच्या हस्ते राजीव गांधी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला.
* दिनांक १६.०९.२०२३ रोजी राष्ट्रीय सेवा योजना व राष्ट्रीय छात्र सेना यांच्या संयुक्त विद्यमाने 'माझी माती माझा देश' अंतर्गत माजी सैनिक सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमास मा. मदनदादा भोसले यांनी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहून मार्गदर्शन केले.
* दिनांक २४ सप्टेंबर हा दिवस एन. एस. एस. चा वर्धापन दिन म्हणून साजरा केला जातो. त्यानिमित्ताने दिनांक २५.०९.२०२३ रोजी राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने महाविद्यालय परिसरात स्वच्छतेचे आयोजन करण्यात आले.
* दिनांक २ ऑक्टोबर हा दिवस गांधी जयंती म्हणून साजरा केला जातो. त्यानिमित्ताने दिनांक ०१.१०.२०२३ रोजी राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने स्वच्छता ही सेवा अंतर्गत एक तारीख एक तास स्वच्छता अभियान अंतर्गत महाविद्यालयाच्या वसतीगृह परिसरात स्वच्छतेचे आयोजन करण्यात आले. व स्वयंसेवकांना स्वच्छता शपथ देण्यात आली. या प्रसंगी मा. मदनदादा भोसले यांची उपस्थिती होती.
* दिनांक १९.१०.२०२३ रोजी रोजगार क्षम युवक तसेच नवउद्योजक घडवण्याच्या दृष्टीने पंतप्रधान मा. नरेंद्र मोदी यांच्या शुभहस्ते उद्योजकता कौशल्य विकास केंद्राचे ऑनलाईन पद्धतीने उद्घाटन झाले. राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने त्याचे

स्क्रीनवर प्रक्षेपण करण्यात आले. या प्रसंगी मा. मदनदादा भोसले यांची उपस्थिती होती.

* दिनांक ०७.१०.२०२३ रोजी राष्ट्रीय सेवा योजना व वनपरिक्षेत्र, वाई यांच्या संयुक्त विद्यमाने' वन्यजीव सप्ताह' अंतर्गत मा. स्नेहल मगर यांचे विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले. या प्रसंगी डॉ.प्रशांत सूर्यवंशी यांची उपस्थिती होती.

* दिनांक १३ ते १९ डिसेंबर २०२३ या कालावधीत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथे विद्यापीठ स्तरीय विशेष श्रमसंस्कार शिबिरात आपल्या महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या चार स्वयंसेवकानी सहभागी होऊन सदर विद्यापीठस्तरीय शिबीर यशस्वीरीत्या पूर्ण केले.

* दिनांक ११.१२.२०२३ रोजी विकसित भारत २०४७ युवकांचा आवाज हा कार्यक्रम झाला. यावेळी पंतप्रधान मा. नरेन्द्र मोदी यांच्या शुभहस्ते भारत २०४७ या पोर्टलचे ऑनलाईन पद्धतीने उद्घाटन झाले. राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने त्याचे प्रक्षेपण करण्यात आले.

* दिनांक १४.१२.२०२३ रोजी राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने महाविद्यालच्या मुख्य इमारती समोरील बागेत स्वच्छतेचे आयोजन करण्यात आले.

* दिनांक २९.१२.२०२३ रोजी राष्ट्रीय सेवा योजना, मतदार साक्षरता समिती व तहसिलदार कार्यालय, वाई यांच्या संयुक्त विद्यमाने 'मतदार नोंदणी अभियान' राबवण्यात आले. या प्रसंगी तहसिलदार सोनाली मेटकरी यांचे विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले. या प्रसंगी प्रशांत इंगवले यांची उपस्थिती होती.

* दिनांक ०३.०१.२०२४ रोजी राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त नायगाव ते वाई क्रांतीज्योत आणून सावित्रीबाई फुले यांना आदरांजली वाहण्यात आली.

* किसन वीर महाविद्यालय, वाई राष्ट्रीय सेवा योजना विभाग व शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक ०८ ते १४ जानेवारी २०२४ या कालावधीत शेंदुरजणे येथे 'विशेष श्रमसंस्कार शिबीर' आयोजन करण्यात आले. सदर शिबिराचे उद्घाटन मा. वैभव पवार नायब तहसीलदार, वाई यांच्या शुभहस्ते झाले तर समारोप वैशाली जायगुडे नायब तहसीलदार, वाई यांच्या विशेष उपस्थितीत पार पडला.

* दिनांक २४.०१.२०२४ रोजी राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने पोस्टर प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. प्रदर्शनाचे उद्घाटन श्रीमती स्वाती महाळंक पत्रकार आणि निवेदक, पुणे यांच्या हस्ते झाले. स्पर्धेतील तीन क्रमांक पुढील प्रमाणे श्रावणी सागर उंबरकर, वेष्णवी संजय महांगडे, भूमिका अर्जुन धनावडे. या स्पर्धेचे परीक्षक म्हणून संदीप पातुगाडे व रवीन्द्र जमदाडे यांनी काम केले.

* दिनांक २५.०१.२०२४ रोजी राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने रांगोळी व निबंध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. रांगोळी स्पर्धेतील तीन क्रमांक पुढील प्रमाणे भाग्यश्री संतोश बोधे, सानिका सर्जेराव येवले, साक्षी दगडू जाधव. रांगोळी स्पर्धेचे परीक्षक म्हणून दिपाली चव्हाण व दिपाली पाटील यांनी काम केले. निबंध स्पर्धेतील तीन क्रमांक पुढील प्रमाणे स्नेहल संतोष शिर्के, यशस्वीनी सुनील चोरगे, सना ताहीर शहा. निबंध स्पर्धेचे परीक्षक म्हणून डॉ.अमोल कवडे व डॉ. अरुण सोनकांबळे यांनी काम केले.

* दिनांक २५.०१.२०२४ रोजी राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने नवमतदारांना मतदानाची शपथ देण्यात आली. यावेळी नायब तहसिलदार आशा दुधे यांनी नवमतदारांना मार्गदर्शन केले.

* दिनांक २५.०१.२०२४ रोजी राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त पंतप्रधान मा.नरेंन्द्र मोदी यांनी नवमतदारांशी ऑनलाईन पद्धतीने संवाद साधला. राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने त्याचे स्क्रीनवर प्रक्षेपण करण्यात आले. डॉ.सुरभी भोसले यांनी नवमतदारांना मार्गदर्शन केले. या प्रसंगी मा. मदनदादा भोसले यांची उपस्थिती होती.

* दिनांक २६.०१.२०२४ रोजी भारतीय प्रजासत्ताक दिनानिमित्त राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत २५.०१.२०२४ रोजी महाविद्यालच्या मुख्य इमारती

समोरील परिसर स्वच्छतेचे आयोजन करण्यात आले.

* दिनांक ०२.०२.२०२४ रोजी राष्ट्रीय सेवा योजना व प्रादेशिक परिवहन कार्यालय, सातारा यांच्या संयुक्त विद्यमाने' राज्य रस्ता सुरक्षा सप्ताह -२४' अंतर्गत रस्ता सुरक्षा जागर या विषयावर मा. अक्षय खोमणे व पूजा लोखंडे यांचे विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले. या प्रसंगी राजू पिसाळ यांची उपस्थिती होती.
* दिनांक ०६ ते १२ फेब्रुवारी २०२४ या कालावधीत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथे विद्यापीठस्तरीय विशेष श्रमसंस्कार शिबिरात आपल्या महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या चार स्वयंसेवकानी सहभागी होऊन सदर विद्यापीठस्तरीय शिबीर यशस्वीरीत्या पूर्ण केले.
* दिनांक ०९.०२.२०२४ रोजी राष्ट्रीय सेवा योजना व राष्ट्रीय छात्र सेना विभागातील विद्यार्थ्यांनी वाई तालुक्यातील दिव्यांगाना सहकार्य केले. वाई पंचायत समितीच्या वतीने वाई विकास गटातील ४३१ दिव्यांग लाभार्थ्यांना कृत्रीम अंग निर्माण निगम, मुंबई यांच्याकडून प्राप्त झालेल्या साहित्याचे वाटप शुक्रवार दि. ०९ फेब्रुवारी रोजी करण्यात आले. व्हीलचेअर , स्वयंचलित सायकल, चालण्याची काठी, श्रवण यंत्र, स्मार्ट फोन, अंध व्यक्तींची चालण्याची काठी अशा वस्तूंचे वाटप करताना एन.एस. एस. चे स्वयंसेवक व एन. सी. सी. चे छात्र यांनी दिव्यांग लाभार्थ्यांना मंच्यापर्यंत घेऊन जाणे, जागेवर बसण्यासाठी मदत करणे. चालता न येणाऱ्या दिव्यांगांना उचलून कार्यक्रम स्थळी घेऊन जाणे, त्यांना फूड पॅकेट व पाणी देणे. असे सेवाभाव मनात ठेवून विद्यार्थ्यांनी वाई तालुक्यातील दिव्यांगाना मदतीचा हात दिला.
* दि. १५ फेब्रुवारी ते १७ फेब्रुवारी २०२४ या कालावधीत विद्यार्थी विकास विभाग शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर विभागाच्या वतीने बहाई अॅकॅडमी, पाचगणी येथे नेतृत्व विकास शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. सदर नेतृत्व विकास शिबिरासाठी आपल्या महाविद्यालया-तील राष्ट्रीय सेवा योजना विभागातील एक स्वयंसेविका सहभागी होऊन सदर विद्यापीठस्तरीय शिबीर यशस्वीरीत्या पूर्ण केले.
* दि. २४ फेब्रुवारी ते २६ फेब्रुवारी २०२४ या कालावधीत शिवाजी विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना कक्ष आणि देशभक्त आनंदराव बळवंतराव नाईक महाविद्यालय, चिखली यांच्या संयुक्त विद्यमाने पन्हाळा ते पावनखिंड- शिव पावन प्रेरणा मोहीम शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. आपल्या महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या आठरा स्वयंसेवकानी सहभागी होऊन सदर विद्यापीठस्तरीय शिबीर यशस्वीरीत्या पूर्ण केले.
* दि. ०३ मार्च २०२४ रोजी राष्ट्रीय सेवा योजना विभागातील स्वयंसेवकांनी वाई शहरातील विविध केंद्रांवर राष्ट्रीय पल्स पोलिओ अभियानात सहभाग घेऊन, अभियानात आपले योगदान दिले. या राष्ट्रीय व समाजोपयोगी कामातून समाधान मिळाल्याची भावना विद्यार्थ्यांनी बोलून दाखवली.
* दिनांक ०५.०३.२०२४ रोजी राष्ट्रीय सेवा योजना व राष्ट्रीय छात्र सेना विभागातील विद्यार्थ्यांनी वाईतून रॅली काढून मतदार जागृती केली. महाविद्यालया-पासून सिद्धनाथवाडी मार्गे वाई शहरातून बसस्थानकापर्यंत 'मतदार राजा जागा हो, लोकशाहीचा धागा हो', 'मतदान करूया, देश घडवूया', 'माझे मत, माझा अधिकार' अशा घोषणा देऊन, मतदाराच्यात जागृती निर्माण केली.
* विविध व्याख्यानांचे अध्यक्षस्थान मा.प्राचार्य डॉ.गुरुनाथ फगरे यांनी भूषविले व सर्व उपक्रमांना सहकार्य व मार्गदर्शन केले. तसेच रा.से.यो. सल्लागार प्रो.(डॉ.) सुनील सावंत व डॉ.चंद्रकांत कांबळे यांचे सहकार्य लाभले.

कार्यक्रम अधिकारी
डॉ.संग्राम थोरात व डॉ.अंबादास सकट

ग्रंथालय विभाग

आपल्या महाविद्यालयाच्या ज्ञानाचे भांडार असणाऱ्या संगणकीकृत ग्रंथालयात चालू शैक्षणिक वर्षामध्ये ३९८ पुस्तकांची भर पडून एकूण ग्रंथसंख्या ८१७०७ झालेली आहे. ग्रंथालयात उपयुक्त अशा विविध विषयांची ७६ नियतकालिके नियमित येत आहेत. आमचे महाविद्यालयीन ग्रंथालयाचे सभासद असून याव्दारे जवळजवळ २१००+ ई जर्नल्स् व ८००००+ ई-बुक्स ऑनलाईन उपलब्ध झाली आहेत. ग्रंथालयामध्ये Vriddhi सॉफ्टवेअर उत्कृष्ट पध्दतीने कार्यरत आहे. Vriddhi या सॉफ्टवेअरमुळे वाचकांचा अमूल्य वेळ वाचून त्यांना उत्तम सोयी मिळत असल्याने वाचकवर्ग संतुष्ट आहे. गंथालयाच्या इतर माहितीसाठी ग्रंथालयाच्या वेबसाईटला (www.kvmwailibrary.weebly.com) भेट देता येईल तसेच KVM Library App हे सुध्दा Google Playstore वरुन फ्रीमध्ये डाउनलोड करुन ग्रंथालय योजनेची माहिती व अनेक मराठी, हिंदी आणि इंग्रजी भाषेतील ई-बुक्सही डाउनलोड करून वाचता येतील.

चालू शैक्षणिक वर्षामध्ये ग्रंथालय विभागाने खालील उपक्रम घेतले आहेत.

१) भारतीय ग्रंथालयशास्त्राचे जनक डॉ.एस. आर. रंगनाथन यांच्या जयंतीनिमित्त १२ ऑगस्ट हा दिवस महाविद्यालयात 'ग्रंथपाल दिन' म्हणून साजरा करण्यात आला.

२) ग्रंथालय विभागामार्फत डॉ.अब्दुल कलाम यांचा जन्मदिवस १५ ऑक्टोबर हा दिवस 'वाचन प्रेरणा दिन' म्हणून साजरा करण्यात आला. सदर वाचन प्रेरणा दिनाच्या निमित्ताने दि. १३ ऑक्टोबर २०२३ रोजी श्री.जगन्नाथ आत्माराम विभूते यांचे 'माझे वाचन - माझी प्रेरणा' या विषयावर व्याख्यान आयोजित केले होते.

३) मराठी भाषा विभाग, महाराष्ट्र राज्य मराठी विष्वकोष निर्मिती मंडळ व ग्रंथालय विभाग आणि अंतर्गत दर्जा हमी कक्ष, किसन वीर महाविद्यालय, वाई यांच्या संयुक्त विद्यमाने ११ डिसेंबर हा दिवस श्रेष्ठ तमिळ कवी व स्वातंत्र्यसेनानी सुब्रहमण्य भारती यांचा जन्मदिवस 'भारतीय भाषा दिवस' म्हणून साजरा करण्यात आला. या निमित्ताने श्री.प्रा.डॉ.महेश देवकर (सावित्रीबाई फुले विद्यापीठ, पुणे) यांचे 'भारतीय भाषा संस्कृती आणि आजचा युवक' या विषयावर दि. १० डिसेंबर रोजी २०२३ रोजी व्याख्यान आयोजित केले होते.

४) दि. २७/०२/२०२४ रोजी मराठी विभाग, ग्रंथालय विभाग व अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने ज्ञानपीठ पारितोषिक विजेते लेखक वि. वा. शिरवाडकर उर्फ कविवर्य कुसुमाग्रज यांचा २७ फेब्रुवारी हा जन्मदिवस 'मराठी राजभाषा गौरव दिन' म्हणून साजरा करण्यात आला. यानिमित्ताने ग्रंथदिंडी, भित्तीपत्रक प्रदर्शन तसेच मराठी विश्वकोषाचे सहा. संपादक श्री.सरोजकुमार मिठारी यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

डॉ.शिवाजी कांबळे
ग्रंथपाल

मराठी विभाग

* मराठी विभाग व वाङ्मय मंडळ यांच्या वतीने दि.२०/१०/२०२३ रोजी 'मराठी स्वाक्षरी' स्पर्धा आयोजित करण्यात आली. या स्पर्धेसाठी महाविद्यालयातील अनेक विद्यार्थ्यांनी उस्फुर्त सहभाग नोंदविला.

* मराठी विभाग व अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने अग्रणी महाविद्यालय योजने अंतर्गत दिनांक २१/१०/२०२३ रोजी 'विशेष व्याख्यान' व 'मराठी स्वाक्षरी ' स्पर्धा पारितोषिक वितरण समारंभ आयोजित केला गेला. यावेळी डॉ.विपीन वैराट, शंकरराव जगताप महाविद्यालय वाघोली यांचे अण्णा भाऊ साठे आणि व्यंकटेश माडगूळकर यांच्या कथा या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले.

* मराठी विभागाच्या वतीने दि.११/१२/२०२३ रोजी भारतीय भाषा दिवस साजरा करण्यात आला. या कार्यक्रमामध्ये ' मराठी साहित्य आणि मराठी भाषा ' या विषयावर भित्तीपत्रक प्रदर्शन भरविण्यात आले.

* मराठी विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्त दि.२४/०१/२०२४ रोजी विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी

श्रीमती स्वाती महाळंक (जेष्ठ पत्रकार आणि निवेदक, पुणे) यांनी मराठी भाषेच्या अध्ययनातून मिळणाऱ्या नोकरीच्या संधी या विषयावर व्याख्यान दिले.

* दिनांक २५/०१/२०२४ रोजी 'राष्ट्रीय मतदार दिना' निमित्त मराठी विभाग, राष्ट्रीय सेवा योजना व मतदार साक्षरता समिती यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयातीलयीन विद्यार्थ्यांसाठी निबंध,रांगोळी व पोस्टर (भित्तीपत्रक) स्पर्धांचे आयोजन करण्यात आले.
* मराठी विभाग प्रमुख डॉ.चंद्रकांत कांबळे हे छ. शिवाजी कॉलेज सातारा येथे मराठी विभागाने आयोजित केलेल्या आतंरराष्ट्रीय चर्चासत्रामध्ये शोधनिबंध सादरीकरण या सत्राचे अध्यक्ष व 'जागतिक शांतता आणि प्रगतीसाठी मराठी कादंबरीचे योगदान ' या विषयावर शोधनिबंध सादर. तसेच 'भावअनुबंध' या युजीसी केअर लिस्टेड जनरलमध्ये शोधनिबंध प्रसिद्ध.
* डॉ.संग्राम थोरात यांनी शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर व म.गांधी इन्स्टीट्युट, मॉरिशस यांच्या सयुंक्त विद्यमाने ' भारत -मॉरिशस आंतर सांस्कृतिक व राजनैतिक संबध : कला, संस्कृती व साहित्य विषयक चिंतन ' या विषयावरील दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय चर्चासत्रात मॉरिशस या ठिकाणी सहभागी होऊन' मॉरिशस मधील मराठी कथा ' या विषयावर शोधनिबंध सादर केला.
* डॉ.अमोल कवडे यांच्या पीएच. डी. प्रबंधास मुंबई विद्यापीठाचा उत्कृष्ट प्रबंध म्हणून 'डॉ.अ.का. प्रियोळकर ' पुरस्कार नुकताच देण्यात आला.
* श्री.प्रा.सुमती कांबळे ह्या छ. शिवाजी कॉलेज सातारा येथे मराठी विभागाने आयोजित केलेल्या आंतरराष्ट्रीय चर्चासत्रात सक्रीय सहभागी झाल्या.
* डॉ.चंद्रकांत कांबळे यांनी दि. २५ फेब्रुवारी २०२४ रोजी वाई पंचक्रोशी साहित्य संमेलनामध्ये,'वाई परिसरातील साहित्य परंपरा ' या विषयावर व्याख्यान दिले.
* विभागाने आयोजित केलेल्या विविध कार्यक्रमासाठी विभागातील सहकारी डॉ.धनंजय निंबाळकर, डॉ.संग्राम थोरात, डॉ.अमोल कवडे व श्री.प्रा.सुमती कांबळे यांचे सहकार्य लाभले.

- डॉ.चंद्रकांत कांबळे
विभागप्रमुख

हिंदी विभाग

जनता शिक्षण संस्थेचे, किसन वीर महाविद्याल, वाई, हिंदी विभाग, शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये अनेक उपक्रम राबविण्यात आले.

१. शैक्षणिक वर्ष २०२३-२४ प्रथम सत्रामध्ये किसन वीर महाविद्यालय, वाई, अग्रणी महाविद्यालय व हिंदी विभागाच्या वतीने १० ऑक्टोबर २०२३ रोजी सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालय, सातारा येथील प्राध्यापक व हिंदी विभाग प्रमुख डॉ.गजानन भोसले यांचे 'नई शिक्षा नीति और हिंदी भाषा' विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. डॉ.भोसले यांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण आणि हिंदी भाषाचे महत्व विद्यार्थ्यांना पटवून दिले.

२. हिंदी विभागाच्या वतीने १० ऑक्टोबर २०२३ रोजी भित्तीपत्रिका प्रदर्शन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे उद्घाटन आमदार शशिकांत शिंदे महाविद्यालय, मेढा, साताराचे हिंदी विभागाचे सह प्राध्यापक एवं अध्यक्ष डॉ.संग्राम शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. यामध्ये एकूण २७ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक प्राप्त विद्यार्थ्यांचे प्रमाणपत्र व रोख पारितोषिके प्रदान करून त्यांना सन्मानित करण्यात आले.

३. शैक्षणिक वर्ष २०२३-२४ द्वितीय सत्रामध्ये शिवाजी विद्यापीठ, कोल्हापुर व किसन वीर महाविद्यालय, वाई हिंदी विभागाच्या वतीने बी.ए. भाग २ हिंदी आय. डी. एस. पुनर्रचित अभ्यासक्रम २०२३-२४ वर आधारित एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन दिनांक- बुधवार, २७ डिसेंबर २०२३ रोजी करण्यात आले होते. कार्यशाळा एकूण चार सत्रांमध्ये विभाजित होती. सदर कार्यशाळेचे उद्घाटन मा.प्राचार्य डॉ.गुरुनाथ फगरे यांच्या हस्ते करण्यात आले. बीजभाषक म्हणून शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर विद्या परिषद सदस्य, जयसिंगपूर महाविद्यालय, जयसिंगपूर हिंदी विभागाचे प्राध्यापक व प्रमुख डॉ.सुनील बनसोडे होते. प्रमुख उपस्थिती शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, हिंदी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष प्रो.डॉ.साताप्पा सावंत हे

होते. द्वितीय व तृतीय सत्रामध्ये अनुक्रमे प्रश्नपत्र- १ व २ वर शिवाजी विद्यापीठ अंतर्गत महाविद्यालयातील विषयतज्ञांनी मार्गदर्शन केले. चतुर्थ सत्र समारोप समारंभाचे प्रमुख पाहुणे शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, हिंदी अभ्यास मंडळाचे सदस्य डॉ.संग्राम शिंदे होते. कार्यशाळेचे समन्वयक हिंदी विभाग प्रमुख प्रा.डॉ.भानुदास आगेडकर व सह समन्वयक डॉ.अरुण सोनकांबळे व प्रा.सौ.निलम भोसले होते. अनेक शिक्षक तसेच विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.

४. शैक्षणिक वर्श २०२३-२४ द्वितीय सत्रामध्ये ३ फेब्रुवारी २०२४ रोजी बी.ए.भाग-२ साठी 'समूह चर्चा' आयोजित करण्यात आले. 'हिंदी भाषा में रोजगार के अवसर' या विषयावर विद्यार्थ्यांनी साधक-बाधक चर्चा करण्यात आली. यावेळी हिंदी विभाग प्रमुख प्रा.डॉ.भानुदास आगेडकर, डॉ.अरुण सोनकांबळे व प्रा.सौ.निलम भोसले उपस्थित होते.

५. हिंदी विभाग प्रमुख प्रा.डॉ.भानुदास आगेडकर व डॉ.अरुण सोनकांबळे यांचा संयुक्त शोध निबंध लोकायत प्रकाशन, सातारा प्रकाशित 'वैज्ञानिक दृष्टीकोन: सामाजिक जाणीव जागृती' संपादित पुस्तकामध्ये मध्ये 'कबीर कि वाणी में वैज्ञानिक दृष्टि' हा शोधनिबंध प्रकाशित झाला.

६. २७ फेब्रुवारी २०२४ रोजी हिंदी विभाग, किसन वीर महाविद्यालय, वाईतील विद्यार्थ्यांची शैक्षणिक सहल छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा येथील ग्रंथालयाला भेट देण्यात आली.

७. हिंदी विभागातील डॉ.अरुण सोनकांबळे यांचा अक्षरा अंतरराष्ट्रीय रिसर्च जर्नल मधून जानेवारी २०२४ मध्ये 'हिंदी भाषा के विकास में अनुवाद की उपयोगिता' या विषयावर शोधनिबंध प्रकाशित झाला.

८. विभागातील विविध उपक्रमामध्ये डॉ.अरुण सोनकांबले व सौ.निलम भोसले यांचे सहकार्य लाभले.

- प्रो.(डॉ) भानुदास आगेडकर
विभागप्रमुख

Department of English

The Department of English in collaboration with Literary Association organized Poster Presentation on "Movie Adaptations" on 13 October 2023. Dr. Manoj Gujar and Dr. Ravindra Bakare worked as Juries. In all, 50 students participated, and 29 Posters were displayed. Rutuja Santosh Kochle (First Rank for Dil Bechara), Saniya and Muskan Ashpak Kazi (Second Rank for 2 States), Vishaka Chandrakant Vare (Third Rank for Raazi), Harshal Amol Pawar & Akshay Rajendra Beloshe (Fourth Rank for Asuran) and Namrata Anand Khude (Fifth Rank for Natsamrat) were winners.

The Department of English in collaboration with Department of BCA & IQAC organized Guest Lecture on "Mastering Communication Skills" under Lead College Scheme on 13thOctober 2023. Dr. Manoj Gujar was invited as the Resource Person for the Guest Lecture.

The Department of English organized Poster Presentation and Poetry Recitation Competitions to celebrate "Bharatiya Bhasha Utsav Din (Indian Languages Day)" on 11th Dec. 2023.

The Departments of English & History, Research & Development Cell & IQAC in collaboration with SUHTA & ELT@I Satara Chapter successfully organized One-Day Workshop on "Recent Trends in Research" under Lead College Scheme: Mega Event on 6th January 2024. Dr. Avnish Patil (History) and Dr. Raghunath Kadakane (English) were Resource Persons.

Namrata Anant Khude (PG student) presented her research through the Poster in Institution Level Avishkar Research Competition organized on 17th October 2023 and also at University Level Avishkar Research Competition organized at Shivaji University, Kolhapur on 13th December 2023.

Prof. (Dr.) Sunil Sawant was the Chief Guest of the Inaugural Ceremony in the National Conference on "National Education Policy 2020 and Teaching of English" organized at Venutai

Chavan College, Karad on 23rd February 2024. He also participated as a Resource Person in the National Conference on "Bhasha evam Sanskriti: Dynamics of Culture in Marathi, Hindi, and English" organized by Balasaheb Desai College, Patan on 15th March 2024. He likewise worked as a Resource Person in Wai, Nesari and Khandala.

Dr. Balkrishna Magade's research project entitled "Exploration in Cinematic Ecocriticism of Select Marathi Films (2001-2020)" have been accepted for the financial support under Diamond Jubilee Research Initiation Scheme 2022-2023 by Shivaji University, Kolhapur from 11/10/2023 for the period of two years. Dr. Magade presented his Research Paper on "Emergence of Ecological Concerns in Post 2000 Marathi Films" in 4th AFSSA Three-Day Online International Conference on Contemporary South Asian Cinemas" organized on 2nd, 3rd, and 4th February 2024.

Dr. Ambadas Sakat presented his Research Paper at the International Conference organized on 26th October 2023 at Chhatrapati Shivaji College, Satara.

Mrs. Reshmabano Mulani participated and presented research paper entitled "Cultural Identity in the Diasporic Writings of Azar Nafisi's Reading Lolita in Tehran and Amani Al Khatahtbeh's Muslim Girl: a Coming of Age" in the International Webinar organized by Savitribai Phule Mahila Mahavidyalaya, Satara on 24/02/2024.

Prof. (Dr.) Sunil Sawant
Head

संस्कृत विभाग

संस्कृत विभागाच्या वतीने दि.२८ ऑगस्ट २०२३ रोजी बी.ए भाग.१ च्या विद्यार्थ्यांची अभ्यास भेट प्राज्ञपाठशाळा मंडळ वाई येथे आयोजित करण्यात आली.

दि.१७ ऑक्टोंबर २०२३ रोजी संस्कृत ब्रीदवाक्यम् रङ्गवल्ली स्पर्धा आयोजित करण्यात आली.

दि.९ जानेवारी २०२४ रोजी जीवन उपयोगी वस्तुंचे प्रदर्शन भरवण्यात आले. तसेच सौ.संध्या पानसे यांचे 'आधुनिक काळातील संस्कृत' या विषयावर मार्गदर्शनपर व्याख्यान आयोजित करण्यात आले.

- प्रा.दीक्षा मोरे
विभागप्रमुख

इतिहास विभाग

इतिहास व इंग्रजी विभाग, संशोधन व विकास कक्ष , अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष, शिवाजी विद्यापीठ इतिहास परिषद आणि अखिल भारतीय इंग्रजी शिक्षक परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने अग्रणी महाविद्यालय योजनेच्या "Mega Event' अंतर्गत संशोधनातील वर्तमानकालीन प्रवाह या विषयावर दि.०६/०१/२०२४ रोजी एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. याप्रंसगी शिवाजी विद्यापीठातील इतिहास विभागप्रमुख डॉ.अवनीश पाटील, छत्रपती राजाराम कॉलेज, कोल्हापूर येथील इंग्रजी विभागप्रमुख डॉ.रघुनाथ कडाकणे हे साधनव्यक्ती म्हणून मार्गदर्शन केले.

शिवजयंतीनिमित्त इतिहास विभाग, आयक्यूएसी व शिवाजी विद्यापीठ इतिहास परिषद,कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने 'छत्रपती शिवाजी महाराजाचे आदर्श नेतृत्त्व' या विषयावर दि. २०/०२/२०२४ रोजी डॉ.दिपक जाधव, इतिहास विभाग लालबहादूर शास्त्री महाविद्यालय, सातारा यांचे विशेष निमंत्रित व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

डॉ.भिमाशंकर बिराजदार यांच्या 'एनव्हायरमेंटल अँड इकॉलॉजीकल मुव्हमेंट्स इन महाराष्ट्र (१९६०-२०१०)' या विषयावरील शोधप्रबंधास 'उत्कृष्ट पीएच.डी.शोधप्रबंध' म्हणून निवड करून 'श्रीमती सीताबाई कुलकर्णी पारितोषिक' शिवाजी विद्यापीठाने पदवीदान समारंभात प्रदान केले.

डॉ.भिमाशंकर बिराजदार यांचे संगमेश्वर महाविद्यालय, सोलापूर येथील इतिहास विषयाच्या 'बोर्ड ऑफ स्टडीज'वर (२०२३ ते २०२६) सदस्य व शिवाजी विद्यापीठ इतिहास परिषदेच्या कार्यकारिणीवर देखील सदस्यपदी निवड करण्यात आले आहे.

डॉ.भिमाशंकर बिराजदार यांनी 'युजीसी केअर' यादीतील मान्यताप्राप्त संशोधनपत्रिकेत ०४ संशोधनपर लेख प्रकाशित केले. आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय चर्चासत्र/ परिषदांमध्ये एकूण ०३ शोधनिबंध सादर केले. तसेच

आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय चर्चासत्रात Resource Person (साधनव्यक्ती) म्हणून काम पाहिले.

डॉ.भिमाशंकर बिराजदार यांचे "Global Climate Change and Environmental Sustainability: Challenges and Developmental Alternatives in Western Maharashtra' या विषयावरील 'लघु संशोधन प्रकल्पास' (Minor Research Project) रू. १,००,०००/- अनुदान (शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्याकडून "Diamond Jubilee Research Initiation Scheme' अंतर्गत) मंजूर करण्यात आले आहे.

डॉ.भिमाशंकर बिराजदार
विभागप्रमुख

भूगोलशास्त्र विभाग

कार्यशाळा - दि. १४/१०/२०२३ रोजी 'स्पर्धा परीक्षांची तयारी' याविशयाची कार्यशाळा आयोजित केली. सदर कार्यशाळेत मा. अभिजित निकम, उपजिल्हाधिकारी, गोवा राज्य व मा. तेजस काटे, ज्युनिअर इंजिनीअर निवड यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

प्रकल्प- बी.ए.भाग-३ भूगोलशास्त्र या वर्गातील विद्यार्थ्यांनी दि. १४/१२/२०२३ रोजी मौजे. मुंगसेवाडी ता, वाई, या गावाचे सर्वेक्षण करून प्रकल्प अहवाल तयार केला. त्यांना प्रो.डॉ.विनोद वीर, प्रा.मनिषा शेवाळे, प्रा.स्वप्निल कदम व डॉ.किरण मजलेकर यांनी मार्गदर्शन केले.

अभ्यास सहल- बी.ए. भाग-३ भूगोलशास्त्र या वर्गातील विद्यार्थ्यांची अभ्यास सहल दि.०२/०२/२०२४ ते दि. ०३/०२/२०२४ रोजी हरिहरेश्वर, दिवेआगार, श्रीवर्धन, मुरुड जंजिरा, या ठिकाणी आयोजित केली.

व्याख्याने -

दि. ०१/०३/२०२४ रोजी "Application of Advance Technology in Geography' याविषयावर व्याख्यान आयोजित केले. प्रा.डॉ.विनोद पवार, आमदार शशिकांत शिंदे महाविद्यालय, मेढा यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

दि. ०५/०३/२०२४ रोजी "Global Warming' याविषयावर व्याख्यान आयोजित केले. प्रा.डॉ.समाधान शिंदे, श्रीपतराव कदम महाविद्यालय, शिरवळ यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

दि. ०७/०३/२०२४ रोजी "Research Methodology in Geography' याविषयावर व्याख्यान आयोजित केले. श्री.प्रा.डॉ.प्रविण जाधव, लाल बहादूर शास्त्री महाविद्यालय, सातारा यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

सदिच्छा समारंभ - बी.ए. भाग-३ भूगोलशास्त्र या वर्गातील विद्यार्थ्यांना सदिच्छा समारंभ दि.१५/०३/२०२४ रोजी आयोजित केला. प्राचार्य डॉ.गुरुनाथ फगरे व उपप्राचार्य डॉ.ज्ञानदेव झांबरे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व भविष्यासाठी शुभेच्छा!

प्रो.डॉ.विनोद वीर
विभागप्रमुख

अर्थशास्त्र विभाग

१) दिनांक १६/ १०/ २०२३ रोजी अर्थशास्त्र विभाग अंतर्गत व अग्रणी महाविद्यालय योजना अंतर्गत Guest lecture घेण्यात आले. या कार्यक्रमाला प्रमुख व्याख्याते म्हणून डॉ. ए. के. पाटील (अर्थशास्त्र विभाग प्रमुख S. G .M. Collage Karad) यांनी बदलत्या आर्थिक पर्यावरणात नव उद्योजकांना संधी व आव्हाने या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष किसन वीर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गुरुनाथ फगरे हे उपस्थित होते. तसेच लीड कॉलेजच्या समन्वयक प्रा. बी. बी. पटकुरे, व महाविद्यालयातील विविध विभागातील प्राध्यापक या कार्यक्रमाला उपस्थित होते.

२) महाविद्यालयातील अर्थशास्त्र विभाग आणि अग्रणी महाविद्यालय योजने अंतर्गत Economics Olympiad २०२३-२४ हा तीन दिवसीय कार्यक्रम आयोजित करण्यात आला. २.१) डॉ. नीरज हातेकर (प्रोफेसर, स्कूल ऑफ डेवलोपमेंट, अझीम प्रेमजी युनिवर्सिटी, बेंगलोर) यांच्या हस्ते भित्ती पत्रकाचे उद्घाटन केले. पोस्टर प्रेसेंटेशन मध्ये एकूण वीस विद्यार्थ्यांनी पोस्टर सादरीकरणांमध्ये सहभाग घेतला होता. या सादरीकरणाचे उद्घाटन व निरीक्षण डॉ. नीरज हातेकर व प्राचार्य डॉ. फगरे सर यांनी केले. डॉ. चंद्रकांत कांबळे व सोनकांबळे यांनी या भित्ती पत्रकांचे परीक्षण केले.

२.२)दिनांक १ फेब्रुवारी २०२४ रोजी सकाळी ०९.०० वा. डॉ. नीरज हातेकर (प्रोफेसर, स्कूल ऑफ

डेवेलपमेंट, अझीम प्रेमजी युनिवर्सिटी, बेंगलोर) यांनी Economics Olympiad 2023-24 या कार्यक्रमाचे उद्घाटन केले व भारतीय अर्थव्यवस्थेची सद्यस्थिती या विषयावर व्याख्यानातून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून मा.प्राचार्य डॉ. गुरुनाथ फगरे उपस्थित होते. प्रमुख पाहुण्यांचा परिचय डॉ. मृणालीणी वाईकर यांनी केला, कार्यक्रमाचे आभार डॉ. महेश जाधव यांनी केले कार्यक्रमाच्या प्रास्ताविक डॉ. राजेश गावित यांनी केले, कार्यक्रमाचे सूत्रसंचालन यशस्वीनी चोरगें व भूमिका धनवडे यांनी केले.

२.३)या दिवशीच निबंध स्पर्धेसाठी दिलेल्या विषयांवर निबंध गोळा केले. या निबंध स्पर्धेसाठी एकूण ३२ विध्यार्थ्यानी सहभाग घेऊन निबंध जमा केले. या निबंधांचे परीक्षण डॉ. अंबादास सकट व प्रा.सुमती कांबळे यांनी केले.

२.४) दिनांक २ फेब्रुवारी २०२४ रोजी रांगोळी स्पर्धा आयोजित करण्यात आली. या स्पर्धेसाठी बारा विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या रांगोळी स्पर्धेचे निरीक्षण प्रा. डॉ. गुरुनाथ फगरे, डॉ. सुनील सावंत. डॉ. मंजुश्री इंगवले यांनी केले व याचे परीक्षण डॉ. राणी शिंदे, (यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, पाचवड) यांनी केले.

२.५) दिनांक २ फेब्रुवारी २०२४ रोजी संशोधन पेपर सादरीकरण ची स्पर्धा आयोजित करण्यात आली या स्पर्धेमध्ये सात विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदविला. या स्पर्धेमध्ये विद्यार्थ्यांनी PPT च्या प्रोजेक्टर सहाय्याने संशोधन पेपर चे सादरीकरण केले. डॉ. महेश जाधव व डॉ. राजेश गावित यांनी याचे परीक्षण केले.

२.६)दिनांक २ फेब्रुवारी २०२४ रोजी अर्थशास्त्र टॅलेंट स्पर्धा आयोजित करण्यात आली ही स्पर्धा MCQ या स्वरूपाची होती या स्पर्धेमध्ये एकूण १८ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला या स्पर्धेचे पर्यवेक्षण प्रा. मनोहर मंगवडे यांनी केले. प्रा. स्वाती गावडे व प्रा. मंगवडे यांनी परीक्षण केले.

२.७) दिनांक ३ फेब्रुवारी २०२४ रोजी २४ रोजी Economics Olympiad 2023-24 स्पर्धेची सांगता व पारितोषिक वितरण कार्यक्रमास प्रमुख पाहुण्या म्हणून डॉ. नीलिमा भोसले (अध्यक्ष, महालक्ष्मी शिक्षण संस्था, भुईंज) या उपस्थित होत्या. डॉ. नीलिमा भोसाले यांनी सहभागी विध्यार्थ्यांशी सहज संवाद साधला व स्पर्धेमध्ये भाग घेतलेल्या विद्यार्थ्यांचे व या विद्यार्थ्यांमधून प्रत्येक इवेंट मध्ये पहिले तीन आलेल्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व ट्रॉफी देऊन गौरविण्यात आले. या दिवशी कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. सुनील सावंत प्रभारी प्राचार्य उपस्थित होते या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. आर. एस. गावित यांनी केले प्रमुख पाहुण्यांचा परिचय डॉ. मृणालीणी वाईकर यांनी केले या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि Economics Olympiad २०२३-२४ समन्वयक डॉ. प्रेमा यादव यांनी केले व शेवटी या कार्यक्रमाचे आभार डॉ. महेश जाधव यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी इकॉनॉमिक्स विभागातील विभाग प्रमुख डॉ. राजेश गावित, सहकारी प्रा. स्वाती गावडे, प्रा. मनोहर मंगवडे, डॉ. महेश जाधव, डॉ. प्रेमा यादव व डॉ. मृणालिणी वाईकर यांचे मोलाचे सहकार्य मिळाले.

* दिनांक १९ मार्च २०२४ रोजी अर्थशास्त्र विभाग अंतर्गत बी.ए. भाग-३ च्या विध्यार्थ्यांचा सांगता समारोप घेण्यात आला.

डॉ. राजेश गावीत
विभागप्रमुख

Department of Political Science

* दि. ०९/०८/२०२३ रोजी राज्यशास्त्र विभाग, ELC club व तहसील कार्यालय, वाई यांच्या संयुक्त विद्यमाने ऑगस्ट क्रांती दिनानिमित्त मतदार नोंदणी अभियानाचे आयोजन करण्यात आले. यावेळी डॉ.सुराभिताई मदन भोसले व वाईच्या तहसीलदार सौ. सोनाली मेटकरी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी २०० विद्यार्थी व १२ शिक्षक उपस्थित होते.

* दि. १२/०८/२०२३ रोजी राज्यशास्त्र विभागाच्या वतीने महाविद्यालयाच्या मध्यवर्ती ग्रंथालयास भेट देण्यात आले यावेळी विद्यार्थ्यांना ग्रंथपाल डॉ.एस. पी. कांबळे यांनी मार्गदर्शन केले संपूर्ण ग्रंथालयाची माहिती दिली. यावेळी १२ विद्यार्थी व २ शिक्षक उपस्थित होते.

* दि. २६/ ११/ २०२३ रोजी राज्यशास्त्र विभागाच्या वतीने संविधान दिन साजरा करण्यात आला. यावेळी संविधानाच्या उदेशिकेचे सामुहिक वाचन घेण्यात आले. मा. प्राचार्य डॉ.गुरुनाथ फगरे यांनी उपस्थितांना संबोधित केले. यावेळी २६/११ च्या मुंबई हल्ल्यातील शहीद झालेले महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी बापूसाहेब धुरागुडे व अंबादास पवार यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यावेळी ४० विद्यार्थी आणि ७ शिक्षक उपस्थित होते.
* दि. २५/०१/२०२४ रोजी राज्यशास्त्र विभाग, ELC club व NSS विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय मतदार दिन साजरा करण्यात आला यानिमित्त निबंध स्पर्धा, पोस्टर स्पर्धा, रांगोळी स्पर्धा व प्रश्नमंजुषा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. यावेळी जनता शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. मदनदादा भोसले, प्राचार्य डॉ.गुरुनाथ फगरे तसेच इतर मान्यवरांच्या उपस्थितीत सर्व विद्यार्थ्यांना लोकशाहीवर निष्ठा ठेवण्याची शपथ देण्यात आली.

प्रा.राजेंद्र जायकर
विभागप्रमुख

मानसशास्त्र विभाग

१. दि.१०/१०/२०२३ रोजी जागतिक मानसिक आरोग्य दिनानिमित्त मानसशास्त्र विभागातील विद्यार्थ्यानी सद्यच्या मानसिक आरोग्यावर आधारित विविध विषयावरील भित्तीपत्रके सादर करण्यात आली .

२. महाविद्यालयातील प्राध्यापक,कार्यालयीन कर्मचारी व विद्यार्थ्यांसाठी महाविद्यालयातील खोली क्रमांक १३ मध्ये दि.१०/१०/२०२३ रोजी जागतिक मानसिक आरोग्य दिनानिमित्त "Mental Health is a Universal Human Right' या विषयावर सातारा येथील प्रसिद्ध मनोविकारतज्ज्ञ डॉ.नितीन रोकडे यांनी व्याख्यान दिले .

३. वाईकर नागरिकांसाठी वाईमधील टिळक ग्रंथालय येथे दिनांक ८ ते १० ऑक्टोबर २०२३ या कालावधीमध्ये तीन व्याख्याने आयोजित करण्यात आली. या व्याख्यानमालेचे सातवे वर्ष आहे. यामध्ये दि.८ ऑक्टोबर रोजी डॉ.राहुल शिधये मनोविकार तज्ञ, पुणे यांनी 'सांस्कृतिक वारसा आणि मानसिक आरोग्यसंवर्धन', दि.९ऑक्टोबर सौ.स्मिता गोडसे आणि सौ.मंजिरी चव्हाण एकलव्य फौंडेशन फॉर मेंटल हेल्थ पुणे यांनी 'मानसिक आरोग्याची गुरुकिल्ली स्वमदत गट', दि .१० ऑक्टोबर श्री.कपिल ललित, सांगली 'सुदृढ भावनिक आरोग्याची तंत्रे' अशा जीवनावश्यक विषयांवर व्याख्याने दिली.

४. दि.२७/१२/२०२३ रोजी सौ.मंजिरी चव्हाण पुणे. यांनी 'मानसिक आजार आणि सर्वसमावेशक दृष्टीकोन' या विषयावर व्याख्यान दिले.

५. दि.१०/८/२०२३ रोजी मानसशास्त्र बी.ए.भाग ३ च्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक सहल 'रिव्ह्का साहिल अक्षर इन्स्टिट्यूट, वाई' येथे नेण्यात आली .

६. 'आधुनिक आरोग्य सेवा कौशल्य-प्रमाणपत्र अभ्यासक्रम' आयोजित करण्यात आला.

७. मानसशास्त्र विभागामार्फत पेस, पुणे या संस्थेबरोबर सहमती करार (MoU) करून विविध शाळामध्ये व्यसनविरोधी समुपदेशन सत्र आयोजित करण्यात आले.

८. मानसशास्त्र विभागामार्फत बारावीच्या विद्यार्थ्यांची मोबाईल व्यसनाधीनता मानसशास्त्रीय चाचणी सोडवून घेण्यात आली .

- डॉ.आनंद घोरपडे
विभागप्रमुख

DEPARTMENT OF COMMERCE AND MANGEMENT

Result of the Academic Year 2022-23
B. Com III- 99.50%, M.Com. II-78.70%

- The Department of Commerce and Management in association with Nandi Foundation Pune organized Five-Day Workshop on "Skill Enhancement" from 4th to 9th September 2023. Miss. Priyanka Sharma was Resource Person.

  The Department of Commerce and Management organized One-Day Workshop on "Preparation of Competitive Examination" on 14th October 2023. The Resource Person of the program was Mr. Abhijit Nikam.
- The Department of Commerce and Management organized Special Lecture on "Career Opportunities in Insurance and AERO Sector" on 20th October 2023. Mr. Vivek Bhandari and

Miss. Samira Naik participated as Resource Persons.

- The Department of Commerce and Management organized Special Lecture on "Financial and Legal Literacy" on 5th December 2023. CA Suresh Mehta was the Resource Person.
- The Department of Commerce and Management organized Two Special Lectures on "Career Opportunities in Commerce and Management", and "How to Build Career in Corporate World" on 17th January, 2024. CA Pravina Oswal , and Mr. Chetan Godabole were invited as Resource Persons of the program.
- The Department of Commerce and Management arranged "Visit to LIC Office" Branch, Wai of B. Com Part I students.
- The Department of Commerce and Management organized Industrial visit of B.Com Part III students at Mapro Foods Pvt. Ltd., Shendurjane and Orgatma Organic Science Pvt. Ltd., Vele.
- The Department of Commerce and Management organised Online "International Women's Day Quiz Competition" on the occasion of 'International Women's Day' on 8th March 2024.
- The Department of Commerce and Management organised Farewell Program of B.Com. III on 12th March2024. The Resource Person of the program was Hon. Dr. Jaywant Choudhari, Secretary, Janata Shikshan Sanstha, Wai.
- Miss. Shreya Atul Patil, student of B. Com III participated in "District Level Avishkar Competition", 2023-24.

Principal Dr.Gurunath Fagare
Head

रसायनशास्त्र विभाग

- दि. ०३ जुलै २०२३ रोजी "Job Opportunities after P.G." आणि "Spectral Analysis" या विषयांवर व्याख्यान आयोजित केले. या व्याख्यानास डॉ.राशिनकर, रसायनशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापिठ, कोल्हापूर आणि डॉ.सोनवणे, रसायनशास्त्र विभाग, कन्या महाविद्यालय, इस्लामपूर हे व्याख्याते म्हणून उपस्थित होते.
- दि.१२ सप्टेबर २०२३ रोजी एम.एस्सी. १ च्या विद्यार्थ्यांची Referesher party घेण्यात आली.
- दि.१४ सप्टेंबर २०२३ रोजी एम.एस्सी. च्या विद्यार्थ्यांची पालकसभा घेण्यात आली. त्या सभेला उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला.
- दि.२६ डिंसेबर २०२३ रोजी "Career Opportunities in Various Industries after B.Sc. and M.Sc." या विषयावर कार्यशाळा आयोजित केली. सदर कार्यशाळेस श्री.भोसले, Senior Executive, Syngene International Ltd, Banglore हे Resource Person म्हणून उपस्थित होते.
- दि.१८ आक्टो. २०२३ रोजी एम.एस्सी.च्या विद्यार्थ्यासाठी Research Methodology या विषयावर डॉ.कोरडे एस.डी., सहाययक प्राध्यापक पदार्थ विज्ञान विभाग यांचे Guest Lecture आयोजित केले.
- अग्रणी महाविद्यालय योजने अंतर्गत दि.२९ डिंसेबर २०२३ रोजी "Instrumental Method of Chemical Analysis" या विषयावर एक दिवशीय कार्यशाळा आयोजित केली. या कार्यशाळेसाठी Insta Vision Laboratory and Services, Satara, येथील श्री.अजित एकल उपस्थित होते.
- दि.११ जानेवारी २०२४ रोजी रसायनशास्त्र विभाग व Placement Cell यांच्या संयुक्त विद्यमाने "Industry Academia Interaction" झाली. B.Sc. Chemistry च्या ०८ विद्यार्थ्याना Placement मिळाली.
- दि.०३ फेब्रुवारी २०२४ व ०४ फेब्रुवारी २०२४ रोजी श्री.प्रा.नरहर विणु कारेकर व्याख्यानमाला विज्ञान मार्फत "Electrochemistry" या विषयावर २ दिवसीय व्याख्यानमाला आयोजित केली. यासाठी श्री.प्रमोद गायकवाड, सहा. प्राध्यापक, मुधोजी महाविद्यालय, फलटण हे व्याख्याते म्हणून उपस्थित होते.
- दि.२४ फेब्रुवारी २०२४ रोजी बी.एस्सी. ३ च्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ घेण्यात आला.
- दि. २८ फेब्रुवारी २०२४ रोजी बी.एस्सी. व एम. एस्सी. च्या विद्यार्थ्यांनी Poster presentation सादर करुन राष्ट्रीय विज्ञान दिवस साजरा केला
- दि. २८ फेब्रुवारी २०२४ रोजी एम.एस्सी. २ च्या विद्यार्थ्यांची Industrial visit, NCL, IISER, C-MET, Pune University या ठिकाणी आयोजित केली.
- दि.२० मार्च २०२४ रोजी एम.एस्सी. २ च्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ घेण्यात आला.

- दि. २८ मार्च २०२४ रोजी एम.एस्सी. च्या विद्यार्थ्यासांठी Research Guidance या विषयावर व्याख्यान आयोजित केले. सदर व्याख्यानासाठी डॉ.सचिन शिंदे, सहायक प्राध्यापक P.D.V.P. महाविद्यालय, तासगाव यांनी मार्गदर्शन केले.
- प्रो.डॉ.डी.एन.झांबरे, रसायनशास्त्र विभाग यांची Physical Chemistry, Inorganic Chemistry, Analytical Chemistry व Organic Chemistry विषयांवर ०८ पुस्तके निराली प्रकाशन, पुणे यांचे मार्फत प्रकाशित झाली.
- डॉ.वाटेगावकर यांचे ०३ शोधनिबंध जगातील पहिल्या ०५ मध्ये असणाऱ्या नामांकित International Journals मध्ये प्रसिध्द झाले.

प्रो. डॉ. झांबरे ज्ञानदेव
विभागप्रमुख

गणित विभाग अहवाल

शैक्षणिक वर्ष २०२३-२४ ह्या वर्षामध्ये गणित विभागामार्फत खालील शैक्षणिक उपक्रम आयोजित करण्यात आले :

१) दि. २२ डिसेंबर २०२३ रोजी राष्ट्रीय गणित दिवस या निमित्त बी.एस्सी भाग १, २ व ३ या वर्गातील विद्यार्थ्यांसाठी पोस्टर प्रेझेन्टेशन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. तसेच Online गूगल फॉर्म वर प्रश्नमंजुषा घेण्यात आली.

२) दि. १८ सप्टेबर २०२३ रोजी बी.एस्सी भाग १, २ व ३ या वर्गातील विद्यार्थ्यांसाठी Career Opportunities in IT Sector या विषयावर व्याख्यान आयोजित केले. या व्याख्यानास श्री.सुफीयान शौकत मोमीन, Consultant VMware Administrator, Capgemini Technology Services India Limited, Pune हे व्याख्याते म्हणून उपस्थित होते.

३) अग्रणी महाविद्यालय योजने अंतर्गत खालील कार्यक्रम आयोजित करण्यात आले :-

अ) दि. ३१ जानेवारी २०२४ रोजी बी.एस्सी भाग १, २ व ३ या वर्गातील विद्यार्थ्यांसाठी Application of Mathematics in Artificial Intelligence या विषयावर व्याख्यान आयोजित केले. या व्याख्यानास कु.स्नेहा घार्गे, Solution Architect, QHills Technology Pvt. Ltd., Satara ह्या व्याख्यात्या म्हणून उपस्थित होत्या.

ब) दि. ७/०२/२०२४ रोजी बी.एस्सी भाग १, २ व ३ या वर्गातील विद्यार्थ्यांसाठी Python and its Application in Research या विषयावर कार्यशाळा आयोजित करण्यात आली. या कार्यशाळेसाठी श्री.प्रा.मेहुल जाधव, दि न्यू कॉलेज, कोल्हापूर हे व्याख्याते म्हणून उपस्थित होते.

संशोधन :-

१) डॉ.शिवाजी ताटे यांचे दोन रिसर्च पेपर आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय रिसर्च जर्नल मध्ये प्रकाशित झाले.

२) Studia Universitatis Babes-Bolyai Mathematica, ROMANIA) Communications in Mathematics and Applications, Delhi, INDIA

३) डॉ.शिवाजी ताटे यांनी जयसिंगपूर कॉलेज, जयसिंगपूर येथे झालेल्या राष्ट्रीय कॉन्फरन्स मध्ये रिसर्च पेपर प्रेझेंट केला.

३) डॉ.शिवाजी ताटे यांनी D.B.E. Dayanand College oe Arts and Science, Solapur येथे झालेल्या राष्ट्रीय कॉन्फरन्स मध्ये रिसर्च पेपर प्रेझेंट केला.

डॉ. ताटे शिवाजी
विभागप्रमुख

Department of Botany

1. The Department of Botany celebrated "International Environment Day" on 5th June 2023. The theme of the programme was "Beat Plastic Pollution". The second year students of B. A., B.Com., B.Sc and BCA participated in the program.
2. The Department of Botany in collaboration with Insight Academy, Satara organized One-Day Workshop on "Preparation of Competitive Examination" on 14th October 2023,. Mr. Abhijit Nikam and and Mr. Tejas Kate participated in the program as Resource Person.
3. The Department of Botany organised "Poster Presentation" on 17th Oct. 2023. 19 Students participated in District Level Avishkar Competition. Miss Manasi Jaigude (B.Sc. III student) and Miss Chetana Sawant (B. Sc.II

student) selected in college level and participated in District Level Avishkar Research Competition organized at Yashwantrao Chavan College of Science, Karad on 11th December 2023.

4. The Department of Botany in collaboration with Abhinav Nursary, Parkhandi organised One-Day Workshop on "Horticultural Practices" on 13th Jan. 2024 for B.Sc.II and B.Sc III.
5. The Department of Botany organized One-Day Workshop on " Preparation of Various Types of Bouquet" on 5th Feb. 2024 under Lead College Scheme.
6. The Department of Botany organised visit to "Mushroom Cultivation" of A.K. Charakh Sanjeevani Farm at Shendurjane on 20th Feb. 2024.
